शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथमाला : पुष्प सहावे

शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे

संपादक–अनुवादक

स. शं. देसाई



किंमत : रुपये पांच

प्रकाशिका :
डॉ. उषा इथापे,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४.

प्रथमावृत्ति १९७७

प्रती : १०००

किंमत : रुपये पांच

FOREWORD

In the series of Historical Publications of Shivaji University three volumes were published so far under the title *Tarabaikalin Kagadpatrem* and the fourth *Jijabaikalin Kagadpatrem* is awaiting publication. All these four volumes were edited by Dr. A. G. Pawar, the former Vice-Chancellor of Shivaji University.

The present Volume *Shivshahi Portuguese Kagadpatrem* which stands fifth in the above series, was compiled and edited by Shri S. S. Desai. He has to his credit two Volumes of Portuguese documents named *Marathyancha Itihasachim Sadhanem, Portuguese Daftar Volume III and II*, published by the State Board for Literature and Culture, Maharashtra, with which body Shri Desai was associated before he joined the Research Section, Deptt. of History, Shivaji University.

In this slender Volume, 120 documents pertaining to the period of Shivaji, Sambhaji and Rajaram are included.

It is needless to give here an account of Portuguese-Maratha relations, as it is well known to the students of the History of the Marathas. Only a few points are to be elucidated. Krishnaji Anant Sabhasad, the first biographer of Chhatrapati Shivaji, has aptly said in the *Sabhasad Bakhar* that he created a new universe. It is ture that Chhatrapati Shivaji carved out a new kingdom out of the Adilshahi territory, but at the same time many new problems cropped up with the birth of this kingdom, such as the foremost need of a navy.

Long before Chhatrapati Shivaji's rise the Abissinian Siddis of Danda Rajpuri were ravaging the coast of Konkan with fire and sword. There was no limit to the misery of the inhabitants of Konkan, who were at the mercy of these ruthless pirates. As a new *dominant* of Konkan, it was the prime duty of Chh. Shivaji to protect his defenceless subjects. And to wipe out Danda Rajapuri, the nest of marauding Siddis, he established

प्रकाशिका :
डॉ. उषा इथापे,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४.

प्रथमावृत्ति १९७७

प्रती : १०००

किंमत : रुपये पांच

FOREWORD

In the series of Historical Publications of Shivaji University three volumes were published so far under the title *Tarabaikalin Kagadpatrem* and the fourth *Jijabaikalin Kagadpatrem* is awaiting publication. All these four volumes were edited by Dr. A. G. Pawar, the former Vice-Chancellor of Shivaji University.

The present Volume *Shivshahi Portuguese Kagadpatrem* which stands fifth in the above series, was compiled and edited by Shri S. S. Desai. He has to his credit two Volumes of Portuguese documents named *Marathyancha Itihasachim Sadhanem, Portuguese Daftar Volume III and II*, published by the State Board for Literature and Culture, Maharashtra, with which body Shri Desai was associated before he joined the Research Section, Deptt. of History, Shivaji University.

In this slender Volume, 120 documents pertaining to the period of Shivaji, Sambhaji and Rajaram are included.

It is needless to give here an account of Portuguese-Maratha relations, as it is well known to the students of the History of the Marathas. Only a few points are to be elucidated. Krishnaji Anant Sabhasad, the first biographer of Chhatrapati Shivaji, has aptly said in the *Sabhasad Bakhar* that he created a new universe. It is ture that Chhatrapati Shivaji carved out a new kingdom out of the Adilshahi territory, but at the same time many new problems cropped up with the birth of this kingdom, such as the foremost need of a navy.

Long before Chhatrapati Shivaji's rise the Abissinian Siddis of Danda Rajpuri were ravaging the coast of Konkan with fire and sword. There was no limit to the misery of the inhabitants of Konkan, who were at the mercy of these ruthless pirates. As a new *dominant* of Konkan, it was the prime duty of Chh. Shivaji to protect his defenceless subjects. And to wipe out Danda Rajapuri, the nest of marauding Siddis, he established

three shipyards at Pen, Kalyan and Bhivandi, with the aim of building twenty warships. He engaged some five hundred Portuguese artisans for this work.

But the Portuguese authorities became apprehensive thinking that after settling accounts with the Siddis of Jinjira Shivaji might turn his guns against them. Besides they were also on friendly terms with the Siddis. And hence they instigated the Portuguese shipbuilders hired by Shivaji to desert his service. It is for the first time that the story of Shivaji's ship-building activity is narrated here.

But Shivaji was an indomitable and dauntless master-builder. In spite of obstacles and heavy odds against him he was successful in building up his navy which was strong enough to challenge the Portuguese might. Many instances of this challenges are cited in these documents.

Shri Desai in his Introduction has constructed the story of Chhatrapati Shivaji's naval expedition against Basrur or Barcelor as the Portuguese say, with a new perspective. He is of the opinion that the object of Chhatrapati Shivaji's expedition against Basrur was not to plunder that port but to save the Kingdom of Bednur from internal strife and external danger. While going through some of the documents included in this Volume, one can find out that after the expedition against Basroor, Shivaji was able to annex a vast coastal territory beginning from South to the river Kambli or Gangavati and to the north, river Sal, the traditional common frontier between the Portuguese and the Adilshah of Bijapur. It seems that he began to build a fort in Balli on the left embankment of the river Sal, thus coming at loggerheads with the Portuguese. The Viceroy's Advisory Council advised him to pull down the construction work of the fort even with the force of arms. But the Viceroy was wise enough not to resort to that extreme measure, as he knew the power of Chhatrapati Shivaji. He told the Advisory Council that Shivaji was mightier than the Portuguese and it was not wise to cross swords with him.

The story of Chouth, is not new to the readers of the History of the Marathas, but the name of the Raja of Ramnagar is. It is for the first time the name of the ruler of that Kingdom is being discovered first in this volume. The Patekar Raja's episode is also new to the History of the Marathas though it has no connection whatsoever with the History of the Marathas. But being a Maratha Ruler, one feels sorry for his tragic death.

Relations between Chhatrapati Shivaji, Sambhaji and Rajaram on the one hand and the Arabs on the other are also a new chapter as regards the History of the Marathas. It seems that Chhatrapati Shivaji and his two sons Sambhaji and Rajaram were maintaining the traditional friendship of this country with the Arabs, and were not paying heed to the incessant requests of the Portuguese not to give shelter to the Arab ships in their ports.

It is quite interesting to read the account of the treatment meted out to the Maratha envoys in the Court of Goa, narrated in the Introduction. But one should bear in mind that it was after the Sambhaji-Portuguese war that the Maratha envoys were treated on par with the envoys of the King of Karnatak. By this instance one can draw a conclusion that it is might which pays dividends. Had Sambhaji not taught a lesson to the Portuguese, they would not have given so respectful treatment to his envoys.

These are the salient features of this Volume. It is no mean countribution to the primary source material of the Maratha History, and I congratulate Shri S. S. Desai on this significant achievement. It is to be hoped that Shri Desai will bring to light many more similar documents which will throw new light upon our glorious past.

P. G. Patil

प्रस्तावना

' शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे ' हा पोर्तुगीज ऐतिहासिक साधनाचा ग्रंथ ' शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथ माले 'तून आज प्रकाशित होत आहे. या खंडात शिवाजी महाराज, संभाजी महाराज, आणि राजाराम यांच्या कारकीर्दीतील १२० कागदांचा अंतर्भाव झालेला आहे.

मराठ्यांच्या इतिहासासंबंधीची बरीच पोर्तुगीज कागदपत्रे आतांपर्यंत मराठीत प्रसिद्ध झाली आहेत. प्रख्यात इतिहास संशोधक डॉ. पां. स. पिसुर्लेकर यानी ' पोर्तुगीज मराठे संबंध ' या आपल्या ग्रंथाचे द्वारा पोर्तुगीज–मराठे राजनैतिक संबंधाचा परिचय मराठी वाचकाना करून दिला आहे. प्रस्तुत ग्रंथानंतर ' मराठ्यांच्या इतिहासाची साधने पोर्तुगीज दप्तर खंड ३ आणि खंड २ ' ह्या मी अनुवादून संपादिलेल्या व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने प्रकाशित केलेल्या खंडातून आणि शिवाजी विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांनी संपादिलेल्या ' ताराबाई कालीन कागदपत्रे खंड १, २ आणि ३ या खंडातूनही बरींच पोर्तुगीज कागदपत्रें प्रकाशांत आली आहेत. या सर्व साधन ग्रंथात न आलेली कागदपत्रें ' शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रें ' या खंडात समाविष्ट झालीं आहेत. अजूनही या कालांतील कांही कागदपत्रे गोवा पुराभिलेख संग्रहालयांत उपलब्ध होण्याची शक्यता आहे. वेगवेगळ्या नावाखालच्या अनेक हस्तलिखित ग्रंथात ही साधने विखुरलीं गेलीं असल्याने त्यांचें संशोधन करून हवे ते कागद निवडणे हें एक अत्यंत चिकाटीचे आणि दीर्घ परीश्रमांचे काम आहे.

' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधने पोर्तुगीज दप्तर खंड २ ' या खंडाच्या प्रस्तावनेत मी पोर्तुगीज–मराठे संबंधांचे सविस्तर विवेचन केले असल्याने प्रस्तुत खंडाच्या प्रस्तावनेत त्याची पुनरुक्ति करण्याची माझी इच्छा नाही. परंतु या खंडात असे काही कागद आहेत की त्यांचा अन्वयार्थ लावल्याखेरीज त्यांची पार्श्वभूमी वाचकाना आकलन होणार नाही. उदाहरणार्थ क्र. २ चा कागद. शिवाजी महाराजानी सुमारे ५०० पोर्तुगीज कारागीर नोकरीस ठेवून वीस युद्धनौका बांधण्याचा उद्योग भिवंडी, कल्याण आणि पेण येथे सुरू केला होता. परंतु त्या युद्धनौका बांधून तयार झाल्या, तर त्यांचा उपयोग शिवाजी महाराज आपणाविरुद्ध करतील या भीतीने गोव्याच्या पोर्तुगीज अधिकाऱ्यानी पोर्तुगीज कारागिरांना चिथावणी देऊन महाराजांची नोकरी सोडण्यास त्याना प्रवृत्त केलें. ही अंधुक माहिती शिवाजी

महाराजांच्या चरित्रात एक दोन ठिकाणी जरी आली असली तरी, उपरिनिर्दिष्ट कागदांत ती सविस्तर आली आहे.

शिवाजी महाराजांनी नौका बांधण्याचे काम हातीं घेताना जाहीर केलें होते, की जिंजिऱ्याच्या सिद्दीवरील स्वारीसाठी आपण त्या बांधीत आहो. परंतु सिद्दीचा बंदोबस्त झाल्यावर शिवाजी महाराजांचा मोहरा आपल्याकडे वळणार नाही हे न जाणण्या इतके पोर्तुगीज अधिकारी काही दुधखुळे नव्हते.

शिवाजी महाराजांच्या वर्धिष्णु सामर्थ्याची आणि त्यांच्या विजुगीषु लश्करी हालचालींची कल्पना पोर्तुगीज आणि इंग्रज या दोघाना झाली असल्याने ते त्यांच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न तर करीत होतेच; परंतु जिंजिऱ्याच्या सिद्दीचाही नाश त्याना शिवाजी महाराजांकडून झालेला नको होता. म्हणून ते त्याला सर्वतोपरी मदत करीत होते. ती मदत जर सिद्दीला झाली नसती तर तो टिकून राहूं शकला नसता.

आरमार बांधण्याच्या बाबतीत पोर्तुगीजांकडून शिवाजी महाराजाना जशी मदत झाली नाही, तसेंच पोर्तुगीजांकडून त्याना तोफा, बंदुका, वगैरे अत्याधुनिक शस्त्रास्त्रें आणि दारुगोळाही मिळूं शकला नाही. परंतु महाराजानी त्याची परवा केली नाही. त्यानी लढाऊ आरमारही उभारलें आणि तोफा ओतण्याचाही उपक्रम सुरू केला. परंतु या ठिकाणी एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे ती ही की, त्यांच्या युद्धनौका जरी चपळ असल्या, तरी त्या युरोपियन राष्ट्रांच्या युद्धनौकांसारख्या भारी नव्हत्या. त्या खुल्या महासागरांत संचार करूं शकत नसत. त्या चपळ आणि हलक्या असल्याने युरोपियन युद्धनौकांना हुलकावण्या देऊन त्याना जेरीस आणूं शकत. परंतु घनघोर आरमारी लढायांत भाग घेऊन मोठाल्या युरोपियन युद्धनौकांचा त्या पराभव करूं शकत नसत, तरीही तत्कालिन आशियायी देशांच्या आरमारांहून शिवाजी महाराजांचे आरमार वरचढ होते, असें या आरमाराच्या कामगिरीचा इतिहास नजरेखालून घातल्यावर म्हणावेसें वाटते.

शिवाजी महाराज उदयास आले, तेव्हां हिंदी महासागरांत अरबांच्या आरमाराखेरीज अन्य कुठल्याही आशियायी देशाचे आरमार लांबच्या पल्ल्याची सफर करूं शकत नव्हते. चीन, मोगल बादशहा, विजापूरचा बादशहा, कालिकतचा सामोरिन, वगैरे आशियायी सत्तांची आरमारे स्थानिक समुद्रकिनाऱ्यावर संचार करण्यापलीकडे मोठ्या कामगिरीवर जाऊं शकत नसत. पोर्तुगीजांचे हिंदुस्थानात आगमन झाले, तेव्हां अरबांचे आरमार हिंदी महासागरांत संचार करीत होते. परंतु पोर्तुगीजानी अरबाना पहिल्याच झटक्यात नामोहरम करून त्यांच्या हातांतील हिंदुस्थानचा आणि आग्नेय आशियांतील मसाल्याचा व्यापार काबीज केला.

मोगल आरमार पोर्तुगीजांच्या मर्जीवर कसें अवलंबून होते ते या खंडांतील काही कागदांवरून दिसून येते. उदाहरणार्थ क्र. २२ च्या कागदात गोव्याचा व्हिसेरेइ सुरतेच्या नबाबास लिहितो की, तुम्ही दमणच्या कॅप्टनकडे 'दस्तकां'ची जी मागणी केली आहे, ती मंजूर करतां येत नाही. तुम्हाला 'दस्तके' हवी असल्यास तीं गोव्याहून घेऊन जावी. सुरतेचा नबाब म्हणजे औरंगजेबाचा सुभेदार. औरंगजेब स्वतःला 'आलमगीर' म्हणजे दुनियेचा बादशहा म्हणवून घेई. परंतु त्याच्या सुभेदारास पोर्तुगीजांचे परवाने बाळगावे लागत. या संदर्भात क्र. ४४ चा कागद नजरेखाली घालण्यासारखा आहे. गोव्याचा व्हिसेरेइ वेंगुर्ल्याच्या हवालदारास लिहितो की, आमचीं दस्तके बाळगल्या खेरीज कुठल्याही जहाजाला हिंदुस्थानच्या सागरांत संचार करतां येत नाही (nos mares da India nao pode navegar barco algum sem cartazes deste Istado). इतकेंच नव्हे तर तो पुढे म्हणतो (क्र. ६५) की, मोगल बादशहा हा आमचा मित्र असून शिवाजीहून जुना असताना देखील त्याला आणि त्याच्या प्रजाजनाना पैसे भरून आमचीं दस्तकें घ्यावी लागतात. (El Rei Grao Mogor q he auigo do estado e muito maes autigo q Sevagee e passado a seus barcos e a seus Vassalos Cartazes).

शिवाजी महाराजाना त्यांच्या राजवटीच्या आरंभी पोर्तुगीजांची दस्तके घ्यावीं लागत असत. परंतु त्यांच्या आरमारी सामर्थ्यात वाढ होऊन पोर्तुगीजांशी समरप्रसंग करण्याचा आत्मविश्वास त्यांच्यामध्यें निर्माण झाल्यावर त्यानी पोर्तुगीजांची दस्तके घेण्याचें बंद केले. जशास तसे या न्यायाने त्यांच्या युद्धनौका पोर्तुगीज जहाजांना अटकाव करू लागल्या, त्याना शिवाजी महाराजांचे परवाने बाळगण्याची सक्ती करूं लागल्या. त्यामुळें पोर्तुगीज अधिकारी ह्या हल्ल्याना चांचेगिरी म्हणून संबोधूं लागले. पोर्तुगीज युद्धनौकांची दंडेली ही चांचेगिरी नव्हती, त्याचे कारण काय तर पोर्तुगाल आणि स्पेन ह्या दोन्ही देशांनी हिंदुस्थानच्या जलमार्गाचा आणि अमेरिकेचा शोध लावल्याने पोपने ह्या दोन्ही देशांमध्यें महासागरांची विभागणी करून दिली होती. ह्या विभागणीनुसार हिंदी महासागर हा पोर्तुगीजांच्या कक्षेखाली येत होता, व या सागरांत संचार करणाऱ्या आशियायी आणि आफ्रिकी राष्ट्रांच्या जहाजाना पोर्तुगीजांची दस्तकें बाळगावी लागत असत. त्यांच्या ह्या दंडेलीला जर हिंदुस्थानात कुणी आव्हान दिलें असेल तर तें शिवाजी महाराजानी.

पोर्तुगीज आणि इंग्रज यानी शिवाजी महाराज आणि आंग्रे याना 'चांचे', 'लुटारू' म्हणून संबोधिले. त्यावर मल्लीनाथी करताना प्रख्यात वंग इतिहासकार सुरेन्द्रनाथ सेन हे म्हणतात की, 'मराठा दर्यासारंगाना 'चांचेगिरी' आणि लुटारूपणा करावयास कुणी शिकविलें असेल तर तें युरोपियन सत्तानीच. हिंदी महासागरावर

त्यांची (मराठ्यांची) कायदेशीर सत्ता असल्याने ह्या सागरांत संचार करणाऱ्या परकी जहाजाना त्यानी आपले परवाने बाळगण्यास भाग पाडले असेल तर तो त्यांचा बिलकूल गुन्हा नव्हता. ह्या बाबतींत ते पोर्तुगीजांचेच अनुकरण करीत होते. (In this respect the Marathas were simply imitating the Portuguese).*

शस्त्रांच्या बाबतींतही शिवाजी महाराजाना युरोपियन देशांवर अवलंबून रहावे लागत असे. परंतु त्यानी त्यांना चांगली शस्त्रें कधींच पुरविली नाहीत. ह्या संदर्भात क्र. २२ चा कागद पोर्तुगीजांच्या धोरणावर विदारक प्रकाश पाडतो. आदिलशहाच्या वकीलाने गोव्याच्या व्हिसेरेइकडे काही आरमारी तोफांची मागणी केली होती. व्हिसेरेइने हा ठराव राज्य सल्लागार मंडळाच्या बैठकी-समोर ठेवला. त्यावेळी भाषण करताना तो म्हणतो की, आमच्या शस्त्रागारांमध्यें निरुपयोगी म्हणून टाकून देण्यात आलेल्या चार छोट्या तोफा आहेत. त्या आदिलशहाच्या वकिलास विकून टाकाव्यात असें मला वाटते. (Se vendessem os quatro falconetes a Mirza Issofucan concelheiro del Rei Idalxa (por) nao serem de prestimo algum para nos)

उपरिनिर्दिष्ट आणि तत्सम कागद नजरेखालून घातल्यावर युरोपियन सत्तांच्या आपमतलबी धोरणावर चांगला प्रकाश पडतो.

आशियायी लोक चांगले लढवैये नव्हते म्हणून पाश्चिमात्य सत्तांसमोर त्यांचा निभाव लागला नाही, हें खरें नाही. आशियायी लोकांवर त्यानी मात केली ती शस्त्र-बळावर. आशियायी राष्ट्राना युरोपियन लोकांसारखी उत्कृष्ट शस्त्रें आणि युद्धनौका बनविण्यासाठी विसाव्या शतकांच्या प्रारंभापर्यंत प्रयत्न करावा लागला. स. १९०५ साली जपानने रशियन आरमाराचा पराभव करून आशियायी लोक समोरा समोरच्या युद्धांत युरोपियन लोकांचा पराभव करूं शकतात हें जगाच्या निदर्शनास आणून दिले. आणि अभिमानाची गोष्ट ही की, जपानी लोकांची ही चमक अठराव्या शतकात मराठ्यानी दाखविली. पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजाना आरमार बांधण्याच्या कामी आपले कसबी कारागीर पुरविले नाहीत की, चांगली शस्त्रास्त्रेंही दिली नाहीत. तरीही त्यानी उत्कृष्ट आरमार उभारण्यात यश संपादून पोर्तुगीज आणि इंग्रज आरमाराना काही आरमारी लढायांत पाणी पाजले. त्यांच्या नंतर आंग्र्यांनी तर पोर्तुगीज आणि इंग्रज याना सळो की पळो करून सोडले.

क्र. १० च्या पत्रात कारवार येथील 'कांबोळी' नदीतून दों मानुएल लोबू द सिल्व्हैरा हा नाविक अधिकारी दि. ३० नवंबर १६६४ रोजी गोव्याच्या व्हिसेरेइला

* S. N. Sen : Historical Records at Goa, Pg. 41.

लिहितो की, शिवाजीचें कारवार भागात आगमन होणार असल्याच्या बातमीने इकडे घबराट माजून राहिला आहे. तरी होनावरच्या किल्ल्याच्या रक्षणार्थ सहा युद्धनौका पाठवाव्या (Ha por ca grandes temores do Sivagy convem sor que em tudo cazo se Vexcia tiver por certo que elle vir para esta banda mande seis navios antes que a sua armada cheque meter sse eue Onor..................)

याच पत्रात बिदनूरचा मुख्य प्रधान नारायण मालो याने शिवाजीचा प्रतिकार करण्याचा आपला निर्धार प्रकट केल्याचें पत्र लेखक म्हणतो.

शिवाजी महाराजांच्या चरित्रात आणि अन्य साधनात त्यांच्या बसरूर स्वारीचा उल्लेख थोडचा अधिक प्रमाणात आलेला आढळतो. परंतु कुणीही या स्वारीला विशेष महत्व दिल्याचे दिसून येत नाही. फार तर एक परिच्छेद अथवा एकादे पृष्ठ या स्वारीच्या वाट्याला आले आहे. फक्त कै. त्र्यं. शं शेजवलकर यानी 'श्री शिवछत्रपती' या आपल्या शिवाजी महाराजांच्या संकल्पित चरित्रात बसरूरच्या स्वारीला एक प्रकरण दिलें आहे.

शिवाजी महाराजांच्या बहुतेक सर्व चरित्रकारांचा बेदनूरच्या स्वारीकडे बघण्याचा दृष्टिकोण असा दिसतो की, त्यानी ही स्वारी बेदनूरचे बंदर जें बंकापूर अथवा बसरूर तें लुटण्याकरितां म्हणून ती केली. परंतु पोर्तुगीज साधने[1] जर नजरे-खालून घातलीं, तर महाराजांची ही स्वारी राजकीय स्वरूपाची होती असें म्हणावेंसें वाटते.

बेदनूर हे कर्नाटकाच्या किनाऱ्यावरील एक संपन्न राज्य. या राज्याचे बंकापूर बसरूर अथवा पोर्तुगीज आणि इंग्रज साधनांत बार्सेलोर म्हणून ज्याचा उल्लेख आलेला आहे, तें एक गजबजलेलें बंदर होते. या बंदरांतून गोवा शहराला तांदळाचा पुरवठा होत असे. शिवाजी महाराजांच्या नौकाही या बंदरांत व्यापा-रासाठी जात असत. अशा ह्या समृद्ध राज्यावर विजापूरचा अदिलशहा, पोर्तु-गीज आणि डच यांचा डोळा होता. परंतु शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे यांच्या आश्रयाखाली हें राज्य आणि त्याच्या लगतची छोटी संस्थाने अस-ल्याने ते हयात असेस्तोंवर त्यांच्या शत्रूंचें काही चालले नाही.

स. १६६४ च्या जानेवारी महिन्याअखेर शहाजी राजे यांचे घोड्यावरून पडून अकस्मात निधन झाले, आणि बिदनूरच्या राज्यांत अराजक सुरूं झाले. राजा भद्राप्पा नायक हा विष प्रयोगामुळे मरण पावला. त्याच्यानंतर भद्राप्पाचा लहान मुलगा गादीवर आला. राज्याचा मुख्य प्रधान नारायण मालो याने राजाच्या बालपणाचा फायदा घेऊन आपल्या इच्छेनुरुप राज्यकारभार करण्यास प्रारंभ

1. Pissurlencar : Assentos do conselho do Estado, Vol. IV Apendice pgs. 535-554.

केला. ती संधि साधून बेदनूरच्या दक्षिण सिमेवरील नायर संस्थानिकानी बेदनूर राज्याचे लचके तोडण्यास प्रारंभ केला. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नारायण मालोने पोर्तुगीजांची मदत मागितली. त्या मदतीच्या बदली त्याने त्याना कांबोळी, बसरूर अथवा बंकापूर आणि मंगळूर ही बंदरें देण्याचे कारस्थान सुरूं केले. ह्या सौद्याच्या गुप्त वाटाघाटी पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेल्या आंजेदिव बेटावर झाल्याचे पोर्तुगीज साधनावरून कळून येते. परंतु प्रस्तुत वाटाघाटींचा सुगावा डचांना लागल्यावांचून राहिला नाही. कारण, तेही वहात्या गंगेत हात धुवून घेण्याच्या संधीची वाट पाहात होते. त्यांतच पोर्तुगीजांचे आणि त्यांचे हाडवैर असल्याने बेदनूर राज्यांत ते वरचढ झालेले त्याना नको होते. शिवाय विजापूरच्या सुलतानाने बिदनूर स्वाहा करण्यासाठी सैन्याच्या हालचाली सुरूं केल्या होत्या.

अशा रीतीने बिदनूरचे राज्य प्राणघातक संकटात सापडले असता शिवाजी महाराजांनी १६६५ च्या फेब्रुवारी महिन्यात बसरूरवर आरमारी स्वारी केली. मालवणहून ते ८५ लहान आणि तीन मोठ्या गलबतांसह या स्वारीवर निघाले. त्यांच्या बहुसंख्य चरित्रकारांचा असा तर्क दिसतो की त्यांनी बसरूरपर्यंतचा प्रवास आपल्या आरमाराबरोबर केला. परंतु त्या काळांतील इंग्रजी पत्रव्यवहार नजरेखालून घातला तर त्यानी बसरूरचा प्रवास जलमार्गें न करतां खुष्कीच्या मार्गें केला असा तर्क करण्यास जागा राहते.

दि. १४ डिसेंबर १६६४ रोजी Randolph Taylor आणि John Petit हे दोन इंग्रज व्यापारी गोव्याहून सुरतेला लिहितात की, गोव्या लगतच्या आणि कर्नाटकांतील कारवार भागांत शिवाजीच्या लश्कराच्या हालचाली सुरूं झाल्याने व त्याने हुबळीची बाजार पेठ लुटल्याने आमचा व्यापार पार थंडावला आहे. *

उपर्युक्त इंग्रजी पत्राचा संदर्भ दों मानुएल लोबु द सिव्हैरा याच्या दि. ३० नवंबर १६६४ च्या पत्राशीं बरोबर जुळतो. म्हणजे शिवाजी महाराज कारवार भागांत स्वारी करणार असल्याची बातमी लागल्याने त्याने वरील पत्र लिहिलें होते. परंतु या ठिकाणी एक गोष्ट नमूद केली पाहिजे ती ही की, बेदनूर राज्यांतील अंदाधुंदी थांबावी म्हणून त्या राज्याच्या अल्पवयीन राजाच्या पाठीराख्यानी शिवाजी महाराजांना तिकडे पाचारण केलें असलें पाहिजे आणि डचांनीही त्याना तिकडे पाचारण केलें असल्याची शक्यता नाकारतां येत नाही. कारण, डचांचे आणि त्यांचे संबंध मैत्रीचे होते. बिदनूर अराजकाच्या वावटळींत सापडले असतां स्वार्थ साधण्यासाठी म्हणून शिवाजी महाराजानी बसरूरची स्वारी केल्याचे संभवनीय वाटत नाही. कारण तदनंतर १६७३ सालीही ते बेदनूरलाससैन्य गेले

* English Records on Shivaji Vol. I. No. 99.

आहेत. त्यावेळी बिदनूरची विधवा राणी चन्नम्मा ही आपला पती सोमशेखर याच्या निधनानंतर दत्तक पुत्र घेऊन राज्य करीत होती. परंतु तिचा महत्वाकांक्षी सेनापती तिमण्णा आणि तिचे दगलबाज ब्राह्मण मंत्री यांनी कारस्थान करून तिला आणि तिच्या दत्तकपुत्रास कैदेंत टाकण्याचा घाट घालतांच तिने शिवाजी महाराजांना मदतीची हाक मारली. त्या हांकेस ओ देऊन ते बेदनूरला धावून गेले व राणीच्या शत्रूचा बंदोबस्त करून बेदनूर राज्यास त्यानी आपल्या संरक्षणाखाली घेतले. *

शिवाजी महाराज १६६५ साली कारवार भागांत गेले ते त्या भागांत कायमचे राहण्याकरितां. पोर्तुगीज कागदपत्रांत ज्या 'कांबोळी' नदीचा उल्लेख आला आहे, त्या गंगावती अथवा गंगावळी नदीपासून तत्कालिन पोर्तुगीज गोव्याची दक्षिण सीमा जी साळ नदी तिच्यापर्यंतची सुमारे शंभर दीडशे मैलांची किनारेपट्टी त्यानी आपल्या ताब्यांत घेऊन ती स्वराज्यास जोडली. हा भाग स. १६९६ पर्यंत स्वराज्यात मोडत होता. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याचा कारभार राजारामाच्या हाती आला व औरंगजेबाशी दोन हात करण्यासाठी त्याने जिंजीला प्रयाण केले, तेव्हा पैशाच्या अडचणीत आल्याने त्याने उपरिनिर्दिष्ट प्रदेश स. १६९६ साली सालीना बावीस हजार होताना सोंधेच्या राजास भोगवटचास देऊन टाकला.

शिवाजी महाराज संकटकाळी आपल्या मदतीस धावून आले म्हणून राणी चन्नम्मा त्यांच्या विषयी नेहमीच कृतज्ञ राहिली. आणि संभाजी महाराजांच्या वधानंतर राजाराम जिंजिस पळून जात असतां वाटेत आजारी पडून राणी चन्नम्माच्या आश्रयास गेला, तेव्हां तिने जुने उपकार स्मरून औरंगजेबाचा रोष ओढवून घेऊन राजारामास आश्रय दिला.

शिवाजी महाराजांनी बंकापूरची लूट केली असती, तर राणी चन्नमाने त्याना आपल्या मदतीस पाचारण केले असतें असं वाटत नाही. म्हणून १६६५ साली शिवाजी महाराज बिदनूरवर चालून गेले ते केवळ बंकापूरची लूट करण्यासाठी नसून तिथला बाल राजा सोमशंकर याच्या रक्षणासाठी, असा तर्कनिष्ठ निष्कर्ष काढता येतो.

बिदनूरचे आणि मराठ्यांचे संबंध १७९० सालापर्यंत चालू होते. त्या साली टिपू सुल्तानाने बिदनूरचे राज्य आपल्या राज्यास जोडले. तरी देखील पेशव्यांचे सरदार परशुराम भाऊ पटवर्धन हे सैन्य घेऊन टिपू सुल्तानाने घशांत घातलेल्या बिदनूर, सोंधे, आदि संस्थानाच्या मुक्ततेसाठी तिकडे गेले होते. परंतु टिपूने त्यांची मात्रा चालूं दिली नाही.

गोव्याचा व्हिसेरेइ आंतोनियु मेलु द काश्त्रु हा दि. २१ डिसेंबर १६६४ रोजी पोर्तुगालच्या राजास लिहितो की, कर्नाटकाच्या (बिदनूरच्या) राजाचा आणि

* शेजवलकर : श्रीशिवछत्रपती पृ. ३२१

आमचा तह झाला असून तदनुसार आम्हाला त्याच्याकडून बार्सेलोर (बसरूर), मंगळूर ही बंदरे, आणि त्यांच्या लगतचा प्रदेश आणि किल्ले जे मिळाले होते ते आम्ही त्याला परत केले आहेत. हा तह डचांच्या धमकीमुळें करावा लागला असें व्हिसेरेइ म्हणतो*

या ठिकाणी विषयांतर करून एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. डॉ. पां. स. पिसुर्लेकर यानी आपल्या Assentos Vol. IV मध्यें बिदनूरचा मुख्य प्रधान नारायण मालो व Vol. V मध्ये बिदनूरचा राजा बसाप्पा नायक यांच्या दोन पत्रांचे ठसे छापले आहेत. पैकी पहिल्या पत्राअखेर नारायण मालोची 'नारायण मालो' ही मराठी सही असून राजा बसाप्पाच्या पत्राअखेर 'मोर्तुब' अशी त्याची मराठी सही आहे.

पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाने शिवचरित्र साहित्य खंड ३ मध्ये 'सोंधे सोंधेकर' या शीर्षकाखाली सोंधे संस्थानची कागदपत्रें छापली असून त्यांत सोंधे राजघराण्याची एक वंशावळही आहे.† हा सर्व पत्र व्यवहार मराठीत आहे. ह्यावरून पश्चिम कर्नाटकांतील संस्थाने कानडी आणि मराठी अशी द्विभाषिक होती, की शहाजी राजे यांच्या त्या भागांतील वास्तव्यामुळे त्यानी राज्यकारभारासाठी मराठीचा स्वीकार केला होता, असा प्रश्न पडतो.

क्र. २० मध्यें गोव्याचा व्हिसेरेइ गोव्याच्या दरबारी नियुक्त झालेल्या विजापूरच्या वकीलास लिहितो की, तुमच्यासाठी घरें बघून ठेवण्यात आली आहेत. क्र. २१ मध्यें विजापूरच्या वकीलास गोवा शहरी आणण्यासाठी एक नौका सामोरा पाठविल्याचा उल्लेख आहे. ह्या दोन्ही पत्रांचा अंतर्भाव या खंडात करण्यात आला आहे, तो एवढ्याचसाठी की पोर्तुगीज दरबारांत मराठ्यांच्या वकीलाचें जें स्वागत होत होते त्याची तुलना विजापूरच्या वकीलाच्या स्वागताशीं करता यावी म्हणून. मराठ्यांच्या वकीलाचे स्वागत गोव्यात कसे होत होते त्याचें वर्णन ज्या कागदांत आले आहे त्याचे भाषांतर असे आहे :

'वकिलाचे आगमन डिचोली, फोंडे अथवा अन्यत्र कुठें झाले की, तो आपण कशासाठी आलो आहे ते व्हिसेरेइला कळवून त्याची मुलाखत मागतो. वकिलाचा निरोप मिळाल्यावर त्याच्यासाठी घरें बघण्यात येतात. घरांत सहा खुर्च्या, एक बैठे स्टुल, एक कपाट, आणि एक अरुंद पलंग' इतके सामान ठेवण्यात येते. नंतर वकिलास त्याच्या राजधानीतील प्रवेशाचा दिवस केव्हां मुक्रर केलाय ते कळविण्यात येते. त्या दिवशी एक सरकारी नौका (Yacht) त्याला आणण्यासाठी पाठविण्यात येते. तिच्या कॅबिनचे छत मखमलीचे व पडदे रेशमाचे असतात.

* Pissurlencar : Assentos do conselho do Estado Vol. IV pgs 552–553
† जोशी; ग. ह. खरे : शिवचरित्र साहित्य खंड ३

नौकेवर तिचा कॅप्टन आणि एक मदतनीस असतो. वकिलास नौकेतून उतरुन घेण्याची कामगिरी मुख्य न्यायमूर्तीकडे असते. तो त्याला घेऊन व्हिसेरेइकडे अथवा व्हिसेरेइ नसल्यास गव्हर्नरकडे जातो. व्हिसरेई अथवा गव्हर्नर दरबारांत सिंहासनाच्या पायऱ्या उतरून वकिलाचे स्वागत करतो. या प्रसंगी त्याच्या समवेत राज्यांतील बडे लोक, मंत्री, अधिकारी, वगैरे लवाजमा असतो. वकील व्हिसेरेइला मान लववून तीनदां अभिवादन करतो, व बरोबर आणलेले पत्र आणि नजराणा त्याला सादर करतो. त्यांचा स्वीकार व्हिसेरेइ अथवा गव्हर्नर उभ्याच करतो. तो पत्र आपल्या उजव्या बाजूस उभ्या असलेल्या राज्यसचिवाच्या हवाली करतो. नंतर वकिलास रजा देण्यात येते. वकील दोन सरकारी मदतनिसांसह त्याच्या निवासस्थानी जातो. मदतनीस त्याच्या बरोबर घोड्यावरून जातात.

'पोर्तुगालच्या राजाचा प्रतिनिधी वकिलाकडे फळांचा रस पाठवितो. त्याची किमत साठ अश्रफीपर्यंत असते. तदनंतर ज्या ज्या वेळी वकील व्हिसेरेइ अथवा गव्हर्नर यांची मुलाखत मागतो त्या त्या वेळी त्याला ती देण्यात येते. वकिलाच्या प्रयाणाचे दिवशी व्हिसेरेइची आणि त्याची मुलाखत होते. त्याने आणलेल्या पत्राचे उत्तर राज्यसचिव त्याच्या हवाली करतो. व त्याचा निरोप घेतो.

'वकिलास जलमार्गे जायचे असल्यास त्याची नौकेतून रवानगी करण्यात येते. नौकेवर दोन मदतनीस असतात. अथवा व्हिसेरेइच्या इच्छेप्रमाणे एकही असतो. वकीलास खुष्कीच्या मार्गे जायचे असल्यास याच औपचारिक पद्धतीचा अवलंब करण्यात येतो.'

कागदाच्या अखेरीस म्हटले आहे की, मराठ्यांच्या वकिलाचे स्वागत कर्नाटकाच्या राजाच्या वकिलाप्रमाणे युद्धानंतर (संभाजी-पोर्तुगीज) करण्यात येऊं लागले. (...... e so depois das guerras Sr. Conde de Alvor recebeu ao enviado do dito Sivagi com o titulo de Embaixador fazeudo lhe o mesmo tratamento que se da as Embaixador do Rei de Canara.) * म्हणजे संभाजी पोर्तुगीज युद्धापूर्वी मराठ्यांच्या वकिलाचा मान कर्नाटकाच्या राजाच्या वकिलाहून कमी होता व त्याला 'अंबासडर' म्हणून मानण्यात येत नव्हते, असा निष्कर्ष काढता येतो.

क्र. ३५ च्या कागदांत शिवाजी महाराजांनी सिद्दीवर धाडलेल्या प्रचंड आरमाराचे वर्णन आहे. ह्या आरमारात ९ हजार सैनिक, त्या काळी हल्ल्यासाठी उपयोगात आणण्यात येणारी जंगी यंत्रे, जांगर बांधण्यासाठी लागणारा दोरखंडाचा साठा, वगैरे गोष्टींचे वर्णन आहे, मराठी साधनात असें वर्णन आलें असेल असें वाटत नाही.

* Biker : Tratadose & Concertos de Pazes, Tomo V, Pg. 12-13

क्र. ३६ चा कागद 'चौथाई'च्या करा संबंधीचा आहे.

चौथाईच्या करासंबंधीची माहिती मराठी ऐतिहासिक साधनात अनेक ठिकाणी आली असून 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर खंड ३' मध्यें ती सविस्तर देण्यात आली आहे.

ह्याच संदर्भात क्र. ३६, क्र, ४१ व क्र. ४२ हे कागद महत्वाचे आहेत. पैकी पहिल्या कागदांत दमण शहराने शिवाजी महाराजाना चौथाई देण्याची शिफारस केली आहे. परंतु क्र. ४२ मध्यें चौथाई देण्याच्या बाबतीत टाळाटाळ चालविल्याचे दिसून येते.

मराठी कागदपत्रांत रामनगरच्या राजाचा उल्लेख साष्टीचा राजा म्हणून कुठे आला असेल असें वाटत नाही. या राजाविषयींची माहिती राजवाडे संपादित 'महिकावती'च्या बखरींत आली आहे. त्याचे राज्य 'दवणे' म्हणजे दमण पासून माहिमपर्यंत पसरलेलें होते. राजवाड्यानी प्रस्तुत बखरीच्या प्रस्तावनेत म्हटलें आहे की, रामनगरच्या राज्याचा संस्थापक रामशा याचा बाप देवशा हा देवगिरीच्या यादवांचा वंशज प्रतापशा, की ज्याने माहिमचे राज्य स्थापन केले त्याच्या रक्षेचा पुत्र होता. त्याने पुंडाई करून सह्याद्रि किनाऱ्याचे १५७ गाव कबजात घेतले व त्या प्रांताचे नाव रामनगर ठेवले (शक १९९४ सुमार)*

रामनगरच्या राजाविषयींची महिकावतीच्या बखरीतील (ही बखर एकोणिसाव्या शतकांत लिहिली गेली हें ध्यानात ठेवले पाहिजे) माहिती विश्वासार्ह मानली तर ते यादव कुलोत्पन्न असल्याने त्यांचे उपनाव यादव अथवा जाधव ठरते. परंतु प्रस्तुतच्या क्र. ४१ च्या कागदांत गोव्याच्या व्हिसेरेइने रामनगरच्या राजास 'देव राणे' म्हणून संबोधिले आहे.

अठराव्या शतकातील एक पोर्तुगीज इतिहासकार Diogo Couto (दियोग कौतु) ह्याने Decadas da Asia नावाच्या पोर्तुगीज ऐतिहासिक ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात चौथाईच्या उगमा विषयींची माहिती दिली आहे. दियोग कौतु हा गोव्यांत सरकारी दप्तरखान्याचा प्रमुख होता. तो म्हणतो की रामनगरच्या राजांचे वंशज हे मूळ रजपूत असून तेराव्या अथवा चौदाव्या शतकांत राजस्थानातून रजपूत लोकांचा जो एक लोंढा दक्षिणेत आला, तेव्हां रामनगरच्या राजाचे पूर्वज गुजरातेंत येऊन स्थायिक झाले. गुजरातचे लोक हे बिगर लढाऊ असल्याने त्यानी आपल्या खेड्यांच्या रखवालीचे काम त्या लढाऊ रजपूत लोकांकडे सोपविले व त्या कामाबद्दल त्याना ज्या खेड्यांच्या रखवालीचे काम ते करीत होते, त्यांच्या उत्पन्नाचा चौथा भाग देण्याचा उपक्रम सुरू केला. तेव्हांपासून ते ज्या प्रदेशाचें रक्षण करीत असत त्या प्रदेशाच्या उत्पन्नाचा चतुर्थांश भाग

* राजवाडे : महिकावतीची बखर, प्रस्तावना पृ. ६३.

क्र. १ **गोवा दि. १५ मे १६५८**

पोर्तुगालच्या राजाला लिहिलेल्या या पत्रांत गोव्याचे हंगामी गव्हर्नर फ्रान्सिश्कु द कास्त्रु व आंतोनियु द सौझ कौतिन्यु हे हिंदुस्थानातील राजकीय घडामोडींचा आढावा घेत आहेत. त्यांत ते म्हणतात की, शिवाजी महाराजानी आदिलशहा विरुद्ध उठाव करून त्याचा मुलुख जिंकण्याचा सपाटा सुरु केला आहे. तसेच आपले जे शत्रु डच लोक तेही आपल्या शेजारच्या राज्याना मदत करीत आहेत.

महाराज,

प्रस्तुत पत्राची एक प्रत महाराजाना 'कारव्हेल'वर पाठविली आहे. तीत आम्ही इकडील राजकीय घडामोडीचा वृत्तांत दिला आहे. आदिलशहाच्या मनांत आमच्याशीं युद्ध करायचे होते व या कामी त्याला वोलांदेज[1] लोक मदत करण्यास तयार होते. गेल्या उन्हाळ्यांत आदिलशहाने युद्धाची जय्यत तयारी केली. परंतु आम्हाला वाटत होते की तो आमच्यावर हल्ला करणार नाही. त्याचे कारण हे की, मोगल बादशहाचा[2] पुत्र औरंगजेब ह्याने त्याच्यावर सैन्य धाडले होते. परंतु औरंगजेबाशीं त्याने तह केला व याच सुमारास मोगल बादशहाचे निधन झाले.[3] त्यामुळें आदिलशहाला मोकळीक मिळाल्याने आमच्याशीं युद्ध करण्याचा त्याचा निर्धार कायम झाला. या कामी त्याला त्याच्या सरदारांकडून कितपत मदत होणार होती हा प्रश्न वेगळा. कारण ते त्याला जुमानीत नाहीत. आम्ही आदिलशहाकडे आमचा वकील पाठवून त्याला कळविले कीं, त्याचा बाप वारला, तेव्हां आदिलशाहीवरील त्याचा वारसा हक्क आम्ही त्वरीत मान्य केला होता, हे त्याने आठवावे. त्याच्या या शहरांतील वकिला मार्फतहि आम्ही त्याच्याकडे शिष्टाई केली. यांत बरेच दिवस गेले. त्या दरम्यान उन्हाळ्यामध्यें आमच्या आरमाराला लश्करी हालचाली कराव्या लागल्या. पावसाळ्यामध्येंहि आणखी काही घडामोडी घडल्या. त्यांचा समग्र तपशील महाराजाना आम्ही यापूर्वी इंग्लंडमार्गे व कारव्हेलवर पाठविलेल्या पत्रांतून सादर केला आहे. त्या पत्रांच्या नकला महाराजांकडे या पत्रा समवेत पाठविण्यात येत आहेत. आमचा वकील आदिलशहाकडून हात हलवित परत आला. आदिलशहाने त्याला दाद दिली नाही. परंतु शिष्टाई

१. डच; २. शहाजहान; ३. बरोबर नाही. शहाजहान मरण पावल्याची नुसती हूल उठली होती. तो १६६६ साली मरण पावला.

जरी निष्फळ झाली असली तरी त्या पायी आम्हाला सुमारें एक लक्ष अश्रफींचा भुर्दंड बसला. आमची शिष्टाई यशस्वी होऊं शकली नाही, त्याला परिस्थिती कारणीभूत आहे. आमचे प्रतीस्पर्धी जे वोलांदेज हे आमच्या शेजाऱ्याना आमच्या विरुद्ध चिथावणी देत असतात. आणि जे देशी सत्ताधारी महत्वाकांक्षी आहेत ते ह्या कारवायाना बळी पडतात. तरीहि आम्ही जागरूक आहोत.

काही दिवसां मागे आदिलशहाचा एक सरदार रणदुल्ला खान याचा पुत्र रुस्तुम झम्मा हा लखम सावंत याचा मोड करण्यासाठी मोठे सैन्य घेऊन कोकणात उतरला. लखम सावंत हा देसाई तसा काही आदिलशहाच्या मानाने बलाढ्य नाही. पण शूर आहे. त्याने रुस्तुम झम्माचे सुमारे दीड हजार सैन्य ठार केले असे आम्हाला कळले आहे. तरीही रुस्तुम झम्माने त्याचा एक गड काबीज करण्यात यश मिळविले. युद्ध करून नव्हे, तर गडावरील लोकांना फितुर करून. नंतर रुस्तुम झम्मा वोलांदेज लोकांचा पाहुणचार घेण्यासाठी वेंगुर्ल्यास गेला. अम्हास बातमी कळली आहे की रुस्तुम झम्मा व वोलांदेज यांची आमच्या विरुद्ध कारवाया करण्याची बोलणी झाली. त्या दरम्यान चार दिवसांमागे आदिलशहाकडून आम्हाला पत्र आले की, इकडील पद्धतीस अनुसरून आम्ही रुस्तुम झम्माकडे आमचा एकादा मनुष्य पाठवावा. असें कळते की, आदिलशहाचा शहा साहेब या नावाचा एक जुना सरदार जो औरंगजेबाकडे तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी गेला होता, तो तहाची कलमे घेऊन विजापुरास परतला आहे. आदिलशहाला या तहामुळें उसंत मिळाली असल्याने आमच्या बार्देश आणि साष्टी ह्या दोन्ही प्रांताना त्याच्या सैन्याचा उपद्रव पोहोचण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यांतच वोलांदेज आणि मुसलमान यांच्या युतीचाहि धोका आहे. पहिली समुद्रावरील शक्ती आहे, तर दुसरी जमिनीवरील आहे. आमच्या ताब्यांत जो प्रदेश आहे तो दूरचा असून सलग नाही. त्यामुळे त्यांचे परिणामकारकपणे रक्षण करणे ही एक कठीण गोष्ट आहे. परंतु देवावर आमची श्रद्धा असल्याने युद्ध झाले तर आम्ही आमच्या शत्रूंचा यशस्वीपणे प्रतीकार करूं असा मला भरवंसा वाटतो. भीती आहे ती वोलांदेजांकडून. त्यांनी जर आमच्याशीं युद्ध पुकारले तर त्यांचे आरमार आमच्या बंदरांची कोंडी करील व त्यामुळें आमचा व्यापार बंद पडू शकेल.

एक समाधानाची गोष्ट ही की, आदिलशहाचा एक जुना सरदार शहाजी याचा पुत्र शिवाजी याने आदिलशहाविरुद्ध बंड करून त्याचा प्रदेश घेण्याचा सपाटा सुरूं केला आहे.

मोगल बादशहाचा पुत्र औरंगजेब हा आपल्या राज्याचा विस्तार सगळीकडे करीत आहे. कर्नाटकचा राजा शिवाप्पा नायक याच्याशी वोलांदेजानी संदर्भ लावला असून होनावर आणि बार्सिलोर येथें वखारी सुरू करण्याबाबत त्यानी त्याच्याकडून

सनदा मिळविल्या असल्याची बातमी आहे. मंगलोर येथें वोलांदेजांची वखार आहेच. कर्नाटकाच्या राजाशीं आमचा पूर्वापार संबंध आहे. कारण आमच्या शहराला त्याच्या राज्यांतून धान्याचा पुरवठा होतो. त्याने परवां आम्हाला एक पत्र पाठविले आहे. परंतु तें जुन्या पद्धतीचे असून आजच्या शिष्टाचारांना धरून नाही.

कँडीच्या राजाच्या आणि वोलांदेजांच्या कटकटी सुरूं आहेत. कँडीच्या राजाने आम्हाला जे पत्र पाठविलें त्याची नक्कल महाराजांच्या अवलोकनार्थ या पत्रासमवेत पाठविण्यात येत आहे. परंतु ज्या अर्थी वोलांदेजांचा विजय होत आहे व कँडीचा राजा हार खात आहे त्याअर्थी त्याला मदत करण्यांत काही अर्थ नाही, असें आम्हास वाटते.

ईश्वर महाराजांचे रक्षण करो.*

गोवा, दि. १५ मे १६५८
फ्रान्सिश्कु द काश्त्रु
आंतोनियु द सौझ कौतिन्यू

क्र. २ **गोवा, दि. १९ जुलै १६५९**

शिवाजी महाराजांनी एका पोर्तुगीज कारागीरा करवी वीस युद्धनौका बांधावयास घेतल्या असतां वसई येथील पोर्तुगीज कॅप्टनने या कामांत कशी विघ्ने आणली त्याचा वृत्तांत प्रस्तुत कागदांत आहे. शिवाजी महाराजांच्या आरमारांत वीस युद्धनौकांची भर पडली,तर ते आरमारी सामर्थ्यांत आपणाहून वरचढ होतील अशी भीती पोर्तुगीजाना वाटली.

दि. १९ जुलै १६५९ या दिवशी गोव्याच्या किल्ल्यांतील दिवाणखान्यात राज्य सल्लागार मंडळाची बैठक भरली. तिला गव्हर्नर आंतोनियु मेलु द काश्त्रु व आंतोनियु द सौझ कौतिन्यु या दोघांखेरीज राज्य सल्लागार मंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते. सभेच्या मुख्य कामकाजांत शिवाजी राजे यांच्याकडून आलेल्या पत्राचा अंतर्भाव झालेला होता. शिवाजी राजे यांची तक्रार अशी की, त्यांचे घोडदळ आणि पायदळ दांड्याच्या सिद्दीवर हल्ला करीत असतां चौल आणि वसई येथील पोर्तुगीज अधिकारी सिद्दीस दारूगोळ्याची आणि अन्नधान्याची मदत करीत असतात. ह्या मदतीमुळें आपला हल्ला यशस्वी होत नाही. शिवाजी राजे यांचा असा आरोप आहे की, पोर्तुगीजांचे हे कृत्य मैत्रीला बाध आणणारे

* Moncoes de Reino No 26; pp, 78–79

आहे. त्यांचे म्हणणे आहे की, मान्यवर गव्हर्नरानी चौल आणि वसई येथील पोर्तुगीज अधिकाऱ्याना पत्रे पाठवून सिद्दीला मदत करण्यापासून त्यांना परावृत्त करावे.

शिवाजी राजे यांच्या पत्राचा आशय समजून घेतल्यावर राज्य सल्लागार मंडळाच्या सर्व सभासदांनी सल्ला दिला की, चौलचा कॅप्टन व वसईचा कॅप्टन या दोघांचे सिद्दीस मदत करण्याचे धोरण शिवाजी राजे व पोर्तुगीज हिंदुस्थान यांच्यामधील मैत्रीला बाध आणणारे असल्याने त्याना या पुढे सिद्दीस मदत न पाठविण्याबाबत मान्यवर गव्हर्नरानी आज्ञा करावी. शिवाजी राजे यानी सबंध कोंकण प्रदेश, कल्याण व भिवंडी ही ठाणी घेतली असल्याने ते अत्यंत बलाढ्य बनले आहेत. अशा परिस्थितींत त्यांचा रोष ओढवून घेणे आमच्या हिताचे नाही. तरीही चौल व वसई येथील अधिकाऱ्यांना सिद्दीस मदत करायचीच असेल, तर त्यानी ती उघडपणे न करतां शिवाजी राजे याना तिचा सुगावा लागणार नाही अशा रीतीने काळजीपूर्वक करावी. राज्य सल्लागार मंडळाच्या याच बैठकीत वसईच्या कॅप्टनने याच वर्षाच्या एकोणीस जूनला जे पत्र गव्हर्नराना लिहिले, त्याचे वाचन करण्याचा हुकूम झाला. वसईचा कॅप्टन लिहित होता की, शिवाजी राजे यानी भिवंडी, कल्याण आणि पेण या ठिकाणी वीस युद्धनौका दांडयाच्या सिद्दीशी युद्ध करण्यासाठी बांधावयास घेतल्या असून हे काम त्यानी रुइ लैतांव व्हिएगस[1] याच्याकडे सोपविले आहे.

---

१. शिवाजी महाराजानी पेण येथें आरमारी युद्धनौका बांधण्यासाठीं रुइ लैतांव व्हिएगस या नावाच्या पोर्तुगीज कारागीराची नेमणूक केली होती. त्याने ह्या कामाबाबत दि. ७ आक्टोबर १६५९ या दिवशी मुंबई येथे जे निवेदन केले त्याचा आशय असा आहे : "मी रुइ लैतांव व्हिएगस जाहीर करतो की मी शिवाजी राजे यांच्याकडे कल्याण येथे कामाला होतो. माझ्या हाताखाली काही गोरे आणि काळे लोक होते. शिवाजी राजे यानी पेण येथे व अन्यत्र ज्या वीस युद्धनौका बांधावयास घेतल्या होत्या, त्या दांडयाच्या सिद्दीच्या जिंजिऱ्यास वेढा घालण्यासाठी असे त्यानी जाहीर केले होते. ह्या कामावर मी देखरेख करीत असता एके दिवशी वसईचे कॅप्टन यानी माझ्याकडे ज्युआंव द सालाझार याना पाठवून मला कळविले की, तुम्ही जर शिवाजीच्या आरमाराचे काम बंद पाडलेत तर तुमच्याकडून तुमच्या देशाची आणि राजाची मोठीच सेवा होणार आहे. मी माझ्या राजाचा इमानी प्रजाजन असल्याने त्यांच्या हितसंबंधाना बाध येईल असे कृत्य माझ्या हातून होता कामा नये असा विचार करून वसईच्या कॅप्टनचा आदेश पाळण्याचे ठरविले. माझ्या हाताखाली तीनशे चाळीस गोरे, काळे लोक, बायकामुले आणि नोकर होते. ते सर्व लोक एकूण चारशे आणि शिवाय बाटगे लोक होते ते वेगळेच. आम्ही सर्व लोकानी शिवाजीची नोकरी सोडून इकडे येण्याचा निर्णय घेतला. काम अत्यंत जोखमीचे, आणि धाडसाचे होते. त्यांत ज्युआंव द सालाझार यानी मोठाच धोका पत्करला. मी माझ्या सर्व लोकांसह मुंबईला आलो तो युरोपच्या शत्रूला तोंड देण्यासाठी. ह्या कामासाठी सर्व खर्च मलाच करावा लागला. (Documentos Avulsos relativos a India Caixa No. 25) वसईचा कॅप्टन आपल्या निवेदनात म्हणतो : " दांड्याच्या सिद्दीच्या जिंजिऱ्यास वेढा घालण्याच्या

पण ह्या आरमारासाठीं जे लाकूड लागणार आहे तें आमच्या बंदरातून नेण्याची परवानगी त्यानी मागितली आहे. परंतु ही परवानगी त्याना देणे आमच्या हिताचे नाही. त्याचे कारण हे की, त्यानी जर वीस युद्धनौका बांधून पूर्ण केल्या, तर त्यांच्या आरमारी सामर्थ्यांत मोठी भर पडून ते बलाढ्य बनतील. त्यांचा आम्हाला उपसर्ग होईल अशी भीती बाळगण्याचे कारण की, त्यांची आणि आमची जी मैत्री आहे ती टिकाऊ स्वरूपाची आहे असे म्हणता येत नाही. आपण आरमार सिद्दीशी युद्ध करण्यासाठीं बांधीत आहोत असें ते जरी सांगत असले, तरी ह्या आरमाराचा धोका आमच्या साष्टी बेटाला पोहोचणार नाही याची हमी कोण देईल ? कारण, साष्टी बेटाचें खरें संरक्षण म्हणजे ठाणे नदी आहे. शिवाजी राजे जर आरमार बांधण्यात यशस्वी झाले, तर त्याना साष्टी बेटाकडे या नदीतून आरमार नेता येईल. तरी मान्यवर गव्हर्नरांना आमची विनंती आहे की, त्यानी ह्या प्रश्नाबाबत त्वरीत निर्णय घेऊन मला पुढील कारवाईचा आदेश द्यावा. या संबंधी माझे मत स्पष्ट आहे. आमचे आरमारी सामर्थ्य मर्यादीत आहे, आणि त्याची जाणीव मान्यवर गव्हर्नरानाहि आहे. त्यामुळें शिवाजी राजे यांची आरमार बांधण्याची योजना सर्व बाजूनी प्रयत्न करून निष्फळ करून टाकली पाहिजे. त्यांचे सर्व मार्ग आपण रोखून धरले पाहिजेत. त्याच बरोबर गव्हर्नर महाशयाना माझी सूचना आहे की, त्यानी वसई येथे दहा किंवा बारा युद्धनौका बांधण्याची आज्ञा मला करावी. या युद्धनौकांचा उपयोग काफिल्यांच्या संरक्षणासाठी करतां येईल. या सूचने प्रमाणेच वसईचे किल्ले बळकट करण्याची आवश्यकताहि आता निर्माण झाली आहे. हे किल्ले बळकट झाल्याखेरीज शत्रूला आमचा वचक वाटणार नाही. या संदर्भात सुरत येथून आलेल्या एका बातमीकडे मी मान्यवर गव्हर्नरांचे लक्ष वेधीत आहे. पुढच्या वर्षी मोगल बादशहा आमच्याशी युद्ध करणार असल्याची ती बातमी आहे. ही बातमी खरी असो वा खोटी असो परंतु ज्या अर्थी ती आली आहे त्या अर्थी आपण तयारीने असलेले बरे.

राज्य सल्लागार मंडळाच्या सदस्यानी वसईच्या कॅप्टनच्या पत्राचा विचार केला व गव्हर्नर महाशयाना सल्ला दिला की, शिवाजी राजे यांच्या युद्धनौकाना ठाण्याच्या

उद्देशाने शिवाजी राजे यानी कल्याण, भिवंडी, आणि पेण येथे वीस आरमारी नौका बांधावयास घेतल्या होत्या. ह्या कामावर रुइ लैतांव व्हिएगास व त्यांचा मुलगा फेर्नांव व्हिएगास यांची नेमणूक करण्यात आली होती. शिवाजी राजे यानी सबंद कोकण घेतल्याने ते फार बलाढ्य बनले आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या आरमारात वीस युद्धनौकांची जर भर पडली, तर त्यांपासून आमच्या प्रदेशांतील नद्याना व विशेषेकरून साष्टी बेटांतील खेड्याना धोका पोहोचण्याची भीती होती. म्हणून ह्या युद्धनौका कोणत्याहि परिस्थितीत तयार होता कामा नयेत असे मला वाटले व मी रुइ लैतांव व्हिएगस याना ते सोडावयास लावण्यास प्रवृत्त करण्यासाठी ज्युआंव द सालाझार न्हाश्कोंसेलुश याना त्यांच्याकडे रवाना केले. त्यानी ती कामगिरी चोख बजावली. (Documentos Avulsos relativos a India Caixa No. 25)

नदींतून व वसईच्या खाडींतून संचार करण्यास प्रतिबंध करण्याची आज्ञा त्यानी वसईच्या कॅप्टनला करावी. आणि शिवाजी राजे यानी जर कॅप्टनचा आदेश धाब्यावर बसविला, तर त्याना विरोध करण्यास वसईच्या कॅप्टनला सांगावे. आणि जर शिवाजी राजे यानी ठाण्याच्या नदीतून आणि वसईच्या खाडींतून आपल्या जहाजांना संचार करूं देण्याची परवानगी मागितली, तर त्याना तशी परवानगी देतां येत नाही असे उत्तर धाडावे. दुसरी गोष्ट पेण येथें शिवाजी राजे यांच्या ज्या युद्धनौका बांधल्या जात आहेत, त्याना अटकाव करण्यासाठी माजगाव, मुंबई, आणि कारंजा येथे काही युद्धनौका तयार ठेवण्यात. अर्थात हे काम गव्हर्नर महाशयाना स्वतःच्या खर्चाने करावे लागेल. आणि त्यानी जर तें केले तर त्यांच्या हातून देशाची आणि राजाची मोठीच सेवा घडेल. पण त्याना जर हा खर्च झेपत नसेल, तर त्यानी तो सरकारी महसुलांतून करावा. पण कोणत्याही परिस्थितीत शिवाजी राजे यांच्या युद्धनौका पेण येथून बाहेर पडूं देऊं नयेत.*

क्र. ३ गोवा, इ. स. १६६३ (?)

पोर्तुगीजानी शिवाजी महाराजांच्या प्रजाजनाची एक होडी पकडली होती व एका चोरट्या व्यापाऱ्यास कैदेत ठेवले होते. होडी आणि कैदी मुक्त करावा म्हणून डिचोलीच्या हवालदाराने गोव्याच्या गव्हर्नरना पत्र पाठविले असता त्या पत्रास त्यानी खालील प्रमाणे उत्तर धाडले.

डिचोलीचे हवालदार संभाजी अनंत यांस

डिचोली प्रदेशाचे हवालदार संभाजी अनंत यांची तीन पत्रे मिळाली. त्यांचे उत्तर आज पाठवित आहोत. आपल्या पहिल्या पत्रात त्यानी मागणी केली आहे की, त्यांच्या प्रदेशांतील जी एक होडी नारवे येथील ठाण्याच्या कॅप्टनने पकडली ती सोडून देण्यात यावी. या प्रकरणी आम्ही चौकशी केली असता आम्हाला जी माहिती मिळाली ती अशी : सदर्हू होडीतून सांतु इश्तेव्हांव बेटावरील भात बिन परवाना चोरून नेण्यात येत असतां सबळ पुरव्यानिशी नार्वेच्या कॅप्टनने ती पकडली. हवालदार ज्या अर्थी प्रस्तुत होडी सोडून द्यावी म्हणून विनंती करतात त्या अर्थी त्यांच्या विनंतीस मान देऊन होडी सोडून देण्यात येत आहे. परंतु त्यानी समजून रहावे की यापुढे जर एखादि होडी या परिस्थितीत सांपडली, तर ती जाळून टाकली जाईल.

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, No. 3

दुसऱ्या पत्रांत हवालदारानी कृष्ण फरास या नावाच्या इसमास मुक्त करण्याची विनंती केली आहे. हा इसम आमच्या हद्दीतून गंधक चोरून नेत असताना पकडला गेला होता. या राज्यांतून दुसऱ्या राज्यांत गंधक नेण्यास शाही हुकुमान्वये बंदी आहे. या गुन्ह्यास कडक शिक्षा सांगितली आहे. परंतु हवालदाराच्या विनंतीची कदर करून कृष्ण फरास याला मुक्त करण्यात आले आहे.

तिसऱ्या पत्रात हवालदारानी तक्रार केली आहे की, मक्केहून आलेल्या एका गलबतावर कॅप्टन आंतोनियु पाइश द कार्व्हाल्यु यानी कापडाने भरलेली एक पेटी पकडली.......... या तक्रारीची चौकशी करण्याचे काम आमच्या उत्तरेकडील प्रदेशाच्या सेनापतीकडे सोपविण्यात आले असून आमच्या वसईच्या कॅप्टनकडून तत्संबंधीचा अहवाल.................................... *

दों फ्रेइ आंतोनियु ब्रांदाव आर्चबिशप प्रिमाज
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ४ गोवा, दि. १६ एप्रिल १६६३

त्र्यंबक काळो हरभटराव या नावाच्या मोगल बादशहाच्या सरदाराने गोव्याच्या हद्दीत आश्रय घेतलेल्या बंडखोरांना हद्दपार करावे म्हणून गोव्याच्या गव्हर्नरला पत्र पाठविले होते. त्या पत्रास गव्हर्नरने खालील उत्तर पाठविले.

त्र्यंबक काळो हरभट राव यांस

आपल्या पत्रावरून कळले की, आपणाला बादशहा...............यानी घोडदळ आणि पायदळ देऊन कोकणात पाठविले आहे. याच पत्रांत आपण माझ्याकडे मागणी .... भटग्राम येथील रवळू शेणवी, केशव नाईक व पेडणे येथील केशव प्रभु ....हद्दपार करावे. कुणी शेख मलिक यांच्या शिफार-शीवरून मी या लोकाना बार्देशमध्यें आश्रम दिला होता. मी हुकूम तहकूब ठेवला त्याचे कारण हे की, बादशहाच्या वकीलाने मला सांगितले की, लखम सावंताच्या हालचाली बादशहाच्या आज्ञेनुसार होत आहेत. आपल्या पत्रावरून माझा गैरसमज दूर झाला. प्रत्येकाने आपापल्या राज्यांत रहावे हें आतां कळले. असें झालें तर बंडखोराना योग्य ते शासन होईल यात शंका नाही.

आपल्या पत्राचा आशय ध्यानी आला आहे व तदनुसार पाऊल टाकीत आहे. इकडे आपले एकादे काम असल्यास ते करण्यास मला आनंद वाटेल.†

दि. १६ एप्रिल १६६३
आंतोनियु द मेलु द कास्त्रु

* Reis Vizinhos No 2. pp 10–10V
† Reis Vizinhos No. 2 pp 15

क्र. ५ **गोवा, दि. ३ जून १६६४**

विजापूरच्या सैन्यापासून गोव्याच्या हद्दीत आक्रमण होण्याचा धोका निर्माण झाला असतां गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळाने गोव्याच्या व्हाइसरॉयला खालील सल्ला दिला.

दि. ३ जून १६६४ या दिवशी हिंदुस्थानचे व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल आंतोनियु मेलु द काश्त्रु यानी ज्युआंव द प्रादु यांचे निवासस्थानी राज्य सल्लागार मंडळाची बैठक पाचारण केली. व्हिसेरेइ यानी सल्लागार मंडळाच्या सदस्यांसमोर निवेदन केले की, अली आदिलशहाचा सरदार अजिजखान याने शिवाजीची कुडाळ[1] येथील ठाणीं जिंकण्यांत यश मिळविल्याची दोन पत्रे आपणास आली आहेत. या पत्रांपैकी एक पत्र थिवीच्या कॅप्टनचे असून दुसरे नांदोडे, रिवोडें आणि पीर्णचे मोकासदार हिरबा राणे यांचे आहे. दोघेहि पत्र लेखक म्हणतात कीं, अजिजखान हा आमच्या बार्देश प्रांताच्या सिमेला लागून असलेल्या बंदराचे रोखाने निघाला आहे. तरी अजिजखानाने आमच्या सरहद्दीत आक्रमण केले, तर कोणती उपाययोजना करावी तत्संबंधी मान्यवर सल्लागारानी सल्ला द्यावा.

सर्व सल्लागारानी एकमताने सल्ला दिला की, व्हिसेरेइ महाशय यानी सरहद्दींचें संरक्षण मजबूद करण्यासाठी रेइशमागुश किल्ल्यांतील मिश्रवर्णी शिपायांची तुकडी थिवीला व आग्वादच्या किल्ल्यांतील पोर्तुगीज शिपायांची तुकडी कोळवाळला त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.*

क्र. ६ **गोवा, दि. २८ जून १६६४**

आदिलशहा विरुद्ध बंड करून गोव्याच्या आश्रयास येऊन राहिलेल्या बंडखोर देसायांना आपल्या हवालीं करावे अशी मागणी कोकणांतील आदिलशहाच्या सुभेदाराने गोव्याच्या व्हिसेरेइकडे केली होती. गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळाने सुभेदाराची मागणी फेटाळून लावली.

दि. २८ जून १६६४ या दिवशी गोव्याच्या किल्ल्यांतील शाही दिवाणखान्यात राज्य सल्लागार मंडळाची बैठक व्हिसेरेइ आंतोनियु मेलू द काश्त्रू यानी बोलविली.

१. शिवाजी महाराजांनी कुडाळ प्रांत १६६४ च्या मे महिन्यात घेतला. या वेळी त्यांच्या सैन्यात चार हजार घोडदळ आणि दहा हजार पायदळ होते. त्यांनी कुडाळ प्रांत घेतल्यावर आदिलशहाने कुडाळ प्रांतांत आपले सैन्य पाठविले असावे.

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, No. 14

त्यानी सल्लागार मंडळासमोर निवेदन केले की, विजापूरच्या राज्यांत बंडाळी माजवून आदिलशहाच्या अवकृपेस पात्र झालेली जी देसाई[1] मंडळी आमच्या राज्याच्या आश्रयास येऊन राहिली आहे, तिला आपल्या हवाली करावे अशी मागणी आदिलशहाचे कोकणातील सरनोबत आणि सुभेदार अझिजखान याने आमच्या राज्यांतील विजापूरचे वकील ख्वाजा महमद सहीद यांच्या मार्फत केली आहे. त्याच प्रमाणे आमच्या आरमारी नौकानी आदिलशहाची जी नौका कारवारच्या नदीत पकडली होती तीहि मुक्त करण्याची मागणी प्रस्तुत पत्रात आहे. तरी या बाबतीत काय कारवाई करावी तें मान्यवर सभासदानी सांगावे. गोव्याच्या आश्रयास येऊन राहिलेल्या देसायाना विजापूरच्या ताब्यात द्यावे कीं देऊं नये तत्संबंधीचा सल्ला देतांना सर्व सल्लागारानी दृष्टिकोण व्यक्त केला की, शरणार्थींना त्यांच्या शत्रूच्या हवाली करण्याची या राज्याची प्रथा नाही. त्यामुळे या राज्याच्या आश्रयास येऊन राहिलेल्या देसायाना आदिलशहाच्या वकिलाच्या ताब्यांत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मात्र या राज्याच्या आणि आमच्या स्वामीच्या ज्या प्रथा आणि परंपरा आहेत त्या आदिलशहाचे कोंकणांतील सुभेदार आणि सरनोबत अझिजखान याना योग्य त्या शद्बांत समजाऊन दिल्या पाहिजेत. पकडलेल्या नौकेचा प्रश्न वाटाघाटीनी सोडविण्यात यावा असे बहुतेक सर्व सभासदांचे मत पडले. प्रस्तुत ठरावावर राज्य सल्लागार मंडळाच्या सर्व सभासदाच्या सह्या आहेत.*

१. कोकणातील देसाई हे मुसलमानी सत्तेविरुद्ध वारंवार उठाव करीत असत असा पुरावा पोर्तुगीज आणि अन्य साधनांतूनहि आढळतो. उदाहरणार्थ गोव्याचा एक व्हिसेरेइ आपल्या राजास हिंदुस्थानातील राजकीय घडामोडीचा आढावा सादर करताना दि. १६ जानेवारी १६९१ या दिवशी लिहिलेल्या पत्रात म्हणतो :
"............इकडे कोंकणात मोगल बादशहाची पकड ढिली पडल्याने व त्याने दिल्लीहून मागविलेली कुमक न आल्याने इकडच्या देसायानी बादशहाची सत्ता झुगारून देऊन राजारामाशीं संधान जुळविले आहे........मुसलमानानी हिंदु मंदिरे व हिंदु स्त्रिया भ्रष्ट करण्याचा सपाटा चालविलेल्याने इथल्या देसायानी त्यांच्या विरुद्ध बंड केले असल्यास नवल नाही."
—डॉ. ए. जी. पवार : ताराबाई कालीन कागदपत्रे खंड १. पृ. ६१

*Assentos do Conselho do Estado Vol IV, Documento No. 43

क्र. ७ गोवा, दि. २५ ऑगष्ट १६६४

शिवाजी महाराज पन्नास युद्धनौका बांधीत असल्याची बातमी चौलच्या पोर्तुगीज कॅप्टनने गोव्याच्या व्हिसेरेइला कळविली होती व त्याच्याकडून पुढील कारवाई बाबत आज्ञापत्र मागविले होते. शिवाजी महाराज कोकणांत बलाढ्य असल्याने त्यांच्या वाटेस जाणे आपल्या हिताचे नाही, असा वैयक्तिक दृष्टिकोण व्हिसेरेइनी राज्य सल्लागार मंडळासमोर व्यक्त केला असता राज्य सल्लागार मंडळाने तो उचलून धरला.

पोर्तुगीज हिंदुस्थानचे व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल यानी दि. २३ ऑगष्ट १६६४ या दिवशी गोव्याच्या किल्ल्यातील शाही सभागृहात राज्य सल्लागार मंडळाची बैठक बोलाविली होती. त्यानी बैठकीसमोर निवेदन केले की, शिवाजीने पन्नास युद्धनौका बांधावयास घेतल्याची बातमी चौलचे कॅप्टन ज्युआंव बॉजिस द सिल्व्हा यानी कळविली आहे. ते म्हणतात की शिवाजी युद्धनौका कोणत्या उद्देशाने बांधतो आहे ते कळण्याचा मार्ग नाही. त्याने सात युद्धनौका वरच्या चौल येथे बांधून तयार केल्या असून त्या तो लवकरच समुद्रात लोटणार आहे. तरी त्याला विरोध करावा की करूं नये तत्संबंधीचे आज्ञापत्र त्वरीत पाठवावे. त्याला जर विरोध करायचा असेल, तर चौलच्या किल्ल्यांत माणसे कमी असल्याने कुमक धाडण्याची व्यवस्था करावी.

व्हिसेरेइ यानी प्रस्तुत ठरावावर राज्य सल्लागार मंडळाचा कौल मागत असता आपला वैयक्तिक दृष्टिकोण व्यक्त करताना सांगितले की, शिवाजी या भागात बलाढ्य असल्याने त्याच्याशी वागताना सबुरीचे धोरण स्वीकारणे आपल्या हिताचे आहे. व्हिसेरेइ यांच्या ह्या दृष्टिकोणाशी बहुतेक सर्व सभासद सहमत झाले. ते म्हणाले की, शिवाजीच्या वाटेस तूर्त न जाण्याचा सल्ला व्हिसेरेइ यानी चौलचे कॅप्टन ज्युआंव बाजिस द सिल्व्हा याना द्यावा. मात्र चौलच्या रक्षणासाठी त्यानी जी सैन्याची कुमक मागितली आहे ती त्याना धाडावी. वसई येथून चौलला पन्नास शिपाई पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रस्तुत ठरावावर सर्व सल्लागारांनी सह्या केल्या.*

* Assentos do Conselho do Estado Vol. IV Documento No. 44

क्र. ८ पानेली, दि. ११ नवंबर १६६४

गोव्याच्या आश्रयास येऊन राहिलेले कृष्ण सावंत हे आपल्या कामगिरीवर परत जात होते. या प्रसंगी गोव्याच्या व्हिसेरेइ यानी त्याना पाठविलेला संदेश

कृष्ण सावंत यांस,

कृष्ण सावंत याना स्थैर्य प्राप्त व्हावे, त्यांची भरभराट व्हावी व जें कार्य त्यानी हाती घेतले आहे त्यांत त्याना यश यावे अशी इच्छा करतो. त्याना जर ह्या राज्याकडून आणि माझ्याकडून मदत हवी असेल, तर ती देण्यास माझ्याकडून कुचराई होणार नाही. याचा प्रत्यय त्याना मागे आलाच आहे. ते ज्या वेळी ह्या राज्याच्या आश्रयास होते, तेव्हां त्याना आमच्याकडून चांगली वागणूक मिळालेली आहे व आम्ही त्यांचा चांगला परामर्ष केला आहे. आतां त्यानी त्यांच्या प्रवासास आनंदाने जाण्यास हरकत नाही.*

पानेली, दि. ११ नवंबर १६६४
आंतोनियु द मेलु द काश्त्रु

क्र. ९ पानेली. दि. ११ नवंबर १६६४

शिवाजी महाराज व खवासखान यांच्यामधील लढाईचा निकाल आपणास कळवावा म्हणून गोव्याच्या व्हिसेरेइचें केशव नाईक व केशव प्रभु याना पत्र

केशव नाईक व केशव प्रभू यांस,

केशव नाईक व केशव प्रभू यानी मला जे पत्र लिहिले ते माझ्या अवलोकनात आले. त्यावरून शिवाजी व खवासखान यांच्या मधील लढाईचा वृत्तांत कळला. प्रस्तुत लढाईच्या निकालाचा पुढील समग्र वृत्तांत त्यानी मला धाडावा.†

पानेली, दि. ११ नवंबर १६६४
आंतोनियु द मेलु द काश्त्रु

* Livro de Reis Vizinhos, No 2, fl 31
† Livro de Reis Vizinhos No. 2, fl 31

क्र. १०   गोवा, दि. ३० नवंबर १६६४

कारवार येथील कांबळी नदीतून दों मानुएल लोबू द सिल्व्हैरा हा पोर्तुगीज नाविक अधिकारी गोव्याच्या व्हिसेरेइला लिहितो की, शिवाजी महाराजांचे कारवारला आगमन होत असल्याची बातमी इकडे आल्याने सर्वत्र घबराट माजला आहे. तरी होनावरच्या किल्ल्याचे रक्षण करण्यासाठी सहा युद्धनौका पाठवाव्या.

महाराज,

या भागांत शिवाजीची मोठीच दहशत पसरली आहे. तरी महाराज माझी आपणाला विनंती आहे की, तो जर या बाजूने येत असेल, तर त्याचे आरमार होनावरला येण्यापूर्वी आपण सहा नौका इकडे धाडण्याची आज्ञा करावी. होनावरचा किल्ला आणि बंदर आपल्या ताब्यांत असल्याने त्याच्या रक्षणाची व्यवस्था आपण केली पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, शिवाजीचें जर इकडे आगमन झाले, तर हा सर्व प्रदेश निर्मनुष्य होईल, म्हणजे सर्व लोक त्याच्या भयाने पळून जातील. मिरजान, अंकोला, सिवेश्वर आणि कारवार येथे प्रतिकाराची तयारी चालू असून भीतीचे वातावरण पसरले आहे. आणि त्याने जर हे सर्व किल्ले घेतले, तर त्याला होनावरचा किल्ला घेण्याची इच्छा झाल्यावांचून राहाणार नाही.

शिवाजी जर या भागांत येत असेल, तर त्याच्या आरमारांत किती नौका असतील त्याची पूर्व सूचना आपण मला द्यावी. तसेंच त्याची आणि आमची गांठ पडली तर मी कसें वागायचे तेंहि आपण मला कळवावे. तो इकडे येत असल्याची बातमी आहेच. तसें झाले तर तो होनावर बंदरात शिरल्यावांचून राहणार नाही. म्हणून मला तयारीने राहाणे आवश्यक आहे. नारायण[1] मालो यानी मला दुमिंगिश द गेररा यांच्याकडे निरोप धाडला आहे की, आपल्या निर्धाराबद्दल निःशंक असावे. शिवाजी या भागांत येत असल्याची बातमी त्याला कळली असून त्या बातमीने सर्वत्र खळबळ माजली असल्याचें वृत्त आहे. पण ज्या अर्थी नारायण मालो म्हणत आहेत की, त्यांचा निर्धार कायम आहे त्या अर्थी त्यानी सर्व तयारी केली असेल यांत शंका नाही.

माझा असा कयास आहे की, ते काळे (शिवाजीचें सैन्य) जर इकडे आले तर त्यांच्यापासून आपले रक्षण व्हावे म्हणून इकडचे सत्ताधारी आपणाला मदत करतील. कारण आपणाशिवाय त्यांच्या बंदरांचे आणखी कुणी रक्षण करूं शकणार नाही. त्याने मला आणखी सांगितले की गोव्याहून त्याला जी बातमी

१. नारायण मालो हा बिदनूरच्या राजाचा पंतप्रधान

मिळाली आहे तिच्यावरून शिवाजीच्या भयाने गोव्याच्या बंदरातून एकही नौका सुटणार नाही............

ईश्वर आपले रक्षण करो.*

सां जासितु गलबत, कांबोळी नदी, दि. ३० नवंबर १६६४

आपला सेवक
सही : दों मानुएल लोबु द सिल्वैरा

क्र. ११   पानेली गोवा, दि. ८ डिसेंबर १६६४

शिवाजी महाराजांच्या कबजांतून वेंगुर्ला बंदर मुक्त झाल्याबद्दल गोव्याचा व्हिसेरेइ वेंगुर्ल्याच्या मुसलमान हवालदारास पत्र पाठवून त्याचे अभिनंदन करीत आहे. हवालदारास मदत लागेल तर ती देण्याचीहि इच्छा त्याने पत्रांत दर्शविली आहे.

वेंगुर्ल्याचे ......

शिवाजीच्या जुलुमांतून आपण मुक्त झालांत हें पाहून मला आनंद झाला .... माझ्या सदिच्छा आपणाला आहेतच. आपणाला जेव्हां माझ्याकडून काही हवे असेल तर माझ्या सदिच्छेची प्रचिती आपणाला आल्या वांचून राहणार नाही, याची मला खात्री आहे. हा वखारवाला तिकडे जात आहे. आपणाला आमच्या कडून एकादि गोष्ट हवी असल्यास ती पुरविण्यास आम्हाला आनंद वाटेल. आपण निःशंक मनाने आज्ञा करावी. आपणाकडूनहि आम्ही याच सद्भावाची अपेक्षा करीत आहोत. आमच्या राज्यांतून तिकडे जाणाऱ्या माणसांना चांगली वागणूक मिळेल अशी मी आशा बाळगतो. ईश्वर आपले कल्याण करो.†

पानेली, दि. ८ डिसेंबर १६६४
आंतोनियु द मेलू द काश्त्रु

क्र. १२   गोवा, दि. १३ डिसेंबर १६६४

गोव्याच्या आश्रयास येऊन राहिलेल्या विजापूर राज्यांतील कांही बंडखोर देसायांची विजापूरचा सरदार खवासखान याने पोर्तुगीजांकडे मागणी केली होती. गोव्याचा व्हिसेरेइ त्याला कळवितो की, सदरहू देसायाना परत पाठविता येणार नाही. देसायांचे शिवाजी महाराजांशी संगनमत असल्याचा विजापूरच्या सरदाराना संशय होता.

* Livro das Moncoes do Reino, no 31, pgs 112–113
† Livro de Reis Vizinhos No. 2 fls 32

आदिलशहाचे कोकणांतील सरदार खवासखान यांस.

आपल्या पत्रांत जो मजकूर आहे, त्या विषयी मी आपणाला अनेकदां लिहिले आहे. आदिलशहाशीं आमचा जो तह आहे त्या तहाच्या कलमां विरुद्ध आमच्या राज्याच्या आश्रयास असलेल्या माणसांची आपण मागणी करतां हे पाहून मला आश्चर्य वाटते. आपण म्हणतां केशव नाईक यानी गुन्हे केले आहेत. परंतु मी आपणाला कळवूं इच्छितो, की त्यांच्या हातून कोणत्याच प्रकारचे गुन्हे घडलेले नाहीत की त्यानी शिवाजीशीहि संगनमत केलेले नाही. उलट शिवाजीलाच केशव नाईक याच्या विषयी अविश्वास वाटतो. इतर देसायांच्या बाबतींतही अशीच गोष्ट आहे. वेंगुर्ल्यातून बाहेर पडल्यापासून ते येथे सुरक्षित आहेत. तीच त्यांची इच्छा होती. माझी आपणाला सूचना आहे की, आपणाला हा सल्ला कुणी दिला आणि तो बरोबर होता की नाही त्याचा आपण तपास करावा. आम्ही पोर्तुगीज लोक प्रत्येक वेळी योग्य त्या प्रमाणे वागलों आहोत. लखम सावंत आमच्यासाठी काम करीत आहे .... कृष्ण सावंत कुडाळ येथें असून शिवाजीचा प्रतिकार करीत आहे, अशी बातमी मला कळली आहे ....

....

गोवा, दि. १३ डिसेंबर १६६४
आंतोनियु द मेलु द काश्त्रु*

क्र. १३

गोवा. दि. २६ मार्च १६६५

पत्राचा सुरुवातीचा भाग कसरीने खाल्ला असल्याने ते कुणाला उद्देशून लिहिले आहे तें कळू शकत नाही. शिवाजी महाराजांचे जकात अधिकारी गोव्याच्या गोणीच्या बैलांना आड मार्गाने यायला सांगतात व त्यांच्याकडून जादा जकात वसूल करतात, अशी तक्रार गोव्याच्या व्हिसेरेइने पत्रांत केली आहे. हा गैर प्रकार बंद झाला नाही तर उपाय योजना करावी लागेल अशी गर्भित धमकी पत्रांत आहे.

जी दोन गलबते इकडे आली होती ती लगेच परत गेली. शापोरा येथे थांबलेले गलबतहि गेले. परंतु चिंच भरलेली जी होडी शिवाजी राजे यांच्या आरमाराने पकडली ती अद्याप सोडून देण्यात आलेली नाही. तिच्यावर असलेली माणसे साष्टी येथील आहेत. प्रस्तुत होडीची मुक्तता विनाविलंब झाली पाहिजे.

माझ्या कानावर आले आहे की, बालाघाटहून बार्देशला जे गोणीचे बैल धान्य आणि इतर जीवनोपयोगी वस्तू आणतात, त्याना तुम्ही नेहमीच्या वाटेने येऊं न

* Livro de Reis Vizinhos No. 2, fl 33

देतां दुसऱ्या वाटेने यावयास सांगता व त्यांच्याकडून जादा जकात वसूल करता. हा प्रकार वेगळा दिसतो. हा भुर्दंड आम्ही का म्हणून भरावा ते मला समजत नाही. मी हें कधींच मान्य करणार नाही. मी आपणाला इशारा देतो की, याउप्पर आपण आमच्या गोणींच्या बैलाना ठरलेल्या रस्त्यापेक्षां वेगळचा रस्त्याने यावयास सांगून त्यांच्याकडून जादा जकात वसूल करूं नये. तसेंच जादा जकातीचे जे पैसे वसूल करण्यांत आले आहेत ते परत करण्याचा हुकूम आपण करावा. आपणाकडून मी या प्रश्नाबाबत खुलाशाची अपेक्षा करीत आहे. आपणाकडून जर समाधानकारक खुलासा आला नाही, तर माझ्या स्वामीच्या प्रतीष्ठेला बाध येणार नाही, अशा रीतीने मी पाऊल टाकीन. आम्ही आमच्या स्वामीचे सेवक असल्याने आमचे कर्तव्य आम्हाला पार पाडावे लागते. .... आपण ज्या माणसासंबंधी लिहिले आहे ....कायद्याप्रमाणे न्यायालयें न्याय-निवाडा करतात .... इच्छेचा ....*

गोवा, दि. २६ मार्च १६६५.
आंतोनियु द मेलु द काश्त्रु

क्र. १४

गोवा, दि. ३१ मार्च १६६५

गोव्याच्या व्हिसेरेइने मोगल बादशहाच्या पदरी असलेल्या पोर्तुगीज अधिकाऱ्याना उद्देशून लिहिलेले हे पत्र आहे. पत्राच्या सुरुवातीचा काहीं भाग कसरीने खाल्ला असल्याने त्याचा संदर्भ नीट लागत नाही. लोदी खानाने पोर्तुगीजांच्या वसईकडील भागात जी स्वारी केली होती, त्या बाबतचे हे पत्र आहे पोर्तुगीज लोक शिवाजी महाराजांना मोगल बादशहा विरुद्ध चोरून मदत करतात असा संशय लोदीखानास आल्याने त्याने पोर्तुगीज प्रदेशांत आक्रमण केले होते.

मोगल बादशहाचे ख्रिचन सरदार यांस

फ्रान्सिश्कु द मेलु व दि योगु द मेलु यांची पत्रे मिळाली. माझी कारणे... . . एकाच धर्माचे..........खोटचा आळांपासून आमचा बचाव केला आहे.......... मला मोठे समाधान वाटेल. मी सरदार महाराजा जयसिंग यांना उत्तर पाठवित आहे. शिवाजीस मदत करण्यास..............गेल्या वर्षी सरदार लोदीखान याने आमच्या प्रदेशावर स्वारी केल्याने मला धक्काच बसला. कारण ही स्वारी बेअन्याय होती. लोदी खानाने आमच्या गरीब प्रजेची जी लुटालुट केली तिची नुकसान भरपायी औरंगजेब बादशहा करतील अशी मला आशा आहे. त्याच

* Livro dos Reis Vizinhos No. 2, fls 37

बरोबर बादशहाची आज्ञा नसताना लोदीखान व इतरांनी हें जें आक्रमण केले त्याबद्दल बादशहाकडून त्याना शिक्षा झाली पाहिजे. माझ्या इच्छेविरुद्ध शिवाजीकडे काही पोर्तुगीज माणसें नोकरीला आहेत हें खरें आहे. पण शिवाजी प्रमाणेच मोगल बादशहा, आदिलशहा, कर्नाटकाचा राजा, गोवळकोंडा, बंगाल, वगैरे ठिकाणीहि पोर्तुगीज लोक नोकरी करतात. त्याना नोकरी सोडावयास लावणें हे माझ्या हातात नाही की, त्यांचे गुन्हेहि मी त्याना माफ करूं शकत नाही. तुम्ही आणि महाराजा जयसिंग यानी जर हे काम केले तर मला आनंद वाटेल. या बाबतीत तुमच्याकडून मी मदतीची अपेक्षा करीत आहे. मलाहि दाखवायचे आहे की, मीही पोर्तुगीजांसाठी काही करूं शकतो. ईश्वर आपलें भलें करो.*

गोवा, दि. ३१ मार्च १६६५
आंतोनियु द मेलु द काश्त्रु

क्र. १५ इ. स. १६६५ (?)

विजापूरच्या बादशहाच्या आईने कोकणचा दौरा काढला असतां गोव्याच्या व्हिसेरेइने तिला एक मौल्यवान हिरा भेट म्हणून पाठविला.

राजमाता विजापूरच्या राणीसाहेब यांस

आपले आगमन शहाबंदर येथे झाल्याचा आपला निरोप मिळतांच आपले शुभ स्वागत इच्छून मी आपणास संदेश धाडला होता. तसेंच आपले आरोग्य कसें काय आहे, आपला प्रवास कसा काय झाला व आमच्याकडून आपणास काही हवेय का ते कळविण्याची विनंती केली होती. आपले उत्तर अद्याप आलेले नाही, हे जरी खरे असले, तरी आपले पुत्र बादशहा अली आदिलशहा यांच्या विषयी आणि आपणा विषयी आम्हाला जे प्रेम आणि आदर वाटतो, त्याचे प्रतिक म्हणून मी आमचे वकील रामजी शेणवी कोठारी यांच्याकडे आपणास एक हिरा पाठवित आहे. ही भेट आपणास माझ्या स्वामीच्या विद्यमाने आली आहे असें आपण समजावे. या भेटीमुळें आमच्या दोन्ही देशांमधील जुनी मैत्री अधिक दृढ होईल अशी मी अपेक्षा करतो. आपण प्रस्तुत भेटीचा स्वीकार करावा अशी विनंती आहे.

आपल्या दैवी अनुग्रहाने ईश्वर आपणावर प्रकाश पाडो.....................†

कौंट व्हिसेरेइ

* Livro dos Reis Vizinhos No. 2 fls 36
† Livro de Reis Vizinhoz, No 2, fls 48–49

क्र. १६ गोवा, दि. २६ एप्रिल १६६५

पत्राचा आरंभीचा भाग कसरीने खाल्ला असल्याने त्याचा संदर्भ नीट लागत नाही. परंतु ऊर्वरीत भागावरून असें वाटते की, पोर्तुगीजांचे एक जहाज बेपत्ता असल्याने ते शिवाजी महाराजांच्या आरमाराने पकडले असा गोव्याच्या व्हिसेरेइला संशय आल्याने महाराजांच्या एकाद्या अधिकाऱ्याला त्याने गलबता संबंधी लिहिले असावे.

प्रस्तुत गलबताचा शोध करण्यासाठी आपण आरमारांतील नौका पाठवाव्यात आणि मला आशा आहे की, ज्याच्याकडून ह्या ज्या अनुचित गोष्टी घडल्या आहेत त्याना शिवाजी राजे शासन केल्या वाचून राहाणार नाहीत. मी ह्या बाबत काही केलेलें नाही. आणि ह्या बाबतींत योग्य ती उपाययोजना आपण कराल असा मला भरवसा वाटतो. असें झाले पाहिजे आणि जर असें झाले तर शिवाजी राजे यांच्याशी माझी अतूट मैत्री राहील असें मी वचन देतो.

देव आपले भले करो.*

गोवा, दि. २६ एप्रिल १६६५
आंतोनियु द मेलू द काश्त्रु

क्र. १७ गोवा, दि. २२ मार्च १६६६

शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांच्या ताब्यांतील चौल शहरांतून तिथल्या गुजराती व्यापाऱ्यांकडून दोन लक्ष रुपये गोळा करून आपणाकडे पाठवून देण्याचे पत्र चौलच्या पोर्तुगीज कॅप्टनला धाडले होते. तसेंच शिवाजी महाराजांच्या स्वारीपासून फोंड्याच्या किल्ल्यास व पोर्तुगीजांच्या ताब्यांतील साष्टी प्रांतास धोका होता. ह्या दोन्ही प्रश्नाबाबत गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळाने गोव्याच्या व्हिसेरेइला जो सल्ला दिला तत्संबंधीचा हा कागद आहे.

व्हिसेरेइ आणि पोर्तुगीज हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल आंतोनियु द मेलुद काश्त्रु यांचे पानेली येथें वास्तव्य असतां दि. २२ मार्च १६६६ या दिवशी त्यानी राज्य सल्लागार मंडळाची बैठक आपल्या निवासस्थानी बोलविली. त्यानी सल्लागार मंडळाला निवेदन सादर केले की, चौलचे कॅप्टन आंतोनियु गाल्व्हांव द सा यानी पत्र पाठवून कळविले आहे की, चौल शहरांतील गुजराती व्यापाऱ्यांकडून दोन लक्ष रुपये गोळा करून ते आपणास उसने म्हणून पाठवावेत अशा आशयाचे पत्र शिवाजी राजे यांनी आपणास पाठविले आहे. कॅप्टन आंतोनियु द गाल्व्हांव यानी

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 37.

संशय व्यक्त केला आहे की, शिवाजी राजे यांच्या मनात आमची कुरापत काढायची आहे, आणि म्हणून त्यानी प्रस्तुत रकमेची मागणी केली आहे ही रक्कम आपण परत करूं असे आश्वासन पत्रात शिवाजी राजे यानी दिले आहे. परंतु त्या आश्वासनावर विश्वास ठेवता येत नाही. व्हिसेरेइ आपल्या निवेदनात पुढें असें म्हणाले की, शिवाजी राजे फोंड्याचा किल्ला घेण्याची तयारी करीत असल्याची बातमी आपणास आमच्या राज्याशीं मैत्रीचे संबंध ठेवणाऱ्या देसायांकडून कळली असल्याचे रासईच्या किल्लेदाराने लिहिले आहे. रासईचा किल्लेदार म्हणतो की, शिवाजी राजे फोंड्याचा किल्ला एका आठवड्याच्या आंत घेऊं शकतील. आणि फोंड्याचा किल्ला पडला, तर शिवाजी राजे यांच्या पासून आमच्या साष्टी प्रांताला धोका असल्याची भीती त्याने व्यक्त केली आहे. त्याचे म्हणणे आहे की, साष्टीचे संरक्षण करणे हें कठीण काम आहे. एकदां शिवाजी राजे यांच्या फौजा साष्टींत शिरल्या की, त्या किती लुटालूट आणि जाळपोळ करतील तें सांगतां येत नाही. तरी फोंड्याच्या किल्ल्यास आमच्या राज्यांतून कुमक पाठविण्याची परवानगी आपणास द्यावी अशी विनंती विजापुरशीं दोस्ती बाळगून असणाऱ्या देसायानी केली आहे, असें रासईचा किल्लेदार म्हणतो. आणि आम्ही जर कुमक धाडण्यास त्याना रस्ता दिला, तर आम्ही सदहू देसायाना दारू आणि तोफांचे गोळे पुरवावे अशी मागणी त्यानी केल्याचें रासईच्या किल्लेदाराने पत्रांत निर्दिष्ट केले आहे. व्हिसेरेइनी राज्य सल्लागार मंडळाला प्रस्तुत ठरावांबाबत सल्ला देण्याची विनंती केली असतां सल्लागारानी एकमताने दृष्टिकोण व्यक्त केला की, आदिलशहाच्या राज्यातील देसाई जर फोंड्याच्या मदतीस कुमक पाठविण्यास रस्ता मागत असतील तर तो त्याना द्यावा. मात्र कुमक शापोरा येथें एका निर्जन ठिकाणी उतरविण्यास त्याना सांगावे. हेतु हा की, त्याचा सुगावा शिवाजी राजे याना लागू नये. दुसरी गोष्ट देसाई मंडळी जो दारू गोळा मागत आहे, तो त्याना विकत देण्यास काही हरकत नाही. चौल प्रकरणी सल्लागारांचे म्हणणे पडले की, शिवाजी राजे यांच्या संभाव्य हल्ल्यापासून त्या ठाण्याचे रक्षण करण्यासाठी वसई येथील पायदळाचा एक भाग तिकडे पाठविण्यात यावा.

Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 53

क्र. १८ — पानेली, दि. २१ एप्रिल १६६६

इराणचा वकील आदिलशहाच्या दरबारांत वेंगुर्लामार्गे जाणार होता. परंतु शिवाजी महाराज व आदिलशहा यांच्यामध्ये युद्ध चालू असल्याने त्याला गोवा बंदरात उतरावे लागले. त्याने आदिलशहासाठी आणलेल्या नजराण्यावरील जकात गोव्याच्या व्हिसेरेइने राज्य सल्लागार मंडळाच्या सल्ल्यानुसार माफ केली.

आंतोनियु द मेलु द काश्त्रु व्हिसेरेइ आणि पोर्तुगीज हिंदुस्तानचे कॅप्टन जनरल यांचा मुक्काम पानेली येथे असता त्यानी राज्य सल्लागार मंडळाची बैठक बोलविली. त्यानी बैठकीला सांगितले की, इराणच्या बादशहाचा एक वकील विजापूरचे अली आदिलशहा यांच्या दरबारांत जाण्यासाठी गोवा बंदरांत उतरला आहे. तो विजापूरला वास्तविक वेंगुर्ला मार्गे जाण्यासाठी म्हणून आला होता. परंतु विजापूरचा सुल्तान व शिवाजी या दोघांचे सांप्रत युद्ध चालू असल्याने इराणच्या वकिलास विजापूरला वेंगुर्ला मार्गे जाणे धोक्याचें वाटल्याने तो गोवा बंदरात उतरला. विजापूरच्या सुल्तानाने व्हिसेरेइ याना पत्र पाठवून विनंती केली आहे की, इराणच्या वकिलाने जो नजराणा बरोबर आणला आहे, त्याच्यावर जकात आकारूं नये. आमचे असें मत आहे की, विजापूरचा सुल्तान हा आमचा शेजारी आणि मित्र असल्याने इराणच्या बादशहाने त्याच्यासाठी जो नजराणा पाठविला आहे त्याची जकात आपण वसूल करूं नये. परंतु या बाबतीत मान्यवर सल्लागारांचा दृष्टीकोण काय आहे तो त्यानी व्यक्त करावा.

सर्व सल्लागारानी व्हिसेरेइ यांचा निर्णय एक मताने मान्य केला. प्रस्तुत ठरावावर राज्य सल्लागार मंडळाच्या सर्व सभासदांच्या सह्या आहेत.*

क्र. १९ — गोवा, दि. १२ नवंबर १६६६

अली आदिलशहाची आई कोकणच्या दौऱ्यावर येणार होती. तिला काय हवंय काय नको, त्याची वास्तपूस करावी म्हणून अली आदिलशहाने गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठविले होते. आपण राजमातेच्या नडीकडे लक्ष देतो, असे गोव्याचा व्हिसेरेइ अली आदिलशहाला पाठविलेल्या प्रस्तुत प्रत्युत्तरात म्हणतो.

बादशहा अली आदिलशहा यांस

आपण माझ्या पूर्वीचे व्हिसेरेइ याना लिहिलेले एक पत्र मला सचिवालयांत आढळून आले. आपल्या मातोश्री इकडच्या भागात येणार होत्या म्हणून

* Assentos do Conselho do Estado, Vol. IV; Documento 57.

त्यांच्या अडीअडचणी बघाव्या असें आपण पत्रांत लिहिले होते. आपल्या पत्रा-प्रमाणे आपल्या मातोश्रीच्या अडीअडचणीकडे लक्ष देणे हे माझें कर्तव्य ठरते. तरी प्रस्तुत पत्र घेऊन जात असलेल्या दूताकडे, आपल्या मातुश्रींना काय हवेंय काय नको तें व त्याना आणखी कोणत्या बाबतींत माझी मदत हवीय ते कळवावे. आपल्या मातोश्रींकडेहि वेगळा दूत पाठविला असून त्यांच्याकडून सूचना आणण्यास त्याला सांगितले आहे. आमच्या दोन्ही राज्यांमध्यें पूर्वापारपासून जी मैत्री वसत आहे, तिला अनुसरून आपल्या उपयोगी पडणे हे आमचे कर्तव्यच ठरते. आमच्या स्वामीचाहि आम्हास तसा आदेश आहे. ज्यानी ह्या राज्याचे जतन केले त्या माझ्या पूर्वीच्या व्हिसेरेइनी घालून दिलेल्या रुढी व चालीरीती यापुढे चालू ठेवण्यास मी बद्धपरिकर आहे.

आपल्या दैवी अनुग्रहाने देव आपणावर प्रकाश पाडो.*

गोवा, दि. १२ नवंबर, १६६६
कौंट व्हिसेरेइ

क्र. २० **गोवा, दि. २२ नवंबर १६६६**

आदिलहाचा वकील गोवा दरबारी निघाला होता. गोव्याचा व्हिसेरेइ त्याला लिहितो की, मी तुमच्यासाठी घरें बघून ठेवली असून तुमच्या स्वागताकरितां मी उत्सुक आहे.

बादशहा अली अदिलशहाचे वकील यांस

आपले आगमन डिचोलीला झाल्याचे ऐकून आनंद झाला. या वकिलातीवर बादशहा अली आदिलशहा यानी आपल्या सारख्या माणसाची निवड करून गुणग्राहकता दाखविली आहे, यांत शंका नाही. मी आपणासाठी घरें पाहून ठेवली आहेत. तरी या शहरीं आपण केव्हां येणार ते एक दिवस अगोदर कळवावे. आपल्या स्वागता-साठी मी फार उत्सुक आहे. आपले आरोग्य उत्तम असावे असें गृहीत धरतो. आपण मला माझ्या स्वामीचे बंधु आणि मित्र यांच्या समान आहांत. ईश्वर आपले भले करो.

गोवा, २२ नवंबर १६६६
कौंट व्हिसेरेइ

* Livro de Reis Vizinhos No. 2, fls 48-49.
† Livro de Reis vizinhos No. 2, fls 48-49.

क्र. २१ **गोवा, दि. २७ नवंबर १६६६**

आदिलशहाच्या गोवा दरबारातील वकीलास नौका समोरा पाठवून गोवा शहरी आणण्याची कशी तयारी करण्यात आली होती ते प्रस्तुत कागदावरून दिसून येते.

राज्य सचिवाकडून अदिलशहाचे वकीलास,

प्रस्तुत पत्राचे द्वारा आपणास कळविण्यात येत आहे की, आपल्या स्वागताची येथें तयारी झाली आहे. उद्यां रविवारी दुपारी सरकारी नौका पिळगाव येथें आपणास घेण्यासाठी पाठविली जाईल. ही नौका धावजी पर्यंत येईल व तेथून आपणास दुसऱ्या एका सरकारी नौकेने इकडे आणण्यात येईल. ही पद्धत जुनी आहे, हे आपण जाणावे.

देव आपले रक्षण करो.*

आंतोनियु पाइश द सांद, कौंट व्हिसेरेइ

क्र. २२ **गोवा, दि. २७ नवंबर, १६६७**

सुरतेच्या नबाबाने दस्तकाबाबत गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठविले होते. त्याला तीं दमण येथील ठाणेदाराकडून हवी होती. पण ती दमणच्या ठाण्यातून मिळणार नाहीत, वाटल्यास गोव्याहून घेऊन जावींत असें उत्तर गोव्याचा व्हिसेरेइ नबाबास पाठवितो. नबाबास व्हिसेरेइने पोर्तुगीज हद्दींतील नदींतून जहाज नेण्यासहि परवानगी नाकारली आहे.

सुरतेचे नबाब यांस

अंताजी.......यानी मला आपली दोन पत्रे आणून दिली. त्यांवरून आपले आरोग्य उत्तम असल्याचे कळले व समाधान वाटले. आपण मागणी केली आहे की, आपणाला आमची 'दस्तके' हवी आहेत पण ती आपणाला आमच्या दमण येथील ठाण्याकडून हवी आहेत. मला आपली मागणी नाइलाजाने अमान्य करावी लागत आहे, कारण आमच्या स्वामीच्या कायद्यांत तें बसत नाही. अर्थात सुरतहून दमण जवळ असल्याने आपण ही मागणी करणे स्वाभाविक होते. आपणास कळविण्यात येते की आपणास जीं दस्तके हवी आहेत तीं, आपण इकडून घेऊन जावीत. मी राज्य सचिवाना सूचना केली आहे की, आपल्या वतीने कुणी दस्तके मागावयास आल्यास तीं त्वरीत देण्याची व्यवस्था करावी..... ....जहाजे नेण्याची

* Livro de Reis Vizinhos No. 2, fls 48–49.

परवानगी मागितली आहे··········पण ही परवानगी देतां येत नाही·········· प्रयत्न केल्यास मी आरमार पाठवून जहाजें पकडीन. तरी उभय राज्यांमध्यें कटुता निर्माण होऊं नये, म्हणून आपण हा प्रसंग टाळावा. याशिवाय आणखी एकादे आपले काम असल्यास मी ते आनंदाने करीन.

आपणावर देव प्रकाश पाडो.*

गोवा, दि. २७ सप्टेंबर, १६६७
कौंट व्हिसेरेइ

क्र. २३ **गोवा, दि. २३ नवंबर, १६६६**

गोव्याचा राज्य सचिव आदिलशहाच्या गोवा दरबारांतील वकिलास लिहितो की, तुमच्या गोवा शहरांतील आगमनासाठीं दिवस मुक्रर करण्यात आला आहे.

बादशहा अली आदिलशहा यांच्या वकिलास सचिवाकडून

कौंट व्हिसेरेइ यानी आपणास निरोप धाडला आहे, की आपण रविवारी दि. २८ या दिवशी या शहरांत प्रवेश करावा. कारण, आपले आगमन रविवारी होणार असल्याची दवंडी पिटविण्यात आली आहे. आपलें आगमन आणखी लांबणीवर पडूं नये, असें व्हिसेरेइ याना वाटते. आपले स्वागत करण्यास व आपली ख्याली खुशाली जाणून घेण्यास ते फार उत्सुक आहेत.

आपल्या दैवी अनुग्रहाने ईश्वर आपणावर प्रकाश पाडो.†

गोवा, २३ नवंबर १६६६
सचिव

क्र. २४ **गोवा, दि. २६ नवंबर १६६६**

आदिलशहाचा सरदार मियां महमद खान याचें तळ कोकणांत आगमन झाले असतां गोव्याचा व्हिसेरेइ त्याला आपल्या खास वकिलामार्फत पत्र पाठवून त्याच्याकडे आदिलशहाची ख्याली खुशाली विचारतो.

अली आदिलशहा यांचे सरदार मियां महमद खान यांस

आपले आगमन तळ प्रदेशांत झाल्याचे कळतांच आम्हा उभय राज्यांमधील मैत्रीस

* Reis Vizinhos, No. 2, fls. 72.

† Livro de Reis Vizinhos No. 2, fls 48–49.

अनुसरून आपले स्वामी बादशहा अली आदिलशहा यांच्या ख्याली खुशालीची विचारपूस आपणाकडे करावी अशी इच्छा झाली. तरी आपण प्रस्तुत बातमी कळविल्यास मला फार आनंद होईल. त्याचप्रमाणे आपले एकादे काम माझ्या हातून होत असल्यास तेही कळवावे, मी ते आनंदाने करीन. आपणाकडे प्रस्तुत पत्र घेऊन जात असलेले आमचे वकील रामजी शेणवी कोठारी यांच्याकडून कळले की, आपले वडील हे या राज्याचे चांगले मित्र होते. त्यामुळे आपणहि या राज्याचे मित्र असाल असें मी धरून चालतो.

ईश्वर आपले भले करो.*

गोवा, दि. २६ नवंबर, १६६६
कौंट व्हिसेरेई

क्र. २५ **गोवा, दि. ३१ जानेवारी १६६८**

शिवाजी महाराजानी आपणाशीं तह करण्याची इच्छा दर्शविल्यावरच त्यांच्याशी तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी आपण आपला वकील पाठविला असें गोव्याचा व्हिसेरेइ पोर्तुगालच्या राजास पाठविलेल्या प्रस्तुत पत्रांत म्हणतो. शिवाजी महाराजांचे आभार मानण्याची परवानगी आपणास द्यावी अशी मागणी त्याने पोर्तुगालच्या राजाकडे केली आहे.

गोव्याच्या व्हिसेरेइचे पोर्तुगालच्या राजास पत्र,

शिवाजीने आमच्या बार्देश प्रांतात आक्रमण केल्यावर त्याचा पराभव झाल्याने त्याने आमच्याकडे तहाची मागणी केली. तहाची कलमे कोणती ते मी पुढच्या पत्रांत कळविन. तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी आमच्या वतीने पाद्रि गोंसालू मार्तीश याना शिवाजीकडे पाठविण्यात आले. शिवाजीच्या माणसानी आमच्या प्रदेशांत जी लुटालूट केली, ती परत करणे, नासधुसीबद्दल नुकसान भरपायी करणे, गुरें नेली ती माघारा धाडणे, माणसे पकडून नेली त्यांची मुक्तता करणे, वगैरे गोष्टीच्या मागण्या आम्ही शिवाजीकडे केल्या होत्या. त्या त्याने मान्य केल्या. पकडून नेलेल्या ज्या आमच्या नागरिकांचो मुक्तता झाली, त्यांत आदिलशहाचेहि काही लोक होते. त्यानी आपण आमचे प्रजाजन असल्याचें सांगून आपली मुक्तता करून घेतली. तसेंच आमच्या प्रजाजनांची जी गुरें शिवाजीच्या लोकानी नेलीं होती, त्या गुरांपेक्षां अधिक गुरें त्यानी आम्हाला परत केली. त्यामुळें गुरांचे धनी फार आनंदीत झाले. तहाच्या वाटाघाटीही खेळीमेळीने

* Livro de Reis Vizinhos, No. 2, fls 48–49.

पार पडल्या. तरी शिवाजीचे आभार मानण्याची आज्ञा आपण आम्हाला धाडावी.

आपल्या शाही व्यक्तित्वास ईश्वराने दीर्घायुरारोग्य द्यावे हीच त्याच्यापाशी प्रार्थना.

गोवा, ३१ जानेवारी १६६८*

(उपयुक्त कागदाची एक प्रत पॅरिस येथील राष्ट्रीय ग्रंथालयांत (Bibliothéque Nationale de Paris) असून तिचा क्र. ३३ व पृ. २५७ आहे. दुसरी प्रत लिस्बन येथील सागरोत्तर पुराभिलेख संग्रहालयात असून २७ क्रमांकाच्या कपाटांत आहे.)

क्र. २६ — गोवा, दि. ८ मार्च १६६८

शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्यामधील संबंध बिघडल्यावर महाराजांच्या प्रदेशांत घातपाती कृत्यें व बंडाळी माजविण्यासाठी गनीम पाठविण्याची व आदिलशहास सागरी तोफा विकण्याची इच्छा दर्शवून गोव्याच्या व्हिसेरेइने राज्य सल्लागार मंडळाचा सल्ला मागितला होता. त्याची प्रस्तुत योजना सल्लागार मंडळाने मान्य केली. दांड्याचा सिद्दी हा पोर्तुगालच्या राजाचा मांडलिक एका तहान्वये झाल्याचाहि उल्लेख प्रस्तुत कागदात आहे.

व्हिसेरेइ आणि पोर्तुगीज हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल मान्यवर कौंट द सां व्हिसेंत यानी दि. ८ मार्च १६६८ या दिवशी राज्य सल्लागार मंडळाची सभा बोलविली. सभेसमोर विचार करण्यासाठी जे विषय ठेवण्यांत आले होते, त्यांत शिवाजी राजे यांच्या संबंधीचा एक विषय होता. ते म्हणाले की, सांप्रत शिवाजी राजे यानी कोंकणात भयंकर उच्छाद मांडला आहे. त्यामुळे या प्रदेशाचे स्वास्थ्य तर बिघडले आहेच; पण गोवा शहराच्या व्यापारावरहि अनिष्ट परिणाम झाला आहे. ह्या सर्वपरिचित दरोडेखोराने आमच्या साष्टी आणि बार्देश प्रांतात आक्रमणे केल्याची माहिती सभागृहाला आहेच. परंतु त्याला शह देण्याची एक योजना मी आंखली आहे. आमच्या आश्रयाला केशव नाईक आणि लखम सावंत हे जे दोन देसाई येऊन राहिले आहेत, त्याना गुप्तपणे शस्त्रें, दारूगोळा आणि चार तोफा देऊन शिवाजीच्या राज्यांत बंडाळी माजविण्यासाठी पाठविण्याचा आमचा बेत आहे. दुसरा ठराव असा की, आदिलशहाचा वकील मीर्झा युसुफखान हा आमच्याकडे काही युद्धनौकांच्या तोफा मागत आहे. आमच्या दारूगोळ्याच्या कोठारांत निकामी म्हणून टाकून दिलेल्या चार छोट्या तोफा आहेत. त्या तोफा आदिलशहास देऊन टाकाव्यात असें माझे मत आहे. अशा रीतीने सर्व बाजूनी शिवाजीच्या शत्रूंना जर आम्ही मदत केली, तर त्याच्यापासून आम्हाला जो उपद्रव होत आहे त्याला आळा बसेल.

सर्व सल्लागारानी एकमताने जाहीर केले की, शिवाजीला उपद्रव देण्यासाठी आमच्या आश्रयास येऊन राहिलेल्या देसायाना तोफा, शस्त्रें आणि दारूगोळा देऊन शिवाजीच्या राज्यात धामधूम माजविण्यासाठी पाठवावे व आदिलशहाचा वकील मीर्झा युसुफखान ह्याला सागरी तोफा विकाव्यात.

सल्लागार मंडळाच्या याच बैठकींत व्हिसेरेइ यानी जाहीर केलें की, दंडा राजापुरीच्या सिद्दीचा आणि आमचा तह झाला असून या तहान्वये त्याने आमच्या स्वामीचें मांडलिकत्व पत्करले आहे. हा तह झाल्याने त्याची जी एक नौका आणि पांच घोडे आम्ही अटक करून ठेवले आहेत, ते मुक्त करण्याचा माझा विचार आहे.

सल्लागारांनी व्हिसेरेइ यांचा प्रस्तुत ठरावहि एक मताने मंजूर केला.*

क्र. २७ — गोवा, दि. २० मार्च १६६८

गोव्याचा व्हिसेरेइ पोर्तुगालला निघाला असतां इकडे शिवाजी महाराज गोव्यावर स्वारी करण्याची तयारी करीत असल्याच्या वार्ता गोवा शहरीं आल्या. परिस्थिती आणीबाणीची असल्याने ती हाताळण्यासाठी व्हिसेरेइ गोव्यात असणे अगत्याचे होते. म्हणून गोव्याच्या राज्यसल्लागार मंडळाने व्हिसेरेइला भर समुद्रांतून गोव्यास माघारा बोलविण्याचा ठराव केला.

दि. २० मार्च १६६८ या दिवशी गोवा शहरी राज्य सल्लागार मंडळाची बैठक भरली. व्हिसेरेइ हे मायभूमीच्या वाटेवर असल्याने त्यांच्या गैरहजेरीत राज्याच्या सचिवाने व्हिसेरेइना आलेली दोन पत्रे बैठकी समोर वाचली. ह्या दोन्ही पत्रांचा विषय शिवाजीच्या गोव्यावरील संभाव्य स्वारीच्या तयारी संबंधी होता. शिवाजीस गोव्यावर स्वारी करण्याची चिथावणी आदिलशहा व त्याचे सरदार यानी दिल्याचें विश्वसनीय वृत्त प्रस्तुत दोन्ही पत्रानी दिलें होते.

राज्य सचिव सल्लागाराना उद्देशून म्हणाला की, परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. तरी सल्लागारानी या बाबतीत काय तो निर्णय घ्यावा. सल्लागारानी एक मताने निर्णय घेतला की, शिवाजीच्या गोव्यावरील संभाव्य स्वारीच्या तयारीच्या वार्ता

* Apêndice : Assentos do Conselho do Estado Vol. IV, No. 37, Pgs 564.

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 75.

चोहोकडून येत असल्याने परिस्थिती चिंताजनक बनली आहे. अशा परिस्थितीत व्हिसेरेइ यानी प्रवासास जाणे राज्याच्या रक्षणाच्या दृष्टीने इष्ट नाही. तरी त्यानी राज्याचे हित आणि सुरक्षितता लक्षांत घेऊन आपला प्रवास रद्द करावा व गोव्यास परतावे म्हणून राज्य सचिवाने त्याना पत्र धाडावे. आणि हे पत्र त्याना पोहोचते करण्यासाठी आरमाराबरोबर पाठवावे.

प्रस्तुत ठरावावर राज्य सल्लागार मंडळाच्या सर्व सभासदानी सह्या केल्या.*

क्र. २८ गोवा, दि. २७ मे १६६८

गोव्याचा व्हिसेरेइ शिवाजी महाराजाना कळवितो की त्यांची पोर्तुगीज आरमाराने पकडलेली नौका सोडून देण्याचा हुकूम देण्यांत आला आहे. तो महाराजांच्या मैत्रीची अपेक्षा करीत आहे. पण त्याच बरोबर कर्नाटकांतील कामगिरीची त्याना आठवण करून देत आहे. या कामगिरीच्या वेळी महाराजाना पोर्तुगीजांची मदत झाली की काय तें कळण्याचा मार्ग नाही.

शिवाजी राजे यांस,

माझ्या मैत्रीची आपण इतक्या लवकर अपेक्षा कराल याची मला कल्पना नव्हती व त्याची मी अपेक्षाहि करीत नव्हतो..........माझ्या आरमाराने आपली नौका पकडली हे मला माहीत नव्हते. परंतु मोगल बादशहा व अदिलशहा ह्यांच्या प्रमाणे आपले पत्र येतांच मी आपली नौका सोडून देण्याची आज्ञा काढली........ कारण, अशामुळें मैत्रीचे संबंध टिकून राहातात हे मला माहीत आहे. आणि तुमच्या मैत्रीविषयीं तर मी फार उत्सुक आहे. परंतु मला असें वाटते की, कर्नाटकांतील कामगिरीची आपणाला आठवणहि नसावी आणि भावी कामगिऱ्या आपणाला उपयुक्त होतील ह्या बाबतींत.......ज्या अर्थी मी स्पष्टच लिहिलें आहे त्याअर्थी तपशीलवार लिहिण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. आपल्या दैवी अनुग्रहाने ईश्वर आपणाबर प्रकाश पाडो.

गोवा, २७ मे १६६८
कौंट व्हिसेरेइ

* Assentos do Conselho do Estado, Vol. IV, documento No. 76.
† Livro do Reis Vizinhos No. 2. fls 78.

क्र. २९ गोवा, दि. ८ अक्टोबर १६६८

पोर्तुगीज प्रदेशाच्या आश्रयास येऊन राहिलेल्या सर्व बंडखोर देसायांची हकालपट्टी आपण केली आहे व त्यामुळें आपणास हलके हलकें वाटत आहे, असें गोव्याचा व्हिसेरेइ पेडण्याचे हवालदार वीरो पंडीत याना लिहिलेल्या पत्रांत म्हणतो.

पेडण्याचे सुभेदार वीरो पंडीत यांस

माझ्या अमला खालच्या प्रदेशांतील सर्व आश्रयार्थी देसायांची मी हकालपट्टी केली आहे. त्यामुळे माझ्यावरील एक मोठे दडपण दूर होऊन मला मोकळे मोकळे वाटत आहे. रोज काहीना काही तक्रारी माझ्याकडे येत असत व त्यामुळें मी बेचैन होऊन जात असे. ह्या तक्रारी जशा आपणाकडून येत होत्या तशाच त्या शिवाजी राजे यांच्याकडूनहि येत होत्या..............मी आपणाला वचन देतो की यापुढे जर..............तर मी कडक शिक्षा केल्यावांचून राहाणार नाही.............. मी एका मोठ्या जबाबदारीतून मोकळा झालो आहे. परंतु अजून.............. पूर्णपणे मोकळा.............*

गोवा, दि. ८ अक्टोबर १६६८
कौंट व्हिसेरेइ

क्र. ३० गोवा, दि. १६६८

शिवाजी महाराजांविरुद्ध बंडखोरी करणारा देसाई केशव नाईक हा 'खोल' या नावाच्या खेड्यांत जाऊन राहिला होता. हें खेडें पोर्तुगीजांच्या हद्दीत पडते की, आदिलशहाच्या त्या संबंधी वांधा होता. गोव्याचा व्हिसेरेइ त्या बाबत सिद्दी तुरुस ह्या विजापूरच्या अधिकाऱ्यास लिहितो.

(शिवाजी महाराजांनी आदिलशाही प्रदेश घेतल्यावर खोलवर त्यांची आधीसत्ता प्रस्थापित झाली.)

सिद्दी तुरुस यांस

आपल्या पत्रावरून कळून आले की, आमच्या राज्यांतून हद्दपार करण्यात आलेला देसाई केशव नाईक हा सांप्रत 'खोल' येथे आहे. जर खोल हे खेडे आमच्या राज्यांत मोडत असेल, तर आपल्या सूचनेप्रमाणे आवश्यक ते करीन. परंतु हे खेडें आपले नाही हे बादशहा अली आदिलशहा यानी आम्हाला लेखी कळविलें पाहिजे.

* Livro dos Reis Vizinhos, No. 2, fls 8D.

म्हणजे संशयाचे निवारण होईल. आपण आणि अली अदिलशाहा यांच्या आणखी काही अधिकाऱ्यानी मला लिहिलें आहे की, 'खोल'वर आदिलशहाची सत्ता आहे. शिवाजी राजे यांच्या संबंधी बोलायचे झाल्यास आपल्या अधिकार क्षेत्रातील प्रदेशाचे रक्षण आपण केलें पाहिजे............. कसा आदर करायचा ते मला माहीत आहे............. बाकी सर्व..............*

गोवा............... १६६८
कौंट व्हिसेरेइ

क्र. ३१ गोवा, इ. स. १६६९

खालील दोन्ही कागदात शिवाजी महाराजांच्या बार्देशवरील स्वारीचा उल्लेख आहे. पहिल्या कागदाचा लेखक म्हणतो की, आपण कर्नाटकाच्या राजांशी युद्ध करण्यासाठी गेलो होतो. परंतु शिवाजीने बार्देशवर स्वारी केल्याने व्हिसेरेइने आपणास माघारा बोलविले. त्यावरून शिवाजी महाराजांची बार्देशवरील स्वारी मोठी असल्याचा निष्कर्ष निघतो.

दुसऱ्या पत्रात शिवाजी महाराज बंडखोर केशव नाईक याचा पाठलाग करीत बार्देश मध्ये घुसले असें म्हटले आहे. पोर्तुगीजांनी या बंडखोर देसायास आश्रय दिला होता. तो राग शिवाजी महाराजानी पोर्तुगीजांवर काढला.

आमचे शत्रु जे अरब त्यानी दीव शहरांत प्रवेश करून बंदरातील जहाजांची लुटालूट आणि जाळपोळ केलो. त्यानी नागरिकांचीहि धरपकड केली. या हल्यांत बरीच माणसे ठार आणि जखमी झाली. काहीनी किल्याचा आश्रय घेतला.

कौंट व्हिसेरेई हे गेल्या वर्षी नवंबर महिन्यात वारले. तत्पूर्वी कौंट व्हिसेरेइ यानी मला १६६७ च्या ऑगष्ट महिन्यात कर्नाटकाच्या राजाशी युद्ध करण्यासाठी पाठविलें होते. व्हिसेरेइ यांच्या हुकुमाप्रमाणे मी कर्नाटकाच्या राजाशीं युद्ध केले. वाईट गोष्ट ही की, नवंबर महिन्यात शिवाजीने आमच्या बार्देश प्रांतावर स्वारी केली. ह्या स्वारीमुळें व्हिसेरेइ यानी मला कर्नाटकांतून माघार घ्यावयास लावली. मी जानेवारी महिन्यात माघारा परतलो. माझ्या मागे कर्नाटकाच्या राजाने तिकडील सर्व पोर्तुगीजाना आणि किरिस्तावाना कैद केले व कांबोळीचा

* Livro de Reis Vizinhos, No. 2, fls, 87 V.
१. बिदनूर.

किल्ला घेतला. हा किल्ला मी तह करण्यासाठी कर्नाटकांत गेलों, तेव्हा माझ्या हवाली करण्यात आला.

(प्रस्तुत कागद लिस्बन येथील सायन्स अकादमीच्या ग्रंथालयांत असून त्याचा क्र. ५८ व पृ. ७८ आहे)

उपर्युक्त कागदांतील प्रसंगाच्या अनुषंगाने खालील कागद लिहिलेला आहे.

इ. स. १६६७ साली शिवाजी या नावाच्या छोटया देशी राजाने केशव नाईक या नावाच्या देसायाचा आमच्या बार्देश प्रांतातील कोळवाळ खेडयापर्यंत पाठलाग केला. त्याच्यापाशी भरपूर सैन्य आणि शस्त्रास्त्रे होती. वाटेंत त्याने अनेक लोकाना कंठस्नान घालून पोर्तुगीजानी केशव नाईक यास आश्रय दिला म्हणून सूड उगविला. या हल्यांत पाद्रि फ्रेइ मानुएल द सां बेर्नादिनु रेक्टर हे ठार झाले. ते मूळ कोळवाळ खेडयाचे रहिवाशी होते. शत्रूचा हल्ला आला, तेव्हां जो आरडा ओरडा झाला, तेव्हां फ्रेइ मानुएल द सां बेर्नादिनु हे चर्चचे दार उघडून बाहेर आले होते. तोंच शत्रूच्या एका शिपायाने त्यांच्यावर तलवारीचा वार करून त्याना ठार केले. या प्रसंगी फ्रेइ मानुएल यांच्या चर्चमध्ये रेव्ह. पाद्रि फ्रेइ जुआंव दुश नेव्हिज या नावाच्या एका पोर्तुगीज भिक्षूचा मुक्काम होता. ते फ्रेइ मानुएल यांचे पाहुणे म्हणून कोळवाळला गेले होते. ते शत्रूच्या हल्याचे वेळी काय गडबड आहे म्हणून फ्रेइ मानुएल यांच्या पाठोपाठ बाहेर आले असता त्यानाहि शत्रूने गांठले. त्यांच्या शवावर एकोणीस जखमा होत्या. अखेर ज्याच्या पाठलागासाठीं शत्रू कोळवाळ खेडयांत घुसला होता तो केशव नाईक देसाई न गवसल्याने शत्रू माघारा परतला. मृतांची प्रेते मूठ माती न देतां चार दिवस उघडयावर पडून होती. कारण शत्रूच्या भयाने लोक पळून जाऊन आग्वादच्या किल्याच्या आश्रयास राहिले होते.

(प्रस्तुत कागद लिस्बन येथील राष्ट्रीय ग्रंथालयात असून त्याचा क्र. १७७ आहे)

क्र. ३२ गोवा, दि. १५ मार्च १६७१

शिवाजी महाराजानी जिंजिऱ्याच्या सिद्दीशीं युद्ध सुरू केले असतां पोर्तुगीजांनी त्याला चोरून मदत करण्याचा कसा घाट घातला ते प्रस्तुत कागदावरून दिसून येते. सिद्दीचा जिंजिरा हा एक बलाढ्य किल्ला असून त्याच्यामुळें आपल्या ताब्यांत असलेल्या चौल शहराचे रक्षण होते, असें गोव्याचा व्हिसेरेइ राज्य सल्लागार मंडळासमोर केलेल्या निवेदनांत म्हणतो.

Apêndice : Assentos do Conselho do Estado Vol. IV No. 38, Pg 565.

दि. १५ मार्च १६७१ या दिवशी आंतोनिंयू द मेलु द काश्त्रु व मानुएल कोर्त रेआल द सांपायू या दोघां गव्हर्नरांनी पणजी येथे राज्य सल्लागार मंडळाची बैठक बोलविली. गव्हर्नर महाशयानी सभेला वृतांत सादर केला की, शिवाजी राजे यानी सिद्दीच्या जिंजिऱ्यास वेढा घालून त्याची कोंडी केल्याची बातमी आमच्या उत्तरेकडील प्रदेशांतून आलेल्या आरमाराने आणली आहे. जिंजिऱ्यास वेढा घालणाऱ्या समुद्रांतील आणि जमिनीवरील सैन्याने तोफांचा जो अविरात मारा चालू ठेवला आहे, त्यामुळे सिद्दीच्या अस्तित्वास धोका पोहोचला आहे. हा वेढा जर असाच काही काळ चालू राहिला, तर सिद्दीस शरणागती पत्करल्या-वांचून गत्यंतर उरणार नाही, असें आरमारावरील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. शिवाजीचा आणि आमचा नुकताच जो तह झाला आहे, त्या तहान्वये आम्हाला सिद्दी व शिवाजी या दोघांमधिल युद्धात तटस्थता पाळणे भाग आहे. परंतु सिद्दीचा पराभव होऊन त्याचा जिंजिरा जर शिवाजीच्या हाती पडला, तर त्या मुळे आमच्या राज्याला केवढा धोका पोहोचणार आहे याचा आपण विचार केला पाहिजे. सिद्दीचा किल्ला हा एक बलाढ्य असा या भागांतील किल्ला असल्याने आमच्या चौल शहराचे त्या किल्ल्यामुळें अनायासे रक्षण होते. दुसरी गोष्ट अशी की, हा बंडखोर सेनापती (शिवाजी महाराज) तहाच्या कलमांचे पालन करीत नाही, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. त्यामुळें दांड्याचा किल्ला जर त्याने घेतला तर आमच्याशी त्याचा जो नुकताच तह झाला आहे, त्या तहाची कलमे तो कितपत पालन करील याची शंका आहे. शिवाजी सगळीकडे बलाढ्य होत चालला आहे. त्याच्यापाशी जें सैन्य आहे ते कुठल्याही प्रदेशावर म्हणेल त्या वेळी हल्ला करण्याच्या जय्यत तयारीत असते. आमच्यापाशी भाडोत्री पायदळ नाही आणि त्यामुळें आमचे परगणे असुरक्षित आहेत. अशा परिस्थितींत शिवाजीने आमच्या बार्देश आणि साष्टी प्रांतात आक्रमण केले, तर त्याला आपण तोंड देऊं शकू का ? तरी सल्लागारांनी या परिस्थितीचा साधक बाधक विचार करून काय तो सल्ला द्यावा.

सल्लागारानी एक मुखाने सल्ला दिला की, सिद्दीला गुप्तपणे तोफा आणि दारू-गोळा यांची मदत त्वरीत पाठवावी. आणि हे काम रात्रीच्या वेळी अथवा त्याचे एकादे गलबत पणजीस आले असता त्यावर ही शस्त्रें आणि दारू गोळा पाठवावा.

क्र. ३३ गोवा, दि. २९ मे १६७१

सिद्दीच्या जिंजिऱ्यास शिवाजी महाराजानी वेढा घातल्याने सिद्दी मेटाकुटीस आला होता. ह्या घोर संकटांत त्याला पोर्तुगीजानी कशी मदत केली ते प्रस्तुत कागदावरून दिसून येते.

Assentos do Conselho do Estado, Vol. IV, Documento No 89

दि. २९ मे १६७१ या दिवशी पानेली येथे व्हिसेरेइ आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल कौंट द लाउरादिव यानी राज्य सल्लागार मंडळाची सभा भरविली व राज्य सचिव डॉक्टर आंद्रे फ्रेइरी द आताईद याना सभेसमोरील ठराव खड्या आवाजांत वाचून दाखविण्याची सूचना केली. व्हिसेरेइ यांच्या आज्ञेप्रमाणे राज्य सचिव डॉक्टर आंद्रे फ्रेइरी द अताईद यांनी पुढील ठराव वाचण्यास प्रारंभ केला. दांड्याच्या किल्ल्यास शिवाजीने वेढा घालून बरेच दिवस झाले आहेत. आमच्या चौल येथील किल्ल्याचे कॅप्टन नुन द मेलु द सिल्व यानी वारंवार पत्रे पाठवून दांड्याच्या वेढ्याची माहिती आम्हास वारंवार कळविली आहे. आम्ही त्याना मागे सूचना दिल्यापासून ते सिद्दीस आपल्या परी मदत करीत आहेत. या मदती मागील आपला उद्देश स्पष्टच आहे. शिवाजी दांड्याचा किल्ला घेऊन वरचढ झालेला आपणाला नको आहे. परंतु या वेढ्यामुळे सिद्दीची अवस्था फार शोचनीय झाली आहे. शिपायाना मुशाहिरा देण्यास त्याच्यापाशी पैसा नाही. या अडचणींतून थोडी तरी निभावणी व्हावी म्हणून त्याने आम्हाला एक विनंती केली. आमचे मांडलिकत्व पत्करतेवेळी त्याने काही रक्कम आमच्याकडे अनामत म्हणून ठेवली होती. ती सांप्रत चौल येथील खजिन्यात आहे. ही रक्कम आपणाला द्यावी म्हणून त्याने आम्हाला विनंती केली आहे. आपली परिस्थिती सुधारली की ही रक्कम आपण परत करूं असे वचन त्याने दिले आहे. शिवाय त्याने आपले जे घोडे आमच्या चौल शहरी सुरक्षिततेसाठी म्हणून पाठविले आहेत, ते तारण ठेवून आपणास दोन हजार रुपये कर्जाऊ म्हणून द्यावेत अशीहि मागणी त्याने केली आहे. अनामत रकमेच्या बाबतीत वसईच्या कारभाऱ्याने निर्णय घेतला. त्याने ती रक्कम सिद्दीच्या हस्तकामार्फत त्याला पोहोचती करण्याची व्यवस्था केली. परंतु दोन हजार रुपये त्याने पाठविले नाहीत. तो म्हणतो की तेवढी रक्कम आपणापाशी नाही. त्याचे म्हणणे आहे की, मान्यवर व्हिसेरेइ यानी या रकमेची व्यवस्था केली, तर जून महिन्याच्या हप्त्यापोटी जी रक्कम आपल्याकडे येईल त्यांतून हे दोन हजार रुपये आपण परत करूं.

शिवाजी आता आमचा शेजारी झाला आहे. परंतु त्याचा शेजार संशयास्पद असल्याने आमच्या चौल शहराच्या रक्षणार्थ काही पायदळाचे सैनिक पाठविण्याची विनंती त्या शहराच्या कॅप्टनने केली होती. त्या विनंतीचा विचार करून आमच्या उत्तरेकडील प्रदेशांतून चाळीस पायदळाचे सैनिक चौलला पाठविण्याची आज्ञा उत्तरेकडील प्रदेशाच्या सेनापतीस करण्यात आली होती. परंतु तिकडून हे सैनिक न गेल्याने ते इकडून पाठविण्यात आले. त्या शिपायांचा मुशाहिरा इकडून पाठविण्यात यावा अशी विनंती चौलच्या कॅप्टनने केली आहे. तरी मान्यवर कौंट व्हिसेरेइ यानी या मागणीचा विचार करावा.

राज्य सचिवाने वरील ठराव राज्य सल्लागार मंडळाच्या सभेसमोर वाचल्यावर मान्यवर कौंट व्हिसेरेइ यानी सल्लागाराना विनंती केली की, त्यानी आपले मत-प्रदर्शन करावे.

सल्लागारानी सल्ला दिला की, सिद्दीने चौल येथे खंडणी बाबत जी अनामत रक्कम ठेवली आहे, तिच्या पोटी त्याला त्याने मागितलेली रक्कम देण्यास हरकत नाही. आपली परिस्थिती सुधारली की, आपण ती रक्कम परत करूं असे जे वचन त्याने दिले आहे त्यावर विश्वास ठेवावा. तसेच त्याने घोडचांच्या तारणावर जी दोन हजार रुपयांची कर्जाऊ रक्कम मागितली आहे तीहि त्याला द्यावी. त्याला आपण मदत केली पाहिजे ती यासाठी की, त्याचा दांडचाचा किल्ला ही आपलीहि सुरक्षितता आहे. त्याला आपण पैशा प्रमाणेच दारु गोळचाचीहि मदत केली पाहिजे. मात्र ही मदत पाठविताना आपण सर्व प्रकारची काळजी घेतली पाहिजे. चौलला गोव्याहून सैन्य पाठवावे असा सल्ला सल्लागार मंडळाने एक मताने दिला. मात्र त्या सैन्याचा खर्च वसईने करावा असे सल्लागारांचे मत पडले.

मान्यवर कौंट व्हिसेरेइ यानी सल्लागार मंडळाचा सल्ला मान्य केला. या ठरावावर सर्व सल्लागारांच्या सह्या आहेत.*

क्र. ३४ **गोवा, दि. ३० एप्रिल १६७५**

शिवाजी महाराजांचे सैन्य कांही देसायांचा पाठलाग करीत पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेल्या चांदर गावांत शिरले होते व खुद्द शिवाजी महाराज रणमस्त खानाचा पाठलाग करीत कुकळ्ळीत शिरले होते. हा प्रश्न गोव्याच्या व्हिसेरेइने राज्य सल्लागार मंडळासमोर मांडला असतां सल्लागारानी व्हिसेरेइला सल्ला दिला की, शिवाजी महाराजांकडून प्रस्तुत आगळिकेचा फायदेशीर खुलासा करून घेण्यासाठी त्यांच्या गोवा दरबारांतील वकिलास स्थानबद्ध करून ठेवावे.

दि. ३० एप्रिल १६७५ या दिवशी गोवा शहरी व्हिसेरेइ आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल कौंट द लावरादिव यानी राज्य सल्लागार मंडळाच्या सभासदांची सभा बोलविली. त्यानी सभेला निवेदन केले की, काल दि. २९ एप्रिलला दुपारी शिवाजीचे सैन्य काही देसायांचा पाठलाग करण्याच्या मिषाने आमच्या साष्टी प्रांतांतील चांदर गावात शिरले व त्याने तीन घरांची लुटालूट करून तेथील चर्चच्या नोकरास ठार केले असल्याचे पत्र मला रासई येथील ठाण्याच्या कॅप्टनने लिहिले आहे. तो म्हणतो की, शिवाजीचे सैन्य कुकळ्ळीच्या बाजारात येऊन दाखल झाले

* Assen'os do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 92.

असल्याची बातमी आपणास त्या ठाण्याच्या कॅप्टनने कळविली असून दारुगोळचाची आणि कुमकेची मागणी केली आहे. व्हिसेरेइ पुढे असेही म्हणाले की, कुकळ्ळीच्या कॅप्टनने मानुएल दा मोता याना लिहिलेले पत्र माझ्याकडे पाठविण्यात आले आहे. त्यांत म्हटले आहे की, शिवाजी रणमस्तखानाचा पाठलाग करीत कुकळ्ळी गावात शिरला व त्याने काही घरांची लुटालूट केली. सांप्रत या सैन्याचा तळ कुकळ्ळी गावातील चांभाराच्या भाटात आहे, असें पत्रात म्हटले आहे. तरी शिवाजीच्या प्रस्तुत आक्रमणा संबंधी काय करायचे ते मान्यवर सल्लागारानी सांगावे.

सल्लागारानी दृष्टीकोण व्यक्त केला की शिवाजीचे सैन्य कुकळ्ळी गावात हेतुपुरस्सर शिरले की, वाट चुकून शिरले त्याची आगोदर चौकशी करण्यात यावी व त्याचा पुढचा पवित्रा काय आहे त्याचा तपास काढावा. त्या दरम्यान शिवाजीचा जो वकील या शहरी सांप्रत आहे, त्याला स्थानबद्ध करून ठेवावे. म्हणजे पुढे जो काय निर्णय आपणाला घ्यायचा आहे त्या संबंधाने हा वकील आपल्या हाती असला तर त्याचा उपयोग होईल.

या ठरावावर सल्लागार मंडळाच्या सर्व सभासदांनी सह्या केल्या.*

क्र. ३५ **दि. २५ मार्च १६७७**

दर्यासारंग दौलतखान याच्या नेतृत्वाखाली शिवाजी महाराजांचे एक मोठे आरमार दांड्याच्या बाजूने सरकत आहे. त्यावर नऊ हजार नौदल असून यंत्राचा व दोरखंडाचा मोठा साठा आहे. दोरखंडाचा उपयोग जांगड बांधण्यासाठी करायचा असुन दांड्याच्या किल्ल्यावर हल्ला करण्याची ही तयारी आहे, असें प्रस्तुत दोन्ही कागदांत म्हटले आहे.

वरच्या चौल येथे मोरोपंत पेशवे हे मोठे घोडदळ आणि पायदळ यांसह येऊन दाखल झाले आहेत. ते अण्णाजी पंत यांची मार्गप्रतिक्षा करीत आहेत. अण्णाजी पंत हे कोकणचे सुभेदार असून या प्रदेशाची हद्द गोव्याला भिडली आहे. अण्णाजी पंतापाशीहि मोठे सैन्य असून मोरोपंत पेशवे यानी त्यांना त्यांच्या सैन्यासह येऊन मिळण्याची आज्ञा फर्माविली आहे. जमिनीवरील फौजांशिवाय शिवाजीचे एक मोठे आरमार नागाव येथें येऊन दाखल झाले आहे. हें बंदर आमच्या चौल बंदरापासून अवघे दोन कोसांवर आहे. हे आरमार तेवीस शिडांचे असून दहा गलबते आणि तेरा नौका त्यांत आहेत. हे आरमार चौल नदीमध्यें आणण्यासाठी त्याने माझ्याकडे परवानगी मागितली. परंतु या शहरांत शस्त्रास्त्रे............

* Assentos do Conselho do Estado Volume IV Document No. 103

(प्रस्तुत कागद लिस्बन येथील सायन्स अकादमीच्या ग्रंथालयांत असून त्या हस्तलिखिताचा क्रमांक ५८ व पृ.क्रमांक १६५ हा आहे)

उपर्युक्त हस्तलिखितांत पृ. क्र. २०३ वर खालील माहिती मिळते : नागावला असलेले आरमार दांडयाच्या बाजूला गेलें असून त्याचें नेतृत्व दौलतखान याच्याकडे आहे. या आरमारावर नऊ हजार सैनिक व दोरखंडाचा व अितर यंत्राचाहि मोठा सांठा आहे. दोरखंडाचा उपयोग 'जांगड' बांधण्यासाठी करायचा असून दांडयाच्या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी या जांगडांचा उपयोग केला जाणार आहे. मागच्या हल्ल्याप्रमाणे हा हि हल्ला मोडून काढण्याची तयारी सिद्दीने केली आहे. देवाने त्याच्यावर ....

चौल, २ मे १६७७

आपला सेवक
जुआंव फुझेइस द सांद*

क्र. ३६ दि. २८ मे १६७७

शिवाजी हा आमचा चांगला मित्र आहे. चौथियाच्या राजाप्रमाणे त्याने या भागात खिंडी रोखून चोर दरोडेखोरांचा बंदोबस्त केला आहे. तो श्रीमंत आणि बलाढ्य आहे. त्याच्या सामर्थ्याच्या मानाने आमचे सामर्थ्य मर्यादित आहे. अशा परिस्थितींत त्याच्याशी संघर्ष करणे शहाणपणाचे नाही. त्याने चौथियाच्या राजाची जी खेडीं घेतली आहेत त्यांचा चौथ त्याला देण्यास हरकत नाही, अशी शिफारस दमण शहराने गोव्याच्या व्हिसेरेइला प्रस्तुत कागदांत केल्याचे दिसून येते.

शिवाजी महाराजानी दमण शहराकडे चौथाई आणि जीवनोपयोगी वस्तूंची मागणी केली होती. तत्संबंधी दमणच्या कार्यकारी मंडळाने उत्तरेकडील प्रदेशाचे कॅप्टन जनरल मानुएल लोबु द सिल्वैरा याना केलेल्या सूचना कौंट व्हिसेरेइ यानी शिवाजी महाराजांच्या मागणीस नकार देऊन जें पत्र पाठविले तदनुषंगाने प्रस्तुत सूचना करण्यात आल्या.

दमण शहराच्या अखत्यारीखाली सासष्टीच्या राजाची जीं खेडी आहेत त्यांचा चौथ आपणाला द्यावा अशी जी मागणी शिवाजीने केली होती ती मागणी फेटाळून लावल्याचे जें पत्र कौंट व्हिसेरेइ यानी पाठविले त्या पत्राचा पुरस्कार दमण शहराने करावा.

* Apendice : Assentos do Couselho do Estado Vol IV No. 33,Pg. 556-557

चौथचा कर हा सासष्टीच्या राजास पूर्वी झालेल्या करारमदारांनुसार दिला जात होता. हे करारमदार दमण शहर व सासष्टीचा राजा यांच्यामध्ये झाले. दमण शहराने सासष्टीच्या राजास चौथ द्यावा व त्याच्या बदली त्याने चौथच्या अमलाखाली असलेल्या खेडयांचे चोर व दरोडेखोर यांच्यापासून रक्षण करावे असें ठरले होते. या कराचा संबंध करदाते किंवा वतनदार यांच्या नुकसानीशी नव्हता. परंतु सासष्टीच्या राजाशी चौथ बाबत तह आणि करार होऊन देखील या राजाची माणसे दमणच्या कक्षेंतील खेडयांत शिरून चोऱ्या माऱ्या करीत असत. आणि ज्या ज्या वेळी अशा घटना घडत असत त्या त्या वेळी सरकारी सैन्याचा बंडाळीचा बिमोड करण्यासाठी उपयोग करावा लागे. कारण, हा सर्व प्रदेश उघडा असल्याने चोर लुटारूना या प्रदेशांत लपून छपून प्रवेश करणे कठीण जात नाही.

१६७० साली कोळी राजाने चौथियाच्या राजा विरुद्ध बंड करून त्याचा काही प्रदेश घेतला व तो आमच्याकडे चौथ मागू लागला. त्याने डहाणूपासून माहीम पर्यंतच्या प्रदेशांत पुष्कळ वेळा लुटालूट आणि चोऱ्या माऱ्या केल्या. त्याच्या ह्या उपद्रवास आळा बसावा म्हणून आम्ही चौथियाच्या राजास न कळवितां त्याला चोरून चौथ देऊं लागलों. परंतु त्यामुळें त्याचें समाधान न झाल्याने त्याने आपली आक्रमणे पुनः सुरूं केली. त्याने उतरेकडील प्रदेशांतच नव्हे, तर दमण शहराच्या कक्षेंतील खेडयांत देखील लुटालूट आणि जाळपोळ केली. चौथियाच्या राजाला कोळी राजाचा बंदोबस्त करण्याबद्दल सांगण्यात आले. परंतु त्याने त्या बाबतीत काहीच केले नाही. अखेर दमणचे कॅप्टन माथिअस द सौझ यानी गव्हर्नर आंतोनियु पाइश द सांद व मानुएल कोर्त रेआल यांना या प्रश्नाबाबत पत्र घातले. त्यानी कळविले की चौथियाचा राजा जर आमच्या खेडयांचे रक्षण करण्यास असमर्थ असेल, तर कोळीं राजास चौथ देऊन त्याच्या बंडाळीस आळा घालावा.

सरकारच्या उपरिनिर्दिष्ट हुकुमान्वये दमणचे कॅप्टन माथिअस हे काही माणसे घेऊन करमळे या खेडयात गेले. तेथे चौथियाच्या राजाची व त्यांची बोलणी होऊन १६७१ च्या एप्रिल महिन्यात एका नवीन करारावर सह्या झाल्या. कॅप्टन माथिअस हे नंतर दमण तारापूर व माहिम येथील माणसे घेऊन असेरी येथील किल्ल्याच्या वारणापूर तटबंदीकडे गेले. तेथें त्याना चौथियाची माणसें येऊन मिळाली. मग ते सगळे कोळी राजाच्या खेडयांत आणि तटबंद्यांत शिरले व त्यानी तेथें जें काय होतें त्याची जाळपोळ करून ते दमणला माघारा परतले. ही घटना जुलैं महिन्यात घडली. डिसेंबर महिन्यात मनुएल फुर्तादु द मेंदोंसा हे दमण येथें बदलून आले. कोळी राजाने माहिम व तारापूरच्या जवळपासच्या खेडयांत आक्रमणे चालू केली. तो आमच्यापासून फार लांब असल्याने आम्ही त्याला शासन करूं शकलों नाही. म्हणून **दमणचे कॅप्टन मानुएल फुर्तांद यांनी शिवाजीशी**

संधान लावून कोळी राजास शासन करण्याची त्याला विनंती केली.[1] त्या समझौत्यानुसार शिवाजीचे सैन्य कोळी राजाच्या राज्यात १६७२ च्या एप्रिल किंवा मे महिन्यात घुसले. कोळी राजा पळून गेला. परंतु तो आमच्या खेड्यांना उपद्रव दिल्यावाचून राहिला नाही. त्याने चौथियाच्याहि खेड्यांची नासधूस केली. त्या दरम्यान त्याचे आणि शिवाजीचे युद्ध संपले नाही. त्याची काही माणसें शिवाजीच्या सैन्याशी लढतच होती. त्याने चौथियाची खेडी घेतली असल्याने त्या खेड्यांचा चौथ तो आमच्याकडे मागत होता. परंतु शिवाजीच्या हल्ल्यामुळें त्याची खेडी आतां त्याच्यापाशी राहिली नसल्याने कॅप्टन माथिअस यांनी त्याला चौथ देण्यास नकार दिला. त्यानी चौथची रक्कम अनामत म्हणून 'सां पाउल' येथे ठेवून दिली. त्यांनी ही रक्कम कोळी राजा, चौथियाचा राजा किंवा शिवाजी यांच्यापैकी कुणालाच दिली नाही. जोपर्यंत ' चौथियाच्या खेड्यांचे भवितव्य निश्चित होत नाही तोपर्यंत चौथ कुणालाच द्यायचा नाही असा निर्णय त्यानी घेतला.

शिवाजीचा चौथवर दावा आहे. परंतु तो आमच्या शेजारी असून-देखील आमच्या प्रदेशांत त्याने चोऱ्यामाऱ्या किंवा आक्रमणाचे प्रकार केले नाहीत. इतकेंच नव्हे, तर चौथिआचा राजा ज्याप्रमाणे चोर दरोडेखोरांपासून आमच्या खेड्यांचे रक्षण करीत होता, त्याप्रमाणे शिवाजीने खिंडी आणि रस्ते रोखून चोर दरोडेखोरांचा बंदोबस्त केला आहे. त्यामुळे त्याला चौथचा कर देण्यास हरकत नसावी असे वाटते. आणि शिवाजीचा बंदोबस्त ठेवण्याचा हेतु देखील तोच आहे. म्हणजे चौथियाला आम्ही जो चौथचा कर देत होतो ते आम्ही आपणास द्यावा हा. शिवाजीने कोळी राजा आणि चौथिया या दोघांना गप्प बसविले आहे. इतकेंच नव्हे, तर बलसाडपर्यंत मोगलांच्या प्रदेशांतहि पाचर मारली आहे. तो श्रीमंत आणि बलाढ्यहि आहे. त्याच्या सामर्थ्याच्या मानाने आमचे सामर्थ्य मर्यादित आहे. आमचा अधिकार शहर आणि किल्ला यांच्या पलीकडे जात नाही. त्यामुळे आम्हाला सगळीकडे धावाधाव करणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत शिवाजीने इकडचा सर्व प्रदेश घेतला तर आश्चर्य करण्याचे कारण नाही. म्हणून ज्याअर्थी तो आमची कसलीच नुकसानी करीत नाही त्याअर्थी तो मागत असलेला चौथ त्याला देण्यास हरकत नाही.

आता शिवाजी आमच्याकडे ज्या खाद्योपयोगी वस्तूंची मागणी करीत आहे त्याकडे वळूं. यंदा त्याने आपल्याकडून सामान पुष्कळ नेले असल्याने त्याला ते आणखी देऊं नये

१. शिवाजी महाराजांचे पेशवे मोरोपंत पिंगळे यानी जव्हार ५ जून १६७२ या दिवशी घेतले.

कारण, त्याला आणखी सामान दिले, तर या ठाण्यात त्याची टंचाई भासेल. त्यांतच गोव्याकडे दिवच्या किल्ल्याचें भात पाठविण्यांत आले आहे. त्यांत पुनः पुढच्या वर्षाची तरतूद केली पाहिजे. तरीही शिवाजी हा या शहराचा आणि किल्ल्याचा प्रामाणिक मित्र असल्याने त्याला आणखी थोडे धान्य पुरविण्यास हरकत नसावी. नाही तरी आपण मागच्या काळांत खंबायत, सुरत वगैरे बंदराना भात आणि इतर खाद्योपयोगी वस्तु विकत होतोंच. परंतु शिवाजीने भाताची जी चालू मागणी केली आहे ती आमची परीक्षा पाहण्यासाठी की काय कळत नाही. कारण, त्याने सोळसुंबाचे मानुएल पैशोतु द गामा यांच्याकडे १०० मुडे[1] भात घेण्याचा करार केल्याची बातमी आहे. त्याबद्दल इसारा म्हणून पैशोतु द गामा याना शिवाजीकडून २०० अश्रफी मिळाल्याचेंहि कळते. हे भात जर त्याने नेले नाही तर कायद्याप्रमाणें त्याचा इसारा बुडेल.

ही सर्व परिस्थिती हें उदात्त शहर कौंट व्हिसेरेइ याना सादर करीत आहे. तरी ह्या शहराच्या नागरिकांचे व शाही राजमुकुटाच्या कक्षेतील खेड्यांचे हितसंबंध लक्षांत घेऊन आपण काय तो निर्णय घ्यावा. या शहराची भावना आहे की, चौथच्या प्रश्नावरून शिवाजीशी या शहराचें वितुष्ट येऊ नये. तसें झालें तर करदाते, नागरिक आणि कर न देणारे यांचीहि नुकसानी होईल.

प्रस्तुत निवेदनाचे लेखन दमण शहराच्या नगरपालिकेत दि. २८ मे १६७७ या दिवशी मी नगरपालिकेचा कारकून अंतोनियु मौरांव कौतिन्यु याने केले.* (उपर्युक्त कागद लिस्बन येथील सायन्स अकादमीच्या ग्रंथालयात असून त्याचा क्रमांक ५८ व पृष्ठ २३५ आहे).

क्र. ३७ **दि. १६ ऑगष्ट १६७७**

शिवाजी महाराजाना ठाणे जिल्ह्यांतील पोर्तुगीज वसाहतीकडून विशेषतः दमणच्या खेड्यातून ' ग्रांव कांदील ' अथवा ग्रामखंडीचा कर मिळत असे. प्रस्तुत कर मराठे गावोगाव हिंडून वसूल करीत असत. परंतु असें करताना ते इतरहि वस्तू गावांतून घेऊन जाऊं लागले म्हणून पोर्तुगीज अधिकाऱ्यानी त्याना खेडोपाडी हिंडण्याची मनाई केली. प्रस्तुत कागद त्या मनाई हुकमासंबंधीचा आहे.

कॅप्टन जोसेफ द मेलू द काश्त्रु यांचे ग्रामखंडी अथवा ग्रावक असुराक्ष... बद्दल उत्पन्नाचा ' चौथ उत्तरेकडील प्रदेशाच्या सेनापतीस पत्र. पल्या अधिकाऱ्यांकरवी

१. मुड्यामध्ये दहा कुडव भात मावत असे. तो गवतापासून ब os do Conselho do

* Apendice : Assentos do Conselho do Estado Vol. I

सिंज्योर दों मानुएल लोबु द सिल्वैरा. आज दि. १६ या दिवशी बाजीपंत व कोळवणचे हवालदार या दोघांची दोन पत्रें ग्राव कंदिलच्या कराबाबत आली. हा कर त्वरीत चुकता करावा अशी मागणी दोघांनी केली आहे. हा कर वसूल करण्यासाठी शिवाजीची माणसे आमच्या खेड्यांत येत असत. परंतु तो वसूल करण्याच्या इराद्याने ही जी माणसे येतात, तीं कराशिवाय आणखी बऱ्याच वस्तु आमच्या खेड्यांतून घेऊन जातात, अशा तक्रारी आल्याने मी हुकूम काढला की, ग्रांव कंदिलचा कर कुणीही शिवाजीच्या माणसाना देऊं नये. त्यानी हा कर आमच्या हद्दीवरून घेवून जावा. मी बाजीपंतानाही कळविले आहे की, त्यानी ग्रांव कंदिलचा कर वसूल करण्यासाठी त्यांची माणसे आमच्या खेड्यांत पाठवू नयेत. हा कर तुम्हाला सैंबानच्या हद्दीवर चुकता केला जाईल. तरी आपण मला आज्ञा करावी की, माझी आज्ञा बरोबर आहे की नाही.

दमण आणि तारापूर येथील यशाची बातमी वसईहून भिवंडीच्या सुभेदारास कळविण्यात आली आहे. भिवंडीच्या व्यापाऱ्याना अटक करण्यांत येईल असें कळविण्यांत आल्याने तिकडच्या एकाही व्यापाऱ्याने कांबला जाऊं नये असा हूकूम काढण्यात आला . . . . . *

देव आपले रक्षण करो.

दि. १६ ऑगष्ट १६७७
जोसेफ द मेलु द काश्त्रु

क्र. ३८ दि. १३ सप्टेंबर १६७७

शिवाजी महाराजानी पोर्तुगीजाकडे चौथची मागणी केली होती. तो त्याना द्यावा की देऊ नये याबाबत गोव्याच्या हिसेरेइने राज्य सल्लागार मंडळाचे मत अजमावले असतां त्याने सल्ला दिला की शिवाजी महाराज आणि चौथियाचा राजा यांच्यामधील युद्धाचा निर्णय लागेस्तोवर चौथ कुणालाच देऊं नये. शिवाजी महाराजांच्या सैन्याच्या दमण मधील आक्रमणाबाबत सल्लागार मंडळाने मत व्यक्त केलें की हया सैन्याचा प्र[illegible] करण्याचा हुकूम दमण मधील व इतर भागांतील ल[illegible] शिवाजी आम[illegible] द्यावा.

यंदा त्याने आपल्याक[illegible]

१. शिवाजी महाराजांचे [illegible] सायन्स अकादमीच्या ग्रंथालयात असून त्याचा क्र. ५८ आहे) घेतले. [illegible] Conselho do Estado Vol. IV, No. 34, pg. 559-560.

[1]दि. १३ सप्टेंबर १६७७ या दिवशी गोवा शहरी व्हिसेरेइ आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल मान्यवर कौंट द लावरादिव यानी राज्य सल्लागार मंडळाची सभा भरविली. काही सभासद आजारामुळे या सभेस उपस्थित राहू शकले नाहीत. व्हिसेरेइनी सभासदाना विदित केले की, आमच्या उत्तरेकडील प्रदेशाचे सेनापती दों मानुएल लोबु द सिल्वैरा यानी मला पत्र पाठवून कळविले आहे की, शिवाजीचा एक सेनाधिकारी दरोडेखोर कोळ्यांचा पाठलाग करण्याच्या मिषाने आमच्या दमणमधील एका खेड्यात शिरला. व्हिसेरेइ पुढे असेहि म्हणाले की, शिवाजी आमच्याकडे चौथ[2] मागत आहे. तरी यासंबंधी मी कोणता पवित्रा घ्यावा ते आपण मला सांगावे.

सर्व सभासदानी एक मताने निर्णय दिला की, शिवाजीच्या सैन्याचा प्रतिकार करण्याचा आदेश आमच्या दमणमधील व उत्तरेकडील प्रदेशातील शिबंद्यांच्या सेनापतीना धाडावा. चौथबाबतीत त्यानी सल्ला दिला की, शिवाजी आणि चौथियाचा राजा यांच्यामधील लढा समाप्त होऊन ज्याचा जय होईल त्याला चौथ द्यावा. तोपर्यंत चौथ कुणालाच न देता आमच्याकडेच ठेवून द्यावा.

या ठरावावर सर्व सभासदानी सह्या केल्या.*

*Assentos do Conselho do Estado Vol. IV, document No. 106.

१. प्रस्तुत कागद ठिकठिकाणी कसरीने खाल्ला असल्याने त्याचा आशय तेवढा दिला आहे. संपूर्ण अनुवाद संदर्भाअभावी देणे अशक्य झाले.

२. ' चौथ'चा इतिहास डॉ. पिसुर्लेंकर यानी जो दिला आहे त्याचा सारांश असा. साष्टीचा अथवा पोर्तुगीज लोक ज्याला चौथियाचा राजा म्हणत असत, तो कोकणातील एक अत्यंत प्राचीन राजा आहे. काही वर्षांनी खंबायतच्या राजाने त्या प्रदेशावर स्वारी केल्याने साष्टीच्या राजाचे आणि त्याचे युद्ध झाले. खंबायतचा राजा बलाढ्य असल्याने साष्टीच्या राजास त्याच्या समोर हार खावी लागली. तो जीव बचावण्यासाठी जंगलात पळून गेला. सांप्रत तो जंगलातच राहातो. खंबायतचा राजा आपले सैन्य आणि सरदार मागे ठेवून आपल्या राज्यास परतला. तो गेल्याचे पाहून साष्टीच्या राजाने जंगलाच्या आश्रयास राहून लूटमार सुरू केली. खंबायतच्या राजाचे सरदार त्याचा बंदोबस्त करण्यास असमर्थ ठरले. अखेर दोघां राजामध्ये तह झाला. त्या तहान्वये असे ठरले की, खंबायतच्या राजाने त्या प्रदेशाचे तीन चतुर्थांश आणि साष्टीच्या राजाने एक चतुर्थांश उत्पन्न घ्यावे. ते उत्पन्न घेऊन त्याने लूटमार न करतां स्वस्थ बसावे. तेव्हां पासून साष्टीचा राजा जें एक चतुर्थांश उत्पन्न घेत होता त्याला ' चौथ अथवा ' चौथाई ' हे नाव पडले. पुढे खंबायतच्या राजाकडून दमणचा मुलुख पोर्तुगीजाना मिळाल्यावर त्यानी साष्टीच्या राजास चौथ अथवा चौथाई देण्याची जुनी प्रथा चालूच ठेविली. तथापि ज्या प्रदेशांत पोर्तुगीज सैनिक सुरक्षितता प्रस्थापित करू शकले त्या प्रदेशाच्या उत्पन्नाचा ' चौथ ' त्यानी साष्टीच्या राजास देण्याचा बंद केला. फक्त जो प्रदेश असुरक्षित होता व साष्टीचा राजा तेथे लूटमार करू शकत होता, त्याच प्रदेशाच्या उत्पन्नाचा ' चौथ ' ते साष्टीच्या राजास देऊ लागले. हे उत्पन्न साष्टीचा राजा आपल्या अधिकाऱ्यांकरवी पोर्तुगीजांकडून वसूल करी.

(Livro do Tombo de Damao pg. 161, Assentos do Conselho do Estado Vol. IV, foot note pgs 253-254.)

क्र. ३९ गोवा, दि. ३० सप्टेंबर १६७७

चौथियाच्या राजाने गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठवून विनंती केली होती की, शिवाजीशीं आपले जोंपर्यंत युद्ध चालू राहील तोपर्यंत आपल्या बायका मुलाना एकाद्या किल्ल्यांत किंवा किल्ल्याच्या परिसरात आश्रय द्यावा व युद्ध खर्च चालविण्यासाठी चौथच्या थकबाकी पैकी चार अथवा पांच हजार रुपये द्यावेत. व्हिसेरेइने याबाबत राज्य सल्लागार मंडळाचा सल्ला घेऊन निर्णय घेतला की, चौथियाच्या राजाच्या बायका मुलाना आश्रय देऊ नये. मात्र त्याने जी रक्कम मागितली आहे तिच्यापैकी त्याला चार हजार रुपये द्यावेत.

दि. ३० सप्टेंबर १६७७ या दिवशी गोवा येथे व्हिसेरेइ आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल कौंट द लावरादिव यानी राज्य सल्लागार मंडळाची सभा बोलविली. त्यानी सभेला सांगितले की, चौथियाच्या राजाने आमच्या उत्तरेकडील प्रांतातील किल्ल्यांचे कॅप्टन दों मानुएल लोबु द सिल्वैंरा याना पत्र लिहिले आहे की, शिवाजीने आपला जो प्रदेश घेतला आहे, तो परत काबीज करण्यासाठी आपण त्याच्याशी सांप्रत युद्ध सुरू केले आहे. आपल्या सैन्यात भिल्लांची भरती आपण केली आहे. परंतु आपणास सारखे फिरतीवर रहावे लागत असल्याने आपला कबिला आपण बरोबर घेऊ शकत नाही. तरी आपल्या बायकामुलाना दमण शहरात अथवा शहराच्या तटाबाहेर आश्रय द्यावा व त्यांच्या खर्चासाठी चार किंवा पांच हजार रुपये द्यावे. ही रक्कम आपण चौथच्या वसुलापोटी आमच्याकडे अनामत रक्कम म्हणून ठेविली असल्याचा त्याचा दावा आहे. तरी या प्रस्तावाबाबत सभासदानी आपले मत प्रदर्शित करावे.

सल्लागार शौपांव द सौझ कौतिन्यु म्हणाले की, चौथियाचा राजा आमचा पुष्कळ वर्षांचा शेजारी आहे. तो जर आम्हास विनंती करीत असेल की, आपल्या बायकामुलाना आम्ही आश्रय द्यावा, तर मला असे वाटते की, त्याच्या विनंतीची आपण कदर करावी व त्याच्या बायकामुलाना 'सां जेरोनिमु'च्या किल्ल्यात अथवा त्या किल्ल्याच्या परिसरात रहावयास जागा द्यावी. मात्र तो जे चार किंवा पाच हजार रुपये मागत आहे ते त्याला देऊ नयेत. कारण, ज्या प्रदेशाचा तो वसूल आहे, तो प्रदेश सांप्रत त्याच्या अमलाखाली नाही. जोपर्यंत हा प्रदेश त्याच्या अमलाखाली येत नाही तोपर्यंत त्या प्रदेशाचा चौथ मागण्याचा त्याला अधिकार नाही.

गोवा शहराचे कॅप्टन दों फेर्नांद द काश्त्रु यानी आपली बाजू अशी मांडली : शिवाजीचे आणि चौथियाच्या राजाचे सांप्रत युद्ध चालू असल्याने शिवाजीचे शत्रुत्व करणे आम्हाला परवडण्यासारखें नाही. शिवाजी बलाढ्य आहे. आम्ही

चौथियाच्या राजास मदत करीत असल्याचे जर त्याला कळले तर तो आमच्या साष्टी आणि बार्देश प्रांतावर हल्ला करील व गोवा शहरालाही तो धोका निर्माण करू शकेल. म्हणून चौथियाच्या राजास उत्तर धाडावे की, तुझीं बायकामुले सांप्रत ज्या ठिकाणी आहेत तिथेंच ती असू देत. त्याला चौथचा थकलेला वसूलही आपण देऊं नये. कारण तो अधिकार त्याने गमावला आहे. परंतु शिवाजीशीं त्याचे युद्ध चालू आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन त्याला अन्य मार्गे गुप्तपणे मदत आपण करावी. परंतु या मदतीचा चौथच्या वसुलाशीं काही संबंध नाही, हें त्याच्या निदर्शनास आणावे.

महसूल खात्याचे इन्स्पेक्टर जनरल म्हणाले की, चौथियाचा राजा ज्या अर्थी शिवाजीशी युद्ध करतो आहे, त्याअर्थी त्याला चार हजार रुपयांची मदत करण्यास हरकत नाही. तसेंच युद्धाची प्रगती पाहून त्याला आणखी मदत करण्याचे आश्वासन देण्यासही अडचण नाही. मात्र ही मदत त्याला त्याच्या थकलेल्या चौथच्या वसुलापोटी देऊ नये. कारण गेल्या चार पांच वर्षांपासून त्याने चौथ वसूल केलेला नाही. त्याला कळवावे की, त्याने जर युद्ध जिंकले तर त्याचा थकलेला चौथचा वसूल त्याला चुकता केला जाईल.

सल्लागार दों मानुएल माझ यांनी दृष्टिकोण व्यक्त केला की, चौथियाच्या राजाच्या बायकामुलाना आपण आश्रय द्यावा व त्याने मागितलेली रक्कमहि त्याला द्यावी.

आर्चबिशप प्रिमाज व इंक्विझिटर फ्रान्सिश्कु देल्गादु द मातुश हे म्हणाले की, चौथियाच्या राजाच्या बायकामुलाना आश्रय देण्यांत धोका आहे. उद्या शिवाजीचा विजय होऊन जर त्याने त्यांची आपणाकडे मागणी केली, तर त्याला आपण काय जबाब देणार ? आपण चौथियाच्या बायकामुलांना जर शिवाजीच्या ताब्यात दिले नाही, तर तो आमच्या खेड्यांची जाळपोळ करील. मात्र चौथियाने जी पैशांची मदत मागितली आहे ती त्याला गुप्तपणे देण्यास हरकत नाहीं.

सल्लागारांचा दृष्टिकोण ऐकून घेतल्यावर मान्यवर कौंट व्हिसेरेइ यानी निर्णय दिला की, शिवाजी राजे यांच्याशी आमचा तह असल्याने त्या तहाचा भंग होऊं शकणारे कोणतेहि कृत्य आम्ही आमच्याकडून होऊं देणार नाही, असे उत्तरेकडील किल्ल्याच्या कॅप्टन जनरलनी चौथियाच्या राजास कळवावे. त्याचीं बायकामुलें सांप्रत ज्या जंगलाच्या आश्रयास आहेत तेथेंच त्याना ठेवावे. मात्र त्याने जी चार किंवा पांच हजार रुपयांची मदत मागितली आहे, त्या रकमेपैकी त्याला उत्तरेच्या कॅप्टन जनरलनी दमणच्या खजिन्यातून चार हजार रुपये द्यावेत. चौथियाच्या राजाचा दावा आहे की, गेल्या चार-पांच वर्षांपासून त्याने चौथच्या वसुलापोटीं एक कपर्दीहि घेतलेली नाही. हा चौथ दमणच्या कक्षेतील प्रदेशाचा आहे हे स्पष्टच आहे. तथापि चौथियाच्या राजाला मदत करताना सर्व प्रकारची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्याला युद्धाची प्रगती पाहून आणखी मदत देण्यासही हरकत नाही.*

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 107.

क्र. ४० **गोवा, दि. २८ डिसेंबर १६६७**

शिवाजी महाराजानी अनेक ठिकाणी युद्ध चालविल्याने पोर्तुगीजांच्या ताब्यांतील प्रदेशाची कुचंबणा झाली होती. शिवाजी महाराज बलाढ्य बनल्याने पोर्तुगीज लोक त्यांची कुरापत काढण्यास धजत नव्हते. अशा परिस्थितीत कोणता पवित्रा घ्यावा त्या बाबत गोव्याचे व्हिसेरेइने राज्य सल्लागार मंडळाचे मत अजमावले असता त्याने सल्ला दिला की, शिवाजी राजे बलाढ्य असल्याने त्यांच्या वाटेला जाणे हिताचे नाही. नुसत्या आरमाराच्या बळावर त्यांच्याशी आपण युद्ध करू शकणार नाही.

दि. २८ डिसेंबर १६७७ या दिवशी गोवा शहरातील किल्ल्याच्या शाही दिवाण-खान्यात व्हिसेरेइ आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल दों पेद्रु द आलमैद यानी राज्य सल्लागार मंडळाची सभा बोलविली. त्यानी सभेला विदित केले की, चालू वर्षाच्या आक्टोबर महिन्यात मी व्हिसेरेइ आणि पोर्तुगीज हिंदुस्थानचा कॅप्टन जनरल या नात्याने राज्यसूत्रे हाती घेतली असल्याने माझ्या कारकीर्दीतील राज्य सल्लागार मंडळाची ही पहिलीच सभा आहे. आज सभेसमोर काही महत्वाचे विषय चर्चे-साठी ठेवले आहेत. मावळते व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल कौंट द लावरादिव यानी राज्य सल्लागार मंडळाच्या शेवटच्या सभेत जे भाषण केले, त्यांत त्यानी या राज्यासमोर उभ्या असलेल्या काही बिकट समस्यांचा ऊहापोह केला होता. त्या समस्यांपैकी एक समस्या ही की, आमचे शेजारी शिवाजी राजे यानी आदिलशहा, चौथियाचा राजा, कर्नाटकच्या आणि इतर राजांशी जें युद्ध चालविले आहे त्यामुळे आमच्या व्यापाराची फार नुकसानी होत आहे, व या राज्यात बाहेरच्या जीवनोपयोगी वस्तू येणे मुष्किल झाले आहे. आमची दोन आरमारे बाहेरच्या वस्तू इकडे आणण्यासाठी नौकाना संरक्षण देत असतात. पैकी, उत्तरेकडचे आरमार खंबायतहून इकडे येणाऱ्या कापडाला संरक्षण देते, तर दक्षिणेचे आरमार कर्नाटकांतून या राज्यांत येणाऱ्या तांदळाला संरक्षण देते. परंतु ह्या दोन्ही वस्तू युद्धामुळे दुर्मीळ झाल्याने या राज्यांतील नागरिकांची भयंकर गैरसोय झाली आहे. बरे आरमारें व्यापाराला संरक्षण देण्यासाठीं उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे पाठवायची म्हटले, तर या राज्याच्या संरक्षणाला बाधा येते. आपणाला माहीत आहेच की, आमचे शेजारी शिवाजी राजे हे आतां श्रीमंत आणि गर्विष्ठ बनले आहेत. आमच्या साष्टी आणि बार्देश या दोन प्रांतावर आणि काही बेटांवर त्यांचा डोळा आहे. हा सर्व प्रदेश असुरक्षित असल्याने त्यावर आक्रमण झाले, तर त्याचे रक्षण करण्याकरितां आम्हाला पुष्कळ सायास पडणार आहेत. त्यांतच आमच्यापाशी पुरेसें सैन्यहि नाही. शिवाजी राजे आणि त्यांचे सुभेदार काहीतरी खुपसटे काढून

आमच्या प्रदेशांत सैन्य घुसविण्याच्या धमक्या आम्हाला वारंवार देत असतात. अलीकडेच शिवाजी राजे यांचा एक वकील या शहरी आला. त्याने आम्हाला जें निवेदन सादर केले, त्यांस त्याने म्हटले आहे की, आपणाला आम्ही आदिल-शहाच्या वकिलासारखे वागवावे, व खंडणी द्यावी व आमच्या युद्धनौकानी पकड-लेली जहाजे मुक्त करावी. या प्रश्नाबाबत शिवाजी राजे यानी माजी व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल कौंट द लावरादिव याना पत्रे पाठविली होती, असे शिवाजी राजे यांच्या वकिलाच्या निवेदनावरून कळून येते. कौंट द लावरादिव याना आलेली उपरिनिर्दिष्ट पत्रें बघून मला शिवाजी राजे यांच्या वकिलाच्या निवेदनास प्रत्युत्तर द्यायचे आहे. हे उत्तर जर दिले नाही तर मला भीति वाटते की शिवाजी राजे त्या कारणावरून आम्हास उपद्रव देतील.

तरी मान्यवर सभासदानी आपली मते प्रकट करावीत.

बहुतेक सर्व सभासदानी दृष्टिकोण व्यक्त केला की, या राज्याला जीवनोपयोगी वस्तूंची भयंकर टंचाई जाणवत आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन त्या वस्तू आणण्यासाठी इथल्या व्यापाऱ्यांना युद्ध नौकांचे संरक्षण देऊन उत्तरेस कापड आणण्यासाठी व दक्षिणेस तांदुळ आणण्यासाठी पाठवावे. ते म्हणाले की, शिवाजी राजे हे अनेकांशी युद्ध करीत असून सगळ्यांचे समायिक शत्रु बनले आहेत. हा सर्व प्रदेश जिंकून घेण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे. त्यांच्यापाशी बलाढ्य घोडदळ आणि पायदळ आहे. अशा परिस्थितींत केवळ आमच्या आरमाराच्या बळावर आम्ही त्यांच्याशी युद्ध करूं शकणार नाही.

प्रस्तुत दृष्टिकोण लक्षांत घेऊन उत्तरेस आणि दक्षिणेस माल आणण्यासाठी युद्ध-नौका पाठविण्याचा निर्णय व्हिसेरेई यानी घेतला.*

क्र. ४१ **इ. स. १६७७ (?)**

साष्टीचा ऊर्फ चौथिया राजा नारायण देव राणे हा पोर्तुगीजांपाशी शिवाजी महाराजांशी त्याचें युद्ध चालू रहावे म्हणून चौथचा कर मागत होता. गोव्याचा व्हाइसरॉय त्याला कळवितो की, युद्धाचा निर्णय लागेतो-पर्यंत चौथची रक्कम मिळणार नाही. परंतु गुप्तपणे दोन हजार रुपये देण्याची व्यवस्था करूं.

साष्टीचे राजे नारायण देव राणे यांस

चालू वर्षाच्या १३ एप्रिलचे आपले पत्र व नोंदी आपले वकील बोमुजी पडदाते यानी आम्हास सादर केल्या. आपण आम्हास कळवितां की तुमच्या सैन्याची

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 115.

सरशी होत आहे. तुमच्या कल्याणाविषयी आम्हास आस्था असल्याने तुमचे पत्र वाचून आम्हास आनंद झाला.

युद्ध चालू रहावे म्हणून आपण चौथ मागतां. अशीच मागणी शिवाजी राजे हेही करीत आहेत. त्यांचा वकील या शहरी त्यांचे पत्र घेऊन आला होता. शिवाजी राजे यांचा असा दावा आहे की, तुमच्या राज्यापैकी साष्टीचा बहुतेक सर्व प्रदेश त्यांनी जिकला असून त्यांचे सैन्य आणखी प्रदेश घेत चालले आहे. म्हणून या प्रदेशाचा जों चौथ आम्ही तुम्हाला देत होतो, तो आपणास मिळाला पाहिजे. कारण या प्रदेशावर आपले स्वामीत्व प्रस्थापित झाले आहे. परंतु ज्या अर्थी तुम्हा दोघांमध्यें अद्याप युद्ध चालू आहे आणि त्याचा निकाल अद्याप लागलेला नाही, त्या अर्थी चौथ कुणाला द्यायचा हा आम्हाला प्रश्न पडला आहे. चौथ तुम्हाला दिला, तर शिवाजी राजे यांचा आमच्यावर रोष होईल आणि त्याना दिला तर तुम्ही रागवाल. म्हणून युद्धाचा निर्णय लागेपर्यंत चौथ कुणालाच द्यायचा नाही असें धोरण आम्ही ठरविले आहे. जर चौथ पराभूत पक्षाला दिला, तर त्याचे अनिष्ट परिणाम दमणच्या हद्दींतील खेडयांना भोगावे लागतील. कारण, विजयी पक्षाच्या लोकांकडून त्याना उपद्रव पोहोचेल. त्यांतच या अंदाधुंदीमुळें या खेडयांना चोर-दरोडेखोरांचा उपसर्ग होत आहे. अशा परिस्थितीत त्या खेडयां-कडून चौथ कसा वसूल करायचा ? गेल्या काही वर्षात जो थोडा फार चौथ वसूल झाला तो अनामत रक्कम म्हणून ठेवण्यात आला होता. त्या रकमेंतून चार हजार रुपये तुम्ही उचलले आहेत. आतां फक्त तीन हजार रुपये शिल्लक आहेत. तरीही आम्ही आमच्या उत्तरेकडील किल्ल्यांचे सेनापती दमणच्या किल्ल्याचा कॅप्टन, त्या शहराच्या नगरपालिकेचे पदाधिकारी आणि कारभारी मंडळ याना कळविले आहे की, तुम्ही आमच्याशी सौजन्याने आणि शिष्टाचाराने वागतां आहात म्हणून तुम्हाला गुप्तपणे दोन हजार रुपये द्यावेत ..... त्यामुळें तुम्हाला युद्ध चालू ठेवण्यास मदत ....*

क्र. ४२ गोवा, दि. १० जानेवारी १६७८

शिवाजी महाराजानी गोव्याच्या व्हिसेरेइला चौथच्या कराबाबत लिहिलें होते. प्रत्युतरीं तो त्याना कळवितो की, चौथच्या कराबाबतच्या वाटाघाटी करण्यासाठी आवश्यक ते अधिकार देऊन एक वकील पाठविण्याबद्दल आपणास पत्र पाठविन. शिवाजी महाराजांच्या परा-क्रमाच्या वार्ता आपण पोर्तुगालांत ऐकल्या होत्या असेंहि त्याने प्रस्तुत पत्रात लिहिले आहे.

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 6.

शिवाजी राजे यांस

आपला वकील पितांबर शेणवी यानी मला एक निवेदन सादर केले .... माझ्या पूर्वीचे व्हिसेरेइ याना त्यानी काही पत्रे सादर केली होती. परंतु ते कामात व्यग्र असल्याकारणे प्रस्तुत पत्राना प्रत्युतरें धाडण्याची सवड त्याना झाली नाही. पितांबर शेणवी यांचे निवेदन मिळतांच मी त्या पत्रांची चौकशी सचिवालयांत करण्याचा हुकूम केला. इतके होईस्तोवर पितांबर शेणवी यांनी मला आपलीं पत्रे आणून दिली. ती वाचून मला फार आनंद झाला. कारण माझ्या आगमनाबद्दल आपल्या पत्रात आपण समाधान व्यक्त केलें आहे. आपणाविषयी मला नेहमीच कौतुक वाटत आलें आहे. **कारण माझ्या देशात पोर्तुगालात मी आपल्या शौर्याच्या आणि पराक्रमाच्या वार्ता ऐकत होतो** ...... या राज्याचे आपण मित्र असल्याने आपणाशी माझे सलोख्याचे आणि मैत्रीचे संबंध असतील .... माझ्या स्वामीनी मला तशा सूचना केल्या आहेत. आपल्या पत्रात आपण मागणी केली आहे की, वसई आणि दमण येथील किल्ल्यांबद्दल लिहिण्याची आज्ञा करावी व चौथचा कर भरावा .... कारण, त्या प्रदेशाचे आपण आतां स्वामी झाला आहात. मला इकडे येऊन फार दिवस झाले नसल्याने चौथच्या कराबद्दल मला विशेष माहिती नाही म्हणून मी तिकडच्या आमच्या अधिकाऱ्याना प्रस्तुत करा-संबंधीची माहिती पाठविण्याची आज्ञा करीत आहे. ती माहिती आली की, तत्संबंधी वाटाघाटी करण्यासाठी एक अधिकृत वकील आवश्यक ते अधिकार देऊन इकडे पाठविण्याबद्दल मी आपणास पत्र घालीन .... आपण निश्चित असावे की चौथिया राजाला आम्ही जो कर देत होतो, तो कर आपणाला आम्ही देऊं. आपल्या पत्रांत आपण आणखी जे काय लिहिले आहे त्याबद्दल मी आपणाला कळवूं इच्छितो की, पोर्तुगीज लोक हे आपल्या मित्राना फार चांगले मानतात. आपण सुज्ञ असल्याने ह्या गोष्टींचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. आमच्या मधील मैत्री दृढ व्हावी व ती उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावी ही माझी प्रामा-णिक इच्छा आहे. तसेंच मी आपला एक इमानी मित्र आहे हेंहि आपण विसरूं नये. आपल्या दैवी अनुग्रहाने ईश्वर आपणावर प्रकाश पाडो.*

गोवा, १० जानेवारी १६७८
दों फरान्सिश्कु द आल्मैद

* Livro de Reis Vizinhos No. 3, fls 2.

क्र. ४३ गोवा, इ. स. १६७८ (?)

डिचोलीचे सुभेदार गिरमाजी पंडीत यानी गोव्याच्या हद्दींतील काही बदमाश लोक शिवाजी महाराजांच्या प्रदेशांत शिरून गुन्हे करतात, अशी गोव्याच्या व्हिसेरेइकडे तक्रार केली होती. त्याला तो उत्तर पाठवितो की संशयिताना अटक केली असून त्यांच्यावर खटले भरले जाणार आहेत. याच पत्रांत व्हिसेरेइ तक्रार करतो की, पेडणे येथील लोक गुंडगिरी करतात व त्याचा आळ पोर्तुगीज हद्दीतील लोकांवर घालतात, तरी त्यांची चौकशी करावी.

डिचोलीचे सुभेदार गिरमाजी पंडीत यांस

आपल्या दि. १८ डिसेंबरच्या पत्रांत आपण तक्रार केली होती की, बार्देश मधील काही बदमाश माणसें तुमच्या हद्दीत शिरून लूटमार व जाळपोळ करतात. त्याना बार्देश मधील लष्करी अधिकाऱ्यांची व गावकऱ्यांची फूस असल्याचा संशय आपण व्यक्त केला आहे. आपल्या तक्रारीची आम्ही चौकशी केली असतां ती निराधार असल्याचे आम्हाला आढळून आले. आपणाला वरील माहिती कुणी तरी चुकीची पुरविली असली पाहिजे. आमच्या शेजाऱ्यांशी आमचे संबंध चांगले असावेत असा माझा कटाक्ष असल्याने आमच्या बार्देश आणि साष्टी प्रांतांतील लष्करी अधिकाऱ्याना मी सरहद्दीवर चांगला बंदोबस्त ठेवण्याची आज्ञा फर्माविली आहे. तसेंच जे गुन्हेगार त्यांच्या हातास लागतील त्याना कडक शासन करण्याच्याही सूचना त्याना देण्यात आल्या आहेत...........आपल्या मागच्या पत्रांत आपण तक्रार केली होती की, आमच्या काही सैनिकानी आपल्या हद्दींतील एका कलावंतिणीच्या घरांत बळजबरीने शिरून कांही अनुचित गोष्टी केल्या. या प्रसंगी काही भटजीना उपसर्ग पोहोचल्याचीहि आपली तक्रार होती. ह्या घटनेची मी लगेच चौकशी केली व दहा बारा लोकाना अटक करण्यांत आली. त्याना तुरुंगात ठेवण्यात आले असून त्यांच्यावर खटला भरण्यांत येणार आहे. त्याना कडक शिक्षा झाल्यावांचून राहाणार नाही. माझ्या कानावर अशा बातम्या आल्या आहेत की, पेडण्यातील काही स्थानिक लोक गुंडगिरी करतात व तींत आमच्या हद्दींतील लोकाना विनाकारण गोवतात. तसें केल्याने त्यांच्या गुन्ह्यांवर पांघरूण पडते. ह्या गोष्टीची आपण चौकशी केली पाहिजे आणि त्यांचे गुन्हे शाबीद झाले तर...........आपण ज्यां रीतीने पत्र लिहिले त्या रीतीचे मला आश्चर्य वाटले... आपले स्वामी शिवाजी राजे........याना खोटेपणा...*

* Livro dos Reis Vizinhos No. 3 fls, 3.

क्र. ४४ गोवा, इ. स. १६७८ (?)

पोर्तुगीजांचा परवाना नसलेले एक शिवाजी महाराजांचे तांदळानी भरलेले तारू पोर्तुगीजांनी पकडले होते. ते सोडून द्यावे म्हणून वेंगुर्ल्यांचे हवालदार तानाजी राम यानी गोव्याच्या व्हिसेरेइला विनंती केली असतां त्याने ती मंजूर केली. तो तानाजी राम याना लिहितो की यापुढें पोर्तुगीजांचा परवाना नसलेली तारवे सोडलीं जाणार नाहीत. याच पत्रांत व्हिसेरेइ तक्रार करतो की त्यांचीं चार जहाजे शिवाजी महाराजांच्या आरमाराने पकडून राजापूर बंदरात नेली होती.

वेंगुर्ला बंदराचे हवालदार तानाजी राम यांस

आमच्या पत्राला पाठविल्या उत्तरांपैकी तानाजीराम यांचे दुसरे उत्तर पावले. त्यांत ते विनंती करतात की...........तांदळाची पोती घेऊन जाणारे जें जहाज आम्ही पकडले ते मुक्त करण्यात यावे. या प्रकरणाची चौकशी करण्याचे काम आमच्या राजाचे प्रतिनिधी व महसूल खात्याचे न्यायमूर्ती यांच्याकडे सोपविले होते. तानाजी राम यांचे पत्र मिळतांक्षणी सदहू न्यायमूर्तींना तें सादर करण्यात आले. त्यानी या प्रकरणी जो निर्णय दिला त्याची एक प्रत तानाजी राम यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. न्यायमूर्तींच्या निकालावरून तानाजी राम याना कळून चुकेल की, पकडण्यात आलेल्या जहाजाच्या मुकादमापाशी या राज्याचे दस्तक नव्हते. परंतु दोन्ही राज्यांतील मैत्रीचे संबंध केवळ या प्रकरणावरून बिघडले जाऊ नयेत असा आमचा दृष्टिकोण असल्याने न्यायमूर्तींनी जो निकाल दिला आहे, तो नजरेआड करून आम्ही पकडण्यात आलेला मचवा मुक्त करीत आहोत. तानाजी राम यानीहि आपल्या पत्रांत तशी विनंती केली आहे. मचवा त्याच्यावरील तांदळांच्या गोणीसह मुक्त करण्यात येत आहे. मात्र मचवा सोडून देताना तानाजी राम याना आम्ही इशारा देत आहोत की, **आमचे दस्तक असल्याखेरीज हिंदुस्थानच्या समुद्रात कुणाच्याहि जहाजाला संचार करता येणार नाही. हा अधिकार आम्हाला जुने कायदेकानू आणि चालीरीती यांनुसार प्राप्त झाला आहे. त्या अधिकाराप्रमाणे आम्ही आमचे दस्तक न बाळगणाऱ्या जहाजाना अटक करण्याचा हुकूम आमच्या दर्यासारंगाना दिलेला आहे.** तरी तानाजी राम यानी संबंधीत .....कळवावे की, आमच्याकडून मिळणारे शासन टाळण्यासाठी त्यानी आमचे दस्तक बाळगावे व मगच समुद्रावर संचार करावा.

प्रस्तुत प्रकरणाच्या संदर्भात तानाजी राम याना मी १६७७ सालच्या एप्रिल किंवा मे महिन्यांतील एका घटनेची आठवण करून देत आहोत. आमची चार जहाजे गहूं, चणे, वाटाणे आणि इतर माल घेऊन खंबायतहून या बंदराकडे येत असता

शिवाजी राजे यांच्या . . . . . पकडून राजापूर बंदरांत नेली. त्या वेळचे व्हिसेरेइ कौंट द लावरादिव यानी सदर्हू जहाजे सोडून देण्याची विनंती करून अण्णाजी पंडीत याना पत्र लिहिले. परंतु त्यानी त्या अर्जाचा विचार केला नाही. काही दिवसांमागे शिवाजी राजे यांचे वकील पितांबर शेणवी हे या शहरी आले असता व्हिसेरेइ दों फ्रान्सिश्कु द आल्मैद यानी जहाजे अडवून ठेवल्याचा जुना दाखला मी सादर केला ....
....*

क्र. ४५ इ. स. १६७८ (?)

पोर्तुगीज आरमाराने शिवाजी महाराजांची काही तारवे पकडली, म्हणून त्याचा बदला घेण्यासाठी अंकोला येथील शिवाजी महाराजांच्या सुभेदाराने त्याच्या अधिकार कक्षेतील प्रदेशांत शिरलेल्या काही पोर्तुगीज शिपायाना अटक केली. गोव्याचा व्हिसेरेइ अंकोल्याच्या सुभेदारास लिहितो की, जहाजांच्या अटकेची शिपायांच्या अटकेशीं गल्लत करू नये.

अंकोल्याचे सुभेदार यांस

आपले पत्र मिळाले. त्या वरून कळून आले की, आपल्या हद्दींत काही पोर्तुगीज सैनिक शिरले असतां आपण त्यांना कैद करून ठेवलें आहे. कैदेचे कारण आपण असें दिले आहे की, आमच्या आरमाराने चिडी (?) नदीत तांदळाने भरलेले आपले जे एक जहाज अटकेंत ठेवले आहे व वेंगुर्ल्याला जाणारी आणखी तीन जहाजे गोव्याला अटकेंत आहेत, त्याचा बदला म्हणून उपरिनिर्दिष्ट पोर्तुगीज शिपायांना आपण कैद करून ठेवले आहे. आम्ही आपली चार जहाजे अटक करून ठेवली म्हणून आपण आमचे सैनिक कैद करून ठेवले हा न्याय उफराटा दिसतो. कारण, जहाजांचा आणि शिपायांचा काही संबंध नाही. जहाजांचा प्रश्न हा वेगळचा मार्गानी आणि वेगळचा उपायानी सोडवायचा आहे. वेंगुर्ल्याला जाणाऱ्या ज्या तीन जहाजांचा आपण उल्लेख करतां त्या जहाजांपाशी आमचे दस्तक नव्हते म्हणून ती अटक करण्यांत आली होती. परंतु शिवाजी राजे यांच्या प्रजाजनाची तीं जहाजे असल्याने व शिवाजी राजे यांच्याशी आमचे मैत्रीचे संबंध असल्याने आम्ही ती जहाजें मागेच सोडून दिली. त्यावेळी आम्ही त्याना बजावले आहे की, त्यानी जर या पुढे आमचे दस्तक बाळगले नाहीत, तर त्याना आम्ही फिरून दया दाखविणार नाही. कारण, आमचा दस्तकाचा अधिकार हा पुरातन आणि कायदेशीर आहे. त्याचा कुणी भंग केला तर तें आम्ही खपवून घेणार नाही.

* Livro dos Reis Vizinhos No. 3; fls 4.

आपण चिडी नदींत पकडल्या गेलेल्या ज्या जहाजाचा उल्लेख आपल्या पत्रांत केला आहे, त्याची आम्हाला काही माहिती नाही. तुमच्याच पत्रांतून ही बातमी आम्हाला पहिल्या प्रथम कळते आहे. आणि समजा तें जहाज अटकेंत असलें, तरी आमच्या शिपायांच्या मुक्ततेच्या बदलीं त्याची मुक्तता करण्याची आपली मागणी सयुक्तिक आहे का? कारण, हा प्रश्न आमच्या स्वामीच्या प्रजाजनांच्या प्रतिष्ठेचा आहे. त्यांचा शोध करण्यासाठी माणसें पाठविणे आम्हाला अवघड नाही हें आपण लक्षांत ठेवावे. दुसरी गोष्ट शिवाजी राजे यांच्याशी आमचा तह तर आहेच, शिवाय मैत्रीचे संबंधहि आहेत. तुमचे कृत्य त्याना पसंत पडेल असे आम्हास वाटत नाही. ज्या मचव्यांचा उल्लेख आपण पत्रांत करतां त्याना आमच्या बंदरांतून डिचोलीला जाण्याची परवानगी देण्यात आली आहे. परंतु हा प्रवास त्यानी स्वतःच्या जोखमीवर केला पाहिजे. कारण, आपणाला माहीत आहेच की आमचे दस्तक बाळगल्याखेरीज कुणालाहि समुद्रात संचार करतां येत नाही. परंतु शिवाजी राजे यानी त्यांची जर मागणी केली, तर आम्ही त्याना नकार देऊं शकत नाही. कारण ते आमचे मित्र . . . .
....*

क्र. ४६ गोवा, दि. १२ मार्च १६७८

एका पोर्तुगीज इसमाने शिवाजी महाराजांच्या ताब्यांत असलेल्या शिरगाव या नावाच्या खेड्यांत होड्यानी जाऊन काही स्त्री-पुरुषांना पकडून आणले होते. ह्या गुन्ह्याबाबत नरसो काळो यानी गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठवून तक्रार गुदरविली असतां व्हिसेरेइ पत्रोत्तरी म्हणतो की, गुन्हेगाराला कैद करून त्याच्या हातापायाना बेड्या घातल्या आहेत. व्हिसेरेइ पुढे म्हणतो की शिवाजी राजे यांच्याशी आमचे मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध असल्याने त्याना बाध येईल असे कृत्य आम्ही आमच्या हातून होऊं न देण्याची दक्षता घेतो.

नरसो काळो यांस

नरसो काळो यांचे पत्र मिळाले. त्यानी तक्रार केली आहे की, आंतोनियु पाइश हा काही शिपाई घेऊन दोन होडयानी शिरगाव या नावाच्या खेडयांत गेला व त्याने तेथील एका कुटुंबातील सहा अथवा सात माणसांना पकडून आणले. त्यांतील एका माणसाला बेडया घालून त्याने आपल्या घरांत ठेवले व घर लुटून साफ केले. आपले पत्र मिळतांच मी गुन्हयाची चौकशी करणाऱ्या मॅजिस्ट्रेटला आंतोनियु पाइश याच्या गुन्हयाची चौकशी करण्यासाठी धाडले, व पाइशला कैद करून

* Livro dos Reis Vizinhos No. 3, 457.

त्याच्या हातापायाना बेड्या घातल्या. परंतु त्याच्या घरांत तिघांहून अधिक माणसे आढळली नाहीत, एक स्त्री, एक पुरुष आणि एक मुलगा अशीं ती माणसें होत. ... चौकशी अंती असें सिद्ध झाले की, पाइश हा शिरगांवला दोन होड्यानी न जाता एका होडीने गेला होता. तसेंच त्याने घराची लुटारहि केली नाही. तो शिरगावला गेला तो देऊ कामत या नावाच्या हिंदू गृहस्थास पकडण्यासाठी. असें सांगतात की सदहू देऊ कामत हा हिंदू पाइश यास सातशे साठ पार्दाव देणे होता. पाइशला देऊ कामत घरीं भेटला नाही. म्हणून त्याने त्याची आई व सिमांव या नावाच्या इसमास पकडून आणले. त्यान पकडून आणण्यामागें त्याचा असा अंदाज होता की, देऊ कामत आपल्या आईची सुटका करून घेण्यासाठी त्याने नेलेले पैसे घेऊन आपणाकडे येईल...
....
हिंदु स्त्री व तिचे दोन मुलगे यांना मुक्त करण्यात आले असून त्याना दंगण शेणवी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तेव्हां हवालदारास आमच्याविषयीं तक्रार करण्यास आतां जागा उरलेली नाही. मात्र देऊ कामत याने पाइश याचे पैसे परत केले नसल्याने नरसो काळो यानी त्याला ते परत करण्यास भाग पाडलें पाहिजे. तशी हमी हवालदार यानी दिली आहे. आणि जर हिशेबांत काही तफावत असली, तर देऊ कामत याने निर्धास्तपणे आमच्याकडे यावे. आम्ही त्याचा हिशेब मोकळा करूं. हवालदाराची आतां खात्री झालीच असेल की, त्यांच्या तक्रारींची दखल घेण्यास आम्ही सदैव तत्पर असतो. शिवाजी राजे यांच्याशी आमचे मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध असल्याने या संबंधात कोणत्याही प्रकारें बिघाड न येऊ देण्याचे बाबतीत आम्ही दक्ष असतो. शिवाजी राजे यांचे सुभेदार व हवालदार यांनीही अशीच दक्षता बाळगली पाहिजे.

देव तुमचे भलें करो.*

गोवा, १२ मार्च १६७८
आर्च बिशप प्रिमाज

क्र. ४७ **गोवा, दि. ३० मार्च १६७८**

पोर्तुगीज हद्दींतील काही माणसानी शिवाजी महाराजांच्या राज्यांत शिरून चोरी केली होती. त्याबद्दल डिचोलीच्या हवालदाराने व्हिसेरेइकडे तक्रार गुदरविली असतां व्हिसेरेइ पत्रोत्तरी लिहितो की, गुन्हेगाराना सार्जंट पाठवून पकडण्यात आले. परंतु त्यांच्या घराची झडती घेतली असतां मुद्देमाल न सापडल्याने पोर्तुगीज कायद्यानुसार त्यांच्यावर खटला भरता येत नाही.

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 6 v e 7.

डिचोलीचे हवालदार यांस

डिचोलीच्या हवालदारांचे पत्र मिळाले. त्यानी तक्रार केली आहे की, आमच्या हद्दींतील माणसानी त्यांच्या हद्दींत जाऊन चोरी केली. सदहू गुन्हेगारांची नावेहि हवालदारानी पाठविली आहेत. त्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी कुंभारजुवे येथे युद्ध कचेरीतून एक सार्जंट पाठविण्यात आला. त्याला गुन्हेगारांस गिरफदार करून आणण्याचा अधिकार होता. त्याने हुकुमाप्रमाणे तिघाना कैद केले. इतर गुन्हेगार त्याला सापडले नाहीत. सार्जंटने गुन्हेगारांच्या घराची झडती घेतली. परंतु त्याला आक्षेपार्ह असें काही झडतीत सापडले नाही. त्याने साक्षीदारांसमक्ष गुन्हेगारांची जबानी घेतली असतां त्यानी गुन्हा नाकबूल केला. ज्याअर्थी आरोपीनी गुन्हा नाकबूल केला आहे व त्यांच्यापाशी चोरीचा माल सापडलेला नाही, त्या अर्थी या राज्यांतील कायद्याप्रमाणे आम्ही त्याना शिक्षा करूं शकत नाही. आतां हवालदाराच्या हरकाऱ्याने आणखी काही गुन्हेगारांची यादी आम्हास सादर केली आहे. त्यांच्याहि गुन्ह्याची चौकशी सार्जंटमोरने केली व त्यांच्या घरांची झडती घेतली. परंतु चोरीचा माल सापडला नाही. आम्ही हवालदारास आश्वासन देतो की, गुन्हेगार जर मुद्देमालासह पकडले गेले, तर त्याना आम्ही शासन केल्यावांचून राहाणार नाही. मात्र हवालदारांनी गुन्हेगारांचा कसून तपास केला पाहिजे व त्यांच्या गुन्ह्याचा सबळ पुरावा आम्हाला सादर केला पाहिजे.*

गोवा, दि. ३० मार्च १६७८
दों फ्रेइ आंतोनियु ब्रांदाव, आर्च बिशप प्रिमाज

क्र. ४८ **गोवा, दि. २ एप्रिल १६७८**

कुडाळच्या हवालदाराने मीठाने भरलेल्या नऊ होड्या शापोरा नदी-मार्गे मणेरीला पाठविल्या होत्या. परंतु परकी होड्याना शापोरा नदींतून वाहतूक करण्यास पोर्तुगीजांची पूर्वीपासून परवानगी नसल्याने शापोरा येथील पोर्तुगीज अधिकाऱ्याने त्या होड्या अडविल्या. त्या-बाबत कुडाळच्या हवालदाराने गोव्याच्या गव्हर्नरांकडे तक्रार केली असतां त्यानी त्याला कळविले की, शापोरा नदी परकी नौकायनास खुली नसल्याने होड्या पकडण्यात आल्या.

कुडाळचे हवालदार गणेश पंडीत यांस

आपल्या पत्रावरून कळून आले की, वेंगुर्ल्याहून आपण मीठाने भरलेल्या नऊ होड्या शापोरा नदीमार्गे मणेरीला पाठविल्या होत्या. परंतु त्या शापोरा किल्ल्याच्या

* Reis Vizinhos No. 3, fls 11.

कॅप्टनने अडविल्या. ह्या घटनेबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण, शापोरा नदीतून परकी नौकानी कधी प्रवास केला असल्याचे ऐकिवांत नाही. त्यामुळे शापोरा किल्ल्याच्या कॅप्टनने आपल्या होडचा पुढे जाऊं दिल्या नाहीत. त्याला तसा सक्त हुकूम होता. आपणाला माहीत असेलच की, मणेरीला जाणारा माल गोणीच्या बैलांवरून खुष्कीच्या मार्गे थिवीच्या किल्ल्यावरून म्हापसामार्गे जातो. हा मार्ग सोडून आपण मीठ शापोरा नदीमार्गे पाठवून नवीन पायंडा पाडण्यास सुरुवात केलेली पाहून आश्चर्य वाटले. मला असें वाटते कीं जुनी प्रथा मोडणे योग्य नव्हे. शापोराच्या कॅप्टनने आपल्या होडचांची झडती घेतली ती त्याच्या स्वतःच्या जबाबदारीवर. त्याला तसा हुकूम नव्हता. केवळ जिज्ञासा म्हणून त्याने झडतीचे काम केले. आपणाला माहीत आहेच की शिवाजी राजे यांच्याशी आमचे मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध असल्याने या मैत्रीला बाधा येण्यासारखें कृत्य होऊं न देण्याबद्दल आम्ही नेहमी दक्ष असतो. शापोराच्या कॅप्टनने आपल्या होडचांची झडती घेतली असतां होडचांवरील हत्यारी लोकांची जीं शस्त्रें त्याने काढून घेतली तीं तुम्हाला परत करण्याचा हुकूम आम्ही त्याला केला आहे.

ईश्वर आपले कल्याण करो.*

गोवा, २ एप्रिल १६७८
दों फ्रेइ आंतोनियु ब्रांदाव आर्च बिशप प्रिमाज
आंतोनियु पाइश सांद.

क्र. ४९ — गोवा, दि. १८ एप्रिल १६७८

शिवाजी महाराजांच्या राज्यांतील काही निरपराध माणसे गोव्यामध्यें केवळ गैरसमजाने पकडली गेलीं होती. त्याना सोडून द्यावे म्हणून हवालदार नरसो काळो यानी गोव्याच्या गव्हर्नराना विनंती केली असतां त्यानी ती मान्य केली. काहीं गुन्हेगार लोकाना शिवाजी महाराजांनी त्यांचे गुन्हे माफ केले असाहि उल्लेख प्रस्तुत पत्रात आहे.

नरसो काळो यांस

रासईचे कॅप्टन यानी पकडलेल्या जोगु व बापू या दोघां इसमाना सोडून द्यावे म्हणून नरसो काळो यानी लिहिलेले पत्र पावले. ते लिहितात त्याप्रमाणे निरपराध माणसें पकडलीं गेली याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. नरसो काळो यांच्या निदर्शनास आम्ही आणूं इच्छितो की, हल्ली काही चोर दरोडेखोर पलीकडच्या प्रदेशांतून येऊन आमच्या प्रदेशांत गुन्हे करतात म्हणून अशा लोकाना पकडण्याचा

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 12.

हुकुम सर्व ठाण्यांच्या अधिकाऱ्याना देण्यात आला आहे. प्रस्तुत हुकुमास अनुसरून रासईच्या कॅप्टनने उपरिनिर्दिष्ट माणसाना साष्टीमध्यें पकडले. त्यांच्या हालचाली ज्या अर्थी संशयास्पद होत्या व ते अपरिचित होते त्या अर्थी ते बदमाष असावेत असा समज रासईच्या कॅप्टनचा झाला. आता नरसो काळो यांच्या पत्रावरून कळून आले की तीं दोन्हीं माणसे शिवेश्वर येथे बांधण्यांत येत असलेल्या किल्लचाच्या बांधकामासाठी गवंडी आणि लांकडे चिरणारे मजूर बघण्यासाठी म्हणून साष्टीत आले होते. त्यांची मुक्तता करण्याचा व त्यानी बरोबर आणलेली शस्त्रें आणि पांच पागोडा त्याना परत करण्याचा हुकूम देण्यात आला आहे. याच पत्रात नरसो काळो यानी ज्या कैद्यांचा उल्लेख केला आहे, त्याना आम्ही कुंभारजुवे येथून इकडे आणविले. त्यांच्या गुन्ह्याचा तपास केला असतां तो शाबीद होऊ शकला नाही, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या घरांची झडती घेतली असतां एकही हत्यार आढळले नाही. त्यावरून हे लोक निरपराध असल्याची आमची खात्री झाली. तरीहि ह्या लोकाना एक महिन्याचा कारावास भोगावा लागला. दुसरी गोष्ट पितांबर शेणवी यांच्या कारकुनाने आम्हास कळविले आहे की, जे गुन्हेगार लोक आमच्या हद्दींत आश्रयास येऊन राहिले होते ते पलीकडे गेले आहेत व त्यानी शिवाजी राजे यांची माफी मागितली आहे. शिवाजी राजे यानी त्याना क्षमा केली आहे.*

गोवा, दि. १८ एप्रिल १६७८
दों फ्रेइ आंतोनियु ब्रांदाव, आर्च बिशप प्रिमाज
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ५० — गोवा, दि. २ मे १६७८

पोर्तुगीजानी शिवाजी महाराजांच्या प्रजाजनाचा तांदळानी भरलेला एक मचवा त्याच्यापाशी पोर्तुगीज दस्तक नाही म्हणून पकडला होता. तो सोडून द्यावा म्हणून गोव्याच्या गव्हर्नरला विनंती करण्यात आली असतां तो प्रत्युत्तरी लिहितो की, मचव्यासंबंधीची संपूर्ण चौकशी होऊन तो सोडून देण्याचा निर्णय न्यायमूर्तीने दिल्याखेरीज मचवा मुक्त केला जाणार नाही.

तानाजी राम यांस

तानाजी राम यांचे दि. २७ फेब्रुवारीचे पत्र मिळाले. त्यांत त्यानी लिहिलें आहे की, तांदळांच्या गोणीनी भरलेले एक जहाज आमच्या आरमाराने पकडून या बंदरात आणले. तानाजी राम याना मला कळवायचे आहे की, सदहूं मचवा काहीं

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fl 12.

कोळयांच्या होडयानी पकडून आग्वाद बंदरांत आणला व तो त्या बंदराच्या कॅप्टनच्या ताब्यात दिला. त्याने प्रस्तुत मचव्याच्या खलाशांकडे आमचा दस्तक नसल्याची खात्री करून घेतली व तो कुठून आला आणि कोणाच्या मालकीचा त्याची चौकशी केली. ही माहिती त्याला मिळू न शकल्याने त्याने तो मचवा रीतसर आपल्या ताब्यांत घेतला. त्यावेळी मचव्यावरील सामानाची जी यादी तयार करण्यात आली त्यातील एकशें सहा तांदळांच्या गोणींचा उल्लेख आहे. नंतर ती यादी राजसिंहासनाचे आणि महसूल खात्याचे न्यायमूर्ती यांच्याकडे पाठविण्यात आली. त्याने मचवा कुणाचा, तो ताब्यांत घेणे इष्ट की अनिष्ट वगैरे गोष्टीसंबंधी आपला निर्णय द्यायचा आहे. तो निकाल जाहीर झाल्याखेरीज मचव्यासंबंधी मी कोणताच हुकूम देऊं शकत नाही.[1]

गोवा, २ मे १६७८

फ्रेइ ब्रांदाव . . . . गोव्हेया

क्र. ५१ गोवा, दि. २३ मे १६७८

पोर्तुगीज आरमाराने कर्नाटकाच्या राजाच्या प्रजाजनाची दोन तांदळानी भरलेली जहाजे पकडली होती. तीं मुक्त करावीत म्हणून डिचोलीच्या हवालदाराने गोव्याच्या गव्हर्नराकडे शिष्टाई केली असतां तो पत्रोत्तरी म्हणतो की, हिंदुस्थानच्या सागरांत पोर्तुगीज दस्तके बाळगिल्या–शिवाय कुठल्याहि नौकेला संचार करूं दिला जात नाही.

डिचोलीचे सुभेदार बाबाजी कृष्णाजी यांस

तुमचे पत्र मिळाले. तत्पूर्वी तुमच्या पूर्वीचे डिचोलीचे सुभेदार गिरमाजी पंडीत यांची दोन व वकील पितांबर शेणवी यांचे एक मिळून तीन पत्रे मिळाली होती. ह्या सर्व पत्रांत आमच्या दक्षिणेकडील आरमाराने रघुनाथ व सोगी शेट्टी यांची जी दोन तांदळांनी भरलेली जहाजें ताब्यांत घेतली त्यांची मुक्तता करण्याची मागणी केली आहे. या संबंधी मला आपणास कळवायचे आहे की, सदहू तारवांची मुक्तता करण्याची मागणी आपणास करण्याचा अधिकार नाही. कारण, ही जहाजे कर्नाटकाच्या राजाच्या प्रजाजनाची असून ज्या बंदरांत त्यांच्या मालकानी तांदूळ भरला त्या बंदराची आमच्या आरमाराने कोंडी केली होती. आपणाला माहीत असेलच की कर्नाटकाच्या राजाचें आणि आमचें युद्ध चालू होते. दुसरी गोष्ट म्हणजे प्रस्तुत तारवांपाशी आमचीं दस्तकें नव्हती. मी आपल्या निदर्शनास आणूं इच्छितो की, हिंदुस्थानच्या सागरांत आमचे दस्तक बाळगल्या खेरीज कुठल्याहि

1. Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 6.

जहाजाला संचार करता येत नाही. फार कशाला, शिवाजी राजे याना देखील आमच्या दस्तकांसाठी अर्ज करावा लागतो. तिसरी गोष्ट म्हणजे उपरिनिर्दिष्ट नौकांवरील तांदूळ हा शिवाजी राजे यांच्या छावणीसाठी आणला जात नव्हता. तो जास्त किंमत मिळेल तेथें विकण्यासाठी थोडक्यांत नफा मिळविण्यासाठी म्हणून आणण्यात येत होता. मला कळाले आहे की, प्रस्तुत नौकांचा मालक रघुनाथ ह्याने आदिलशहाच्या वकिलाशीं संपर्क साधून नौकांची मुक्तता करण्याचा प्रयत्न केला होता. आदिलशहाच्या वकिलाने या प्रकरणी हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यावर रघुनाथ शेट्टीने आपले, गिरमाजी पंडीत व पितांबर शेणवी यांचे पाय धरले. वकील पितांबर शेणवी यांच्या पत्राचे उत्तर मी योग्य त्या शब्दात पाठविले आहे. मला आपणास विनंती करायची आहे की, भलत्या सलत्या कामासाठी शब्द टाकूं नये. तरीहि मी आपणाला वचन देतो की आपणाशी आमचे संबंध नेहमीच मैत्रीचे आणि सलोख्याचे राहतील.*

गोवा, २३ मे १६७८

दों फ्रेइ आंतोनियु ब्रांदाव, आर्च बिशप प्रिमाज

आंतोनियु पाइश सांद

क्र. ५२ इ. स. १६७८ (?)

कोकणचे सुरनिविस सुभेदार अण्णाजी पंडीत यानी गोव्याच्या नवीन व्हिसेरेइचे गोव्यात आगमन झाले तेव्हां पत्र पाठवून अभिनंदन केले नाही म्हणून तो प्रस्तुत पत्रांत नाराजी व्यक्त करतो व पोर्तुगीज लोक बादशहाला जी खंडणी भरत होते ती खंडणी आपणास द्यावी म्हणून शिवाजी महाराजानी गोव्याच्या व्हिसेरेइला जे पत्र धाडले होते त्या बाबत नवीन व्हिसेरेइ लिहितो की, त्या मागणीचा आपण लवकरच विचार करू.

कोंकणचे सुरनिविस सुभेदार आण्णाजी पंडीत यांस

या राज्यांत माझे आगमन झाल्याची बातमी आपणास कळली नसावी. कारण, माझ्या आगमनाप्रीत्यर्थ आपणाकडून मला अद्याप अभिनंदनपर पत्र आले नाही. मला आशा आहे की, माझ्या पूर्वीचे व्हिसेरेइ आणि आपले स्वामी शिवाजी राजे यांचे संबंध मैत्रीचे असल्याने माझ्या आगमनाबद्दल आपणास आनंद झाल्यावांचून राहाणार नाही. मी आपणास कळवूं इच्छितो की माझ्या स्वामीच्या आज्ञेप्रमाणे मी जुने संबंध टिकविण्याचा प्रयत्न करीन. इथल्या सचिवालयांत जुन्या सरकारला लिहिलेले आपले एक पत्र आढळून आले. आपण मागणी केली आहे की, **आपले स्वामी शिवाजी राजे यानी कोकणचा प्रदेश घेतला असल्याने आमच्या**

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 2.

राज्याकडून बादशहाला जो कर भरला जात होता तो आम्ही आपणाला भरावा. या विषयी मोरो पंडीत आणि खुद्द शिवाजी राजे यांचीहि पत्रे मला आली असून मी शिवाजी राजे याना सवडीने उत्तर धाडणार आहे. कारण, मला इकडे येऊन थोडेच दिवस झाले असल्याने .... *

क्र. ५३ — गोवा, दि. २३ मे १६७८

डिचोलीच्या हवालदाराने पोर्तुगीजांच्या ताब्यांतील कायसूंव व कोळवाळ नद्यांमार्गे मणेरीला मीठ नेण्यासाठी गोव्याच्या गव्हर्नरांकडे परवानगी मागितली होती. गोव्याचे गव्हर्नर प्रस्तुत पत्रांत म्हणतात की, कायसूंव आणि कोळवाळ ह्या दोन्ही नद्या माल वाहतुकीस खुल्या नसल्याने त्यांच्यामधून मीठ नेण्यास परवानगी देता येत नाही.

डिचोलीचे हवालदार संभाजी अनंत यांस

डिचोलीच्या हवालदारांच्या पत्रांत त्यानी आमच्याकडे पेडणे येथील मीठ कायसूंव व कोळवाळ येथील नद्यांमार्गे मणेरीच्या बंदरात नेण्याची परवानगी मागितली आहे. त्यांच्या ह्या मागणीचे आम्हाला नवल वाटले. कारण यापूर्वी कुणी अशा परवान्याची मागणी केल्याचे आम्हाला माहीत नाही. फार कशाला, आमच्या स्वामीच्या प्रजाजनाना देखील अशी परवानगी यापूर्वी कधीं देण्यात आलेली नाही. त्यामुळें आमच्या स्वामीच्या हुकुमाविरूद्ध तुम्हाला होडचा आणि मचवे यांच्यातून पेडण्याचे मीठ कोळवाळ व कायसूंव नदीतून मणेरीला नेण्यास परवानगी देतां येत नाही. आपण पत्रांत लिहिले आहे की, म्हाळू शेणवी याच्याकडून हळदोणे येथे सोळा पागोडा, सतरा अश्रफी आणि तीन.........घेण्यात आल्या. आपले पत्र मिळतां क्षणी उपरिनिर्दिष्ट रक्कम म्हाळू शेणवी ह्यास परत करण्याची आज्ञा मी हळदोण येथील अधिकाऱ्याना दिली होती. त्याप्रमाणे ती रक्कम म्हाळू शेणवी ह्यास परत मिळालीच असेल. या बाबतीत आपणाला आणखी काही तक्रार करायची असल्यास ती करण्याची कायद्याप्रमाणे पूर्ण मुभा आहे. आम्ही मोठ्या आनंदाने ....†

गोवा, २३ मे १६७८
फ्रेइ आंतोनियु ब्रांदाव, आर्च बिशप प्रिमाज
आंतोनियु पाइश सांद

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 2.
† Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 8 V.

क्र. ५४ — गोवा, दि. ४ जून १६७८

फोंड्याच्या हवालदाराने फोंड्याहून डिचोलीला धान्याने भरलेल्या होड्या पाठविल्या होत्या. पण त्या पोर्तुगीजानी सांथियाग नदीत पकडल्या. त्याबाबत फोंड्याच्या हवालदाराने तक्रार केली असता गोव्याचे गव्हर्नर पत्रोत्तरी म्हणतात की, फोंड्याच्या हवालदाराने त्यांच्या पत्राचा अर्थ चुकीचा केल्याने हा सर्व घोटाळा झाला. सांथियाग नदी व्यापार वाहतुकीस खुली नाही असे ते पत्रात म्हणतात.

फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांस

आमच्या पत्राचा अर्थ आपणास कळला नाही. आपण म्हणतां शिवाजी राजे यांच्यासाठी म्हणून आम्ही डिचोलीला अन्न सामग्री पाठविण्यास परवानगी दिली. आणखी कुणाला आम्ही ही परवानगी दिली नसती. मला वाटते की, आमचे पत्र आपण चांगले पोर्तुगीज जाणणाऱ्या माणसाकडून भाषांतरीत करून घ्यावे. आम्ही पत्रांत स्वच्छ म्हटले आहे की, आमच्या स्वामीच्या इच्छेविरूद्ध आम्ही कुणाला परवाना देऊं शकत नाही. मग त्या होडचा शिवाजी राजे यांच्या असोत वा आणखी कुणाच्या असोत. आपण आमच्या पत्राचा अर्थ चुकीचा केला व अन्नाच्या बेगमीने भरलेल्या होडचा डिचोलीला पाठवून दिल्या. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. सांथियाग नदीत गस्त घालणाऱ्या आमच्या नौदलाच्या कॅप्टनने प्रस्तुत होडचा पकडल्या. कारण त्याला सक्त ताकीद देण्यात आली आहे की, सांथियाग नदींत परक्या नौकांना संचार करूं देऊं नये. त्याने आपल्या होडचा पकडल्याचे आम्हाला कळले, तेव्हां आम्ही त्याला सूचना पाठविली की, आणखी होडचा डिचोलीला नेणार नाही असें, आपल्या सहीचे निवेदनपत्र घेऊन होडचा सोडून द्याव्यात. पुन: असा प्रकार घडला तर पकडलेल्या होडचा परत केल्या जाणार नाहीत, अशी ताकीद आपणास देण्याचीहि सूचना सांथियाग नदींतील ठाण्याच्या कॅप्टनला करण्यात आली होती. तरी आपणाला आमची विनंती आहे की, शिवाजी राजे यांच्याशी आमचे मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध असल्याने या संबंधाना बाध येईल असें कोणतेहि कृत्य आपण आपल्या हातून होऊं न देण्याची दक्षता घ्यावी.

ईश्वर आपणास सद्बुद्धि देवो.*

गोवा, ४ जून १६७८
दों फ्रेइ आंतोनियु ब्रांदाव
आंतोनियु पाइश सांद

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 10.

क्र. ५५ गोवा, दि. २८ जून १६७८

शिवाजी महाराजानी गोव्याच्या व्हिसेरेइला खलिता पाठवून दमण भागांतील खेड्यांचा चौथ मागितला होता. याबाबत गोव्याचे गव्हर्नर शिवाजी महाराजांचे वकील पितांबर शेणवी याना लिहितात की, चौथच्या कराबाबत वाटाघाटी करण्यासाठी शिवाजी महाराजानी एक दूत आवश्यक ते अधिकार देऊन दमणच्या कॅप्टनकडे पाठवावा. ते पत्रात पुढे म्हणतात की, शिवाजी राजे यांच्याशी आपले मैत्रीचे संबंध असल्याने चौथच्या कराचा प्रश्न सामोपचाराने मिटावा अशी आपली इच्छा आहे.

पितांबर शेणवी यांस

पितांबर शेणवी यांचे पत्र मिळाले. शिवाजी राजे यानी आम्हाला जो खलिता धाडला त्याचा जबाब त्यानी आपल्या पत्रांत मागितला आहे. पितांबर शेणवी म्हणतात की, दमणच्या हद्दींतील ज्या खेड्यांचा चौथ आम्ही चौथिया राजाला देत होतों, त्या खेड्यांवर आतां शिवाजी राजे यांची कबज झाली असल्याने तो कर आतां आम्ही शिवाजी राजे याना दिला पाहिजे. त्या बाबतच्या वाटाघाटी करण्यासाठी आपण गोव्याला आलों आहोत. या संदर्भात व्हिसेरेइ दों फ्रन्सिस्कु द आल्मैद यानी पितांबर शेणवी याना कळविले होते की, दमणच्या हद्दींतील खेड्यांच्या चौथ बाबतची माहिती आमच्या उत्तरेकडील प्रदेशाचे सेनापती व दमणच्या किल्ल्याचे कॅप्टन यांच्याकडून मागवून घेण्यात येत आहे. ती आली की, या प्रश्नाबाबत वाटाघाटी करण्यासाठी आवश्यक ते अधिकार देऊन एकादा मनुष्य उपरिर्निदिष्ट अधिकाऱ्यांकडे पाठविण्याची विनंती शिवाजी राजे याना केली जाईल. परंतु शिवाजी राजे याना पत्र गेले नाही, त्याचे कारण हे की, व्हिसेरेइ दों फ्रान्सिश्क द आल्मैद याना मोसांबिकला जावे लागले. आणि व्हिसेरेइ निघून गेल्याचे कळतांच उपरिर्निदिष्ट अधिकाऱ्यानी त्यानी मागविलेला अहवाल पाठवून देण्यास चालढकल केली. व्हिसेरेइ दों फ्रान्सिश्कु द आल्मैद हे निघून गेल्यावर कारभाराची सूत्रे आम्हा दोघांकडे आली. परंतु आम्ही कारभार बघण्यास सुरुवात करतो न करतो तोंच आमच्या पैकी एकजण आजारी पडला. त्यामुळें शिवाजी राजे याना पत्र पाठविणे आम्हाला शक्य झाले नाही. दुसरी गोष्ट अशी की, हा प्रश्न आमच्या कक्षेंतील नाही आणि आमची अशी समजूत आहे की, ह्या राज्याच्या ....

....

दमणच्या खेड्याना जो उपद्रव पोहचत होता तो थांबावा व त्या खेड्यांच्या प्रजाजनाच्या मालमत्तेची हानी टळावी म्हणून त्यांच्या रक्षणाबाबत चौथिया राजाशी एक करार करण्यात आला होता. त्यांत अनेक कलमांचा अंतर्भाव झालेला आहे. आतां शिवाजी राजे यानी चौथिया राजाचे राज्य घेतले असल्याने सदहू खेड्यांचा चौथ त्याना मिळाला पाहिजे ह्याबद्दल शंका नाही. तेव्हां पितांबर शेणवी याना आमची सूचना आहे की, शिवाजी राजे यानी आवश्यक ते अधिकार देऊन प्रस्तुत कराच्या वाटाघाटी करण्यासाठी आपला एक अधिकारी दमणच्या किल्ल्याच्या कॅप्टनकडे पाठवावा. आम्ही सदहू कॅप्टनला पत्र पाठवित आहोंत. त्याला आम्ही सूचना करीत आहोंत की, सदहू खेड्याचे रहिवासी चौथिया राजाला कर कशासाठी देत होते त्याची चौकशी तिथल्या अधिकाऱ्यांकडे करावी. कारण दमणच्या अधिकाऱ्याना विशेषें करून महसूल खात्यांतील लोकांना ती माहिती असली पाहिजे. जर शिवाजी राजे यांचा प्रस्तुत करावरील अधिकार न्यायपूर्ण असेल तर आमच्या वतीने हा प्रश्न सामोपचाराने मिटविण्याचा आम्ही प्रयत्न करूं. कारण, शिवाजी राजे यांच्याशी आमची जी मैत्री आहे ती वृद्धिंगत व्हावी अशी आमची इच्छा आहे.

ईश्वर आपलें भले करो.*

गोवा, २८ जून १६७८
दों फ्रेइ आंतोनियु ब्रांदाव आर्च बिशप
आंतोनियु पाइश सांद

क्र. ५६ इ. स. १६७८ (?)

गोव्याच्या हद्दीतील काही जमीनदारांचे लोक शिवाजी महाराजांच्या प्रदेशात शिरून चोऱ्या माऱ्या करतात, अशी तक्रार फोंड्याच्या सुभेदाराने गोव्याच्या गव्हर्नरकडे केली होती. प्रत्युत्तरी ते लिहितात की, सदरहू लोकानी गुन्हे केल्याचे सिद्ध होत नाही. पत्रात पुढें असें म्हटले आहे की, चोऱ्या माऱ्या झाल्याच तर त्या इतर लोकानी केल्या असाव्यात.

फोंड्याचे सुभेदार यांस

आपले तारीख नसलेले पत्र पावले. आपण तक्रार केली आहे की, दोना लुईज द सिकैरा व जुआंव द गोन्हैया यांच्या कडचे दुलबा नाईक यांचे व इतरांचे हत्यारी सैनिक आपल्या हद्दीत प्रवेश करून चोऱ्या माऱ्या करतात. अशीच तक्रार डिचोलीच्या हवालदारानेही केली आहे. आम्ही गुप्तपणे कुंभारजुवे व सां इश्तेव्हाव येथे माणसे पाठवून या तक्रारीची चौकशी केली. हवालदाराने उपरिर्निदिष्ट

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 10 e vero.

खेड्यांतील ज्या घरांचा उल्लेख आपल्या पत्रांत केला होता तेथील काही लोकाना कैद करण्यात आले. परंतु त्यांच्या गुन्ह्याची चौकशी केली असतां त्यानी गुन्हे केल्याचें शाबिद होऊं शकले नाही. त्यावरून माझा असा तर्क आहे की, फोंड्याच्या सुभेदारानी जी तक्रार केली आहे तींत काही तथ्य नसावे. आणि त्यांच्या हद्दीत जर चोऱ्या माऱ्या झाल्याच असतील, तर त्या इतर लोकानी केल्या असाव्यात. असे लोक हल्लीं सगळीकडे संचार करीत आहेत. म्हणून आमची त्याना सूचना आहे की त्यानी…………………………………… …………………(फाटलें आहे)*

क्र. ५७ **गोवा, दि. १२ जुलै १६७८**

गोव्याच्या हद्दीतील एका खेडुताने अंत्रुज महालातील एका खेड्यांत जाऊन लांकडे तोडल्याची तक्रार फोंड्याचे हवालदार धर्माजी नागनाथ यानी गोव्याच्या व्हिसेरेइकडे केली होती. व्हिसेरेइ धर्माजी नागनाथ याना पत्रोत्तरी कळवितो की, ज्या खेड्यांतील शेतात सदरहू खेडुताने लांकडे तोडली ते शेत त्याच्या चुलत्यास १६३९ साली गोव्याच्या व्हिसेरेइकडून नव्वद वर्षांच्या कराराने मिळाले असल्याने त्याच्यावर त्याचा कायदेशीर हक्क आहे.

फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांस

आपले २० जूनचे पत्र पावले. आपण तक्रार केली आहे की, फ्रान्सिश्कु द कुन्य सोतु मायॉर या नावाच्या इसमाने अंत्रुज महालांतील भोम नावाच्या खेड्यांतील एका शेतांतील लांकडे त्या खेड्याचे गावकर आणि फोंडा येथील सरकारी अधिकारी याना न कळविता तोडली. आपण मला लिहितां की उपरिनिर्दिष्ट फ्रान्सिश्कु द कुन्य याला भोमा खेड्यांतील शेतांत पुनः पाऊल न टाकण्याबद्दल ताकीद करावी. या प्रकरणी चौकशी केली असतां मला आढळून आले की, सदहूं शेत इ. स. १६३९ या वर्षी त्या वेळचे गव्हर्नर आंतोनियु तेलिश·····यानी फ्रान्सिश्कु द कुन्य याचा चुलता फ्रान्सिश्कु द सिल्हा सोतु मायॉर याला नव्वद वर्षाच्या कराराने ठराविक महसूल आकारून दिले होते. सुमारे ३९ वर्षे सदहूं शेत फ्रान्सिश्कु द कुन्स याच्या घराण्याकडे असून ते नियमीतपणे त्याचा महसूल सरकारांत भरत आहेत. त्यानी त्या शेतांतील लांकडे तोडली आहेत व त्याची लागवड ते करीत आले आहेत. त्यांच्या ह्या मालकी हक्काला आदिलशहाच्या हवालदारानी किंवा इतर अधिकाऱ्यानी कधी हरकत घेतलेली नाही. कारण, हे शेत

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 11

सांथियागो नदीत असून तिच्यावर आमच्या राज्याचा मालकी हक्क आहे. असें असतां आपण त्या शेताबद्दल तक्रार करीत असल्याचे पाहून नवल वाटते. मी आपणास कळवू इच्छितो की शिवाजी राजे आणि माझे स्वामी यांच्यामधील मैत्रीच्या संबंधाना बाध येईल असें कोणतेहि कृत्य आपल्या हातून होऊं न देण्याची आपण दक्षता घ्यावी. आम्हीहि या बाबतीत दक्ष आहोत.*

गोवा, १२ जुलै १६७८
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ५८ **गोवा, दि. २८ जुलै १६७८**

अंत्रुज महालांतील शेताच्या संदर्भात गोव्याचा व्हिसेरेइ फोंड्याच्या सुभेदारास फिरून लिहितो की, सदर्हू शेतावर गोव्याच्या प्रजाजनाचा जो मालकी हक्क आहे त्याला हरकत घेतली जाऊ नये. तो धमकी देतो की, आपल्या स्वामीच्या प्रजाजनांच्या हक्कावर जर आक्रमण झाले तर ते मुळीच सहन केले जाणार नाही.

फोंड्याचे सुभेदार यांस

माझ्या पत्राचे आपण उत्तर पाठविण्याची आवश्यकता नव्हती. कारण, त्या हेतूने ते पाठविले नव्हते. लौरेंसु द कन्या द सिल्हा याने सपाळ बेटाची जी लागवड केली आहे ते त्याच्याच मालकीचे आहे. त्याचा चुलता फ्रान्सिश्कु द सिल्व्हा याला ते या राज्याच्या व्हिसेरेइनी दिले होते. इतकेच नव्हे तर, नदींतील सर्व बेटांवर या राज्याची मालकी आहे. आदिलशहाने या मालकीला कधी हरकत घेतली नव्हती. आतां फोंड्याचे सुभेदार या बेटांवर आपला हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्याना बजावूं इच्छितो की माझ्या स्वामीच्या व त्यांच्या प्रजाजनांच्या हक्कांवर जर आक्रमण झाले, तर तें आम्ही मुळींच सहन करणार नाही. या प्रकरणांतून शिवाजी राजे यांच्या प्रजाजनांच्या मालमत्तेला जर काही नुकसानी पोहोचली, तर त्याची जबाबदारी सुभेदारावर राहील व शिवाजी राजे व हे राज्य यांच्यामधील मैत्रीचा भंग करणारा म्हणून त्यांच्यावर आरोप शाबीद होईल.†

गोवा, २८ जुलै १६७८
आंतोनियु पाइश द सांद

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 13
† Livro dos Reis Vizinhos, No. 3 fls 13

क्र. ५९ गोवा, दि. १ अक्टोबर १६७८

शिवाजी महाराजानी गोव्याचा व्हिसेरेइकडे तक्रार केली होती की, गोव्याच्या हद्दीतील बदमाश लोक आपल्या राज्यांत येऊन चोऱ्या माऱ्या करतात. व्हिसेरेइ पत्रोत्तरी आरोप करतो की, शिवाजी महाराजांच्या राज्यांतील लोकहि गोव्याच्या हद्दीत शिरून डाकू दरोडेखोरी करतात व त्याना महाराजांच्या अधिकाऱ्यांची आंतून फूस असते. ह्या प्रश्नावर त्याने तोड सूचविली आहे की, उभय बाजूनी परवाना पद्धत सुरू करावी.

शिवाजी राजे यांस

आपले पत्र मिळाले. आपले आरोग्य उत्तम असल्याचे वाचून आनंद झाला. आपणाकडून अशा बातम्या वरचेवर मिळाव्यात अशी अपेक्षा आहे. आपल्या पत्रात आपण इच्छा व्यक्त केली आहे की, आपले प्रजाजन आणि माझ्या स्वामीचे प्रजाजन यांच्यामध्ये सलोख्याचे आणि मैत्रीचे संबंध असावेत. आपल्या ह्या विचारांशी मी सहमत आहे. उभय पक्षांमधील सलोख्याचे आणि मैत्रीचे संबंध वृद्धिंगत व्हावेत ही माझीहि इच्छा आहे.

आपण लिहितां की, आमच्या हद्दींतील काही बदमाश माणसे चोरी दरोडेखोरी करण्याच्या इराद्याने आपल्या हद्दीत शिरतात. मी या बाबतीत काय उपाय योजना केली आहे ते डिचोलीच्या सुभेदारास ठाऊक आहे. या बाबतीत मला आपल्या निदर्शनास आणायचे आहे की, आपल्या हद्दींतील डाकू दरोडेखोरही आमच्या हद्दींत शिरून चोऱ्या माऱ्या करतात व त्याना आपल्या अधिकाऱ्यांची फूस असते. यासंबंधीची अनेक उदाहरणे मी देऊं शकेन. आपल्या अधिकाऱ्यांच्या ह्या वर्तनामुळे आमच्या मधील तहाच्या कलमांना बाध येते. आपले इथले वकील पितांबर शेणवी यांचे निधन झाल्याने त्यांचे जागी दुसरा वकील आला नाही. त्यामुळे आम्ही आमच्या तक्रारी कुणाकडे नोंदवूं शकत नाही. माझें इकडे आगमन झालें तेव्हा आपण मला नजराणा पाठवून माझें स्वागत केले. आपल्या वकिलाचे इकडे आगमन झाले की, आपल्या नजराण्याची अधिकृत पोंच मी त्याच्याकडे सादर करीन. त्याचप्रमाणे उभय राज्यांतील राजनैतिक संबंधाच्या अदलाबदलीसही सुरुवात होईल.

आणखी एक गोष्ट अशी की, पलीकडच्या हद्दींतून इकडे माणसें येतात त्याना प्रतिबंध करतां येत नाही. इकडची माणसेंहि तिकडच्या हद्दीत जातात. अशा रीतीने उभय बाजूच्या माणसांची ये जा होते. इतकेच नव्हे तर आमच्याकडचे गुलामही तुमच्या हद्दींत पळून जातात. ह्या बेकायदा प्रकारांना आळा बसावा म्हणून मी हुकूम काढला आहे की, आमच्या हद्दीवर कुणीहि परकी माणसें असूं

नयेत. ह्या हुकुमामुळें पलीकडच्या हद्दींतील चोऱ्या माऱ्याना आळा बसेल अशी आशा आहे. मात्र फोंड्याच्या हद्दींतील काही लोकाना मी इकडे येण्यास परवानगी दिली आहे. तथापी त्याना इकडें येण्यास तुमचीहि परवानगी लागेल. ज्या पलीकडच्या माणसाना कामानिमित्ताने इकडे यायचे असेल, त्याना मी अशीच परवानगी देईन. मला अशा आहे की, असे परवाने उभय बाजूनी दिले गेले तर अनुचित प्रकाराना आळा बसून शांतता व सलोखा प्रस्थापित होईल. मी आपणास वचन देतो की, आमच्या मधील तहाच्या कलमाना बाध येईल असे कोणतेहि कृत्य मी माझ्या हातून होऊं देणार नाही.*

गोवा, १ अक्टोबर १६७८
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ६० गोवा, दि. ४ नवंबर, १६७८

फोंड्याच्या सुभेदाराने गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठविताना शिवाजी महाराजांचेहि एक पत्र प्रस्तुत पत्राबरोबर पाठविले होते. ते पत्र योग्य त्या राजनैतिक शिष्टाचारानुसार आले नाही म्हणून व्हिसेरेइने तें न उघडतांच फोंड्याच्या सुभेदाराकडे परत पाठविले.

फोंडाचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांस–

आपले चालू माहीच्या दि. १ चे पत्र मिळाले. आपले आरोग्य उत्तम असल्याचे वाचून आनंद झाला. आपल्या पत्रासमवेत जे दुसरे पत्र आहे ते शिवाजी राजे यांचे आहे असें आपण म्हणतां. तसें जर असेल तर मी तें न उघडतां परत पाठवित आहे. कारण, शिवाजी राजे, अथवा इतर राजे यांची जीं पत्रे व्हिसेरेइ व गव्हर्नर याना ज्या पद्धतीने येतात त्या पद्धतीने प्रस्तुत पत्र आलेले नाही. तरीहि यामुळें उभय राज्यांतील मैत्रीला बाध येणार नाही असें मी धरून चालतो.*

गोवा, दि. ४ नवंबर, १६७८
आंतोनियु पाइश द सांद

* Livro dos Reis Vizinhos, No. 3, fls 16 diante.
† Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 13 verso.

क्र. ६१ गोवा, दि. १७ नवंबर १६७८

शिवाजी महाराजानी गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठवून काही घटनाबाबत तक्रार नोंदविली होती. व्हिसेरेइ पत्रोत्तरी आरोप करतो की, महाराजांचे अधिकारी आणि मंत्री उभय पक्षांमधील संबंध बिघडविण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करीत आहेत. तो महाराजाना आश्वासन देतो की त्यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवण्याची आपली इच्छा आहे. परंतु आपल्या राजाची प्रतिष्ठा कमी होईल असे कोणतेहि कृत्य आपण आपल्या हातून होऊ देणार नाही.

शिवाजी राजे यांस

आपली दोन्ही पत्रे जवळ जवळ एकाच वेळी प्राप्त झाली. त्यांपैकी एका पत्रात आपण म्हणता की, आमच्या आरमाराने आपले गंधक आणि इतर स्फोटक वस्तूनी भरलेलें जहाज बार्सेलोर बंदरांत जाळले व बार्सेलोरहून तांदूळ घेऊन आलेले दुसरे जहाज ताब्यात घेतले. दुसऱ्या पत्रांत आपण तक्रार केली आहे की, फोंडयाच्या कक्षेतील भोमा येथील एक शेत मी एका पोर्तुगीज इसमास पेरावयास लावले. आपण माझ्याकडे मागणी केली आहे की, गेल्या उन्हाळयांत आमच्या युद्धनौकांनी आपला गंधक आणि इतर स्फोटक पदार्थ बार्सेलोर बंदरांत जे जाळले त्याची नुकसान भरपायी द्यावी, पकडलेले तांदळाचे जहाज सोडून द्यावे आणि फोंडयाच्या परिसरांत जे शेत एका पोर्तुगीजाने बळकावले आहे ते त्याला सोडावयास सांगून त्याच्या जुन्या मालकाच्या ताब्यात द्यावे.

आपल्या तक्रारींबद्दल मला आपल्या कानावर घालावयाचे आहे की, आपले सुभेदार आणि मंत्री यांना आमच्याशी मैत्री ठेवायची नाही. तसेंच आपले प्रजाजन आणि आमचे प्रजाजन यांच्यामध्येंहि सलोखा राखण्याचा प्रयत्न ते करीत नाहीत. विरुद्ध आपले कान फुंकून ते आपल्या व आमच्या संबंधात बिघाड आणीत आहेत. उलट आमच्या त्यामागे त्यांचा एकच हेतु असतो आणि तो म्हणजे आमच्यामधील शांतता नष्ट करण्याचा. त्यामुळें तुमचा कोणताच फायदा होऊ शकत नाही . . . . . . जहाज कुणाचे ते आमच्या नौसैनिकाना माहीत नव्हते . . . . ज्यावेळी शत्रू राष्ट्राच्या बंदराची कोंडी केली जाते तेव्हां ती कोंडी फोडण्याचा तटस्थ राष्ट्रे प्रयत्न करीत नसतात. ही अंतरराष्ट्रीय युद्धनीती आहे. जगांतील सर्व राष्ट्रे ही युद्धनीती पाळीत असतात. आमच्यात आणि कर्नाटकाच्या राजाच्यात तहाच्या वाटाघाटी सुरू आहेत. तह एकदांचा पार पडला की, व्यापारास मोकळिक होईल. आणि तहाच्या कलमाप्रमाणे हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर नौकायन कसे चालवायचे असते तें आपणास माहीत आहेच.

ज्या फोंडा येथील खाजनाबाबत आपण लिहिले आहे, ते फोंडयाच्या आमलाखाली येते हे मला माहीत आहे. या प्रकरणी फोंडयाच्या सुभेदाराशी माझा पत्रव्यवहार

झाला आहे. मला आपल्या निदर्शनास आणायचे आहे की, फोंडयाच्या सुभेदाराकडून आपणाला प्रस्तुत प्रकरणी जी माहिती मिळाली आहे ती विपर्यस्त आहे. त्याने आमच्यामधील मैत्रीचे संबंध बिघडविण्याचा यापूर्वी अनेकदां प्रयत्न केला आहे. हिंदुस्थानचे व्हिसेरेइ आणि गव्हर्नर यांच्याशी पत्रव्यवहार कसा करायचा त्याचे ज्ञान त्याला नाही. आमच्या रासई येथील प्रजाजनांची एक होडी सांतियागो नदीतून गोव्याला येत असता नदीच्या दुसऱ्या कांठाला रुतून बसली. तें पाहाताच तुमच्या प्रदेशातील लोक तिकडे आले व त्यानी ती होडी आपल्या ताब्यात घेतली. ती सोडून द्यावी म्हणून फोंडयाच्या सुभेदारास मी पत्र पाठविले. पण त्याने ती सोडून दिली नाही; इतकेच नव्हे तर तिच्यामधील माल उतरून घेतला. आपल्या अधिकाऱ्यांची वागणूक कशी असते त्याचे हे एक उदाहरण मी येथें दिले आहे. त्याचप्रमाणे आमच्या राज्याच्या शत्रूच्या जहाजाना आपल्या राज्याच्या बंदरात आणि समुद्रात कसा आश्रय मिळतो तेहि मी आपल्या निदर्शनास आणीत आहे. ह्या गोष्टी आपणास माहीत असतील व आपले अधिकारी आपणास त्या कळवित असतील असे मला वाटत नाही. आपण सांप्रत युद्धामध्ये गुंतला असल्या कारणे ह्या गोष्टी लिहून आपल्या डोक्यास ताप देण्याची माझी इच्छा नाही. परंतु आमच्याशी आपले मैत्रीचे संबंध असावेत अशी जर आपली इच्छा असेल, तर आपल्या अधिकाऱ्यांच्या आमच्या कडील वागणुकीत बदल झाला पाहिजे, हे मी आपणास कळवू इच्छितो. आपले चांगले मित्र कोण आहेत ते आपण जाणून घेतलें पाहिजे. या बाबतीत आदिलशहाची वागणूक कशी होती त्याचे ध्यान आपल्या अधिकाऱ्याना असायला हवे. गोवा बेटातील नद्यातून आमच्या प्रजाजनांच्या नौकांखेरीज इतरांच्या नौकांची वाहतुक होतां कामा नये, असा आमचा कटाक्ष आहे. त्याचप्रमाणे जुन्या करारानुसार पलीकडच्या बाजूला तटबंदी उभारली जातांहि उपयोगाची नाही. आपण सुज्ञ आहांत. माझी आपणाला विनंती आहे की, मी जे काय आपणाला लिहिले आहे, त्यावर आपण विचार करावा व आमच्याशी मैत्रीने आणि सलोख्याने वागण्याच्या सूचना आपल्या मंत्र्याना आणि सुभेदाराना द्याव्यात. आपण जर माझ्याशी सलोख्याचे आणि मैत्रीचे संबंध ठेवलेत, तर मीहि आपणाशी मैत्रीने आणि सलोख्याने वागेन. या राज्याच्या व माझ्या स्वामीच्या प्रजाजनांच्या प्रतिष्ठेला बाध येईल असे कोणतेहि कृत्य मी सहन करणार नाही.

आपल्या दैवी अनुग्रहाने देव आपणावर प्रकाश पाडो[1]

गोवा, १७ नवंबर १६७८

आंतोनियु पाइश द सांद

1. Livro Dos Reis Vizinhlos, No. 3 fls 18–19

क्र. ६२ गोवा, दि. १८ नवंबर १६७८

शिवाजी महाराजांच्या बार्सेलोर बंदरांतून गंधक आणि तांदूळ आणा-वयास गेलेल्या नौकाना वाट सोडावी म्हणून कुडाळच्या सुभेदाराने गोव्याच्या व्हिसेरेइला विनंतीपत्र पाठविले होते. व्हिसेरेइ प्रत्युत्तरी लिहितो की, कर्नाटकाच्या राजाशी सांप्रत आपले युद्ध चालू असल्याने बार्सेलोर बंदराची आपण कोंडी केली आहे. त्यामुळे कुठल्याहि देशाला त्या बंदरांतून मालाची आयात किंवा निर्यात करता येत नाही.

कुडाळचे सुभेदार यांस,

आपले पत्र पावले. शिवाजी राजे यानी बार्सेलोर येथून गंधक आणि तांदूळ आणण्यासाठी नौका पाठविल्या आहेत, तरी या नौकाना सदहू माल बार्सेलोर बंदरांतून वेंगुर्ल्याला घेऊन येण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी आपण पत्रांत केली आहे. मी आपणाला कळवूं इच्छितो की, बार्सेलोर बंदराची आम्ही सांप्रत कोंडी केली असल्याने त्या बंदरांतून मालाची आयात अथवा निर्यात करण्यास आम्ही कुणालाच परवानगी देऊं शकत नाही. मग ते शिवाजी राजे आमचे मित्र असोत वा आणखी कुणी असोत. आम्ही मोगल बादशहाच्या नौकाना देखील बार्सेलोर बंदरात जाऊं दिलेले नाही. कारण, युद्धाची ही आंतरराष्ट्रीय नीती आहे. तिचे पालन सगळीकडे केले जाते. गेल्या उन्हाळचात आम्ही शिवाजी राजे यांच्या काही नौका सोडल्या. त्या गायब झाल्या असें आपण मानीत होतां. परंतु त्या आम्ही सोडल्या, कारण शिवाजी राजे यांच्याकडील संबंध आम्हाला बिघडावयाचे नव्हते. मी शिवाजी राजे यांच्या सुभेदारांना इशारा देऊं इच्छितो की, जोंपर्यंत कर्नाटकाच्या राजाशी आमचे युद्ध चालू आहे, तों पर्यंत त्यानी त्या राजाशी व्यापार करण्याचे टाळावे. कर्नाटकाच्या राजाचा एक वकील या शहरीं तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी आला आहे. हा तह झाला की, आपणाला कर्नाटकांत नौका पाठविण्यास मोकळिक राहील. शिवाजी राजे याना मी या बाबतींत तपशीलवार पत्र पाठविले आहे.*

गोवा, १८ नवंबर १६७८
आंतोनियु पाइश द सांद

* Livro dos Reis Vizinhos, No. 3, fls 19.

क्र. ६३ गोवा, दि. ९ डिसेंबर १६७८

वेंगुर्ल्याचे हवालदार तानाजी राम यानी गोव्याच्या व्हिसेरेइला विनंती केली होती की, शिवाजी राजे यांच्या कर्नाटक राज्याच्या बंदरांत अडकून पडलेल्या तांदूळ भरलेल्या नौकाना वाट मोकळी करून द्यावी. व्हिसेरेइ प्रत्युत्तरी लिहितो की, कर्नाटकाशी जोपर्यंत आपले युद्ध चालू आहे, तोपर्यंत त्या राज्याशी आपण कुणालाच व्यापार करू देणार नाही.

वेंगुर्ला बंदराचे हवालदार तानाजीराम यांस,

तानाजीराम यांचे पत्र मिळाले. त्यात त्यानी आपली ख्याली खुशाली लिहिली आहे व कर्नाटकाच्या बंदरांतून शिवाजी राजे यांच्या तांदळांनी भरलेल्या नौकाना प्रवास करण्यास परवानगी द्यावी अशी मागणी केली आहे. शिवाजी राजे याना मी या प्रकरणी सविस्तर पत्र पाठविले आहे. तानाजी राम याना मी कळवूं इच्छितो कीं, जोपर्यंत कर्नाटकाशीं आमचे युद्ध चालू आहे, तो पर्यंत त्या राज्याशीं आम्ही कुणालाहि व्यापार करूं देणार नाही. इकडे कर्नाटकचा एक वकील तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी आला आहे. हा तह पार पडला की, सदहू राज्याच्या बंदरांतील नौकाना बाहेर पडण्यास मोकळीक राहील. इतकेंच नव्हे तर शिवाजी राजे यांचे प्रजाजन व त्यांचे हवालदार याना मी याबाबतीत सर्व प्रकारची मदत करीन. कारण, शिवाजी राजे यांच्याशी आमची जी मैत्री आहे ती टिकून राहावी अशी आमची इच्छा आहे.*

गोवा, ९ डिसेंबर १६७८
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ६४ गोवा, दि. ३० डिसेंबर १६७८

फोंड्याच्या सुभेदाराने गोव्याच्या नवीन व्हिसेरेइचे पत्र पाठवून अभिनंदन केले होते. व्हिसेरेइ प्रस्तुत पत्रात त्याचे आभार मानतो.

फोंडाचे सुभेदार त्रिंबक पंडीत यांस

गेल्या नवंबर महिन्याअखेरचे आपले पत्र मिळाले. माझ्या आगमनाबद्दल आपण आनंद व्यक्त करून माझे अभिनंदन केले आहे. आपल्या सदिच्छे बद्दल मी आपला आभारी आहे. मी आपणाला आश्वासन देतो की, माझे शेजारी या नात्याने

* Livro dos Reis Vizinhos No. 3. fls 24. verso

आपणाशी मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध ठेवण्याचा मी सर्वतोपरी प्रयत्न करीन. ईश्वर आपले कल्याण करो.*

गोवा, ३० डिसेंबर १६७८
दों फ्रान्सिश्कु द आलमैद

क्र. ६५ इ. स. १६७८ (?)

शिवाजी राजे यांच्याहून मोगल बादशहा अधिक जुना आहे. पण त्यालाही पैसे भरून आमची दस्तके घ्यावी लागतात. असे गोव्याचा व्हिसेरेइ वेंगुर्ला बंदराचे हवालदार तानाजी राम याना लिहितो. पत्राचा शेवटचा भाग फाटला असल्याने संदर्भ नीट लागत नाही.

वेंगुर्ला बंदराचे हवालदार तानाजी राम यांस,

दस्तका संबंधी तानाजीराम यानी जें पत्र पाठविले त्याचा आशय कळला. मागच्या सरकारच्या राजवटींतहि त्याना दस्तकासंबंधी अर्ज करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याना पुनः कळवायचे आहे की, मोगल बादशहा हा आमचा मित्र असून आणि शिवाजी राजे यांच्या पेक्षा तो जुना असून देखिल त्यांच्या व त्यांच्या प्रजाजनाच्या जहाजाना आमची दस्तकें घ्यावी लागतात, आणि तें ती विना तक्रार पैसे भरून घेत असतात. असें असतां वेंगुर्ल्याचे हवालदार मागणी करतात की . . .
. ...(फाटले आहे)...................... .
....†

क्र. ६६ गोवा, दि. ११ जानेवारी १६७९

अरब आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये आरमारी युद्ध झाले असता पोर्तुगीजांच्या काही व्यापारी नौका शिवाजी महाराजांच्या एका बंदराच्या आश्रयास राहिल्या होत्या. त्या नौका शिवाजी महाराजांच्या परवानगी शिवाय सोडतां येणार नाहीत, असा जबाब शिवाजी महाराजांच्या सुभेदाराने पोर्तुगीज दर्यासारंगास दिला, तेव्हां तो प्रश्न गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळा समोर आला. त्याने सल्ला दिला की, नौका बऱ्याबोलाने सुटल्या नाहीत, तर युद्धाचा अवलंब करावा.

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 3 verso.
† Livro dos Rais Vizinhos No. 3, fls 5 verso.

दि. ११ जानेवारी १६७९ या दिवशी गव्हर्नर आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल आंतोनियु पाइश द सांद यानी गोव्याच्या किल्ल्यांतील शाही सभागृहात राज्य-सल्लागार मंडळाची सभा बोलविली. मान्यवर गव्हर्नर यानी सभेला वृत्तांत सादर केला की, आमचे उत्तरेकडील आरमार खंबायतहून खाद्योपयोगी जिनसा घेऊन येत असतां अकस्मात् त्यांना दहा युद्ध नौकाना तोंड द्यावें लागेल. ह्या युद्धनौका आमचे शत्रु यांच्या असतील असे वाटून आमच्या आरमाराने व त्याच्या बरोबर असेलल्या नौकानी शिवाजीच्या प्रदेशांतील झांगिझारा[1](?) नदीचा आश्रय घेतला. आमच्या युद्धनौकानी अरब युद्धनौकांना आव्हान देऊन त्यांच्याशी लढाई सुरूं केली. या प्रसंगी शिवाजीचा सुभेदार झांगिझारा नदींतील बंदरांत उपस्थित होता. अरबांचे आणि आमच्या युद्धनौकांचे जें नाविक युद्ध झालें त्यांत बरीच माणसें ठार झाली. तें युद्ध समाप्त झाल्यावर आमच्या आरमाराचा दर्यासारंग झांगिझारा नदीच्या आश्रयास राहिलेली आमचीं जहाजे आणावयास गेला असतां शिवाजीच्या सुभेदाराने त्याला मनाई केली. तो म्हणाला की, तुमच्या नौका आमच्या नदीत शिरल्याची वार्ता मो माझे स्वामी शिवाजी महाराज याना कळविली असल्याने तुमच्या नौका मला त्यांच्या परवानगीविना सोडता येणार नाही. हा जबाब ऐकतांच आमचा दर्यासारंग नौका तिकडे टाकून इकडे सल्लामसलतीसाठी आला. तरी मान्यवर सभासदानी या प्रश्नाबाबत आपापला दृष्टिकोण व्यक्त करावा.

सर्व सभासदानी दृष्टिकोण व्यक्त केला की, हा प्रश्न आमच्या स्वामीच्या व त्यांच्या आरमाराच्या प्रतिष्ठेचा असल्याने त्या प्रतिष्ठेला बाध येणारें कोणतेहि कृत्य आमच्याकडून घडता कामा नये. तरी ज्या पांच अरब युद्धनौका झंगिझारा नदीच्या मुखावर आमच्या जहाजांची कोंडी करून राहिल्या आहेत, त्या इकडून आरमार पाठवून जाळून टाकाव्या व झंगिझारा नदींत अडकून पडलेलीं आमची जहाजे सोडवून आणावी. मात्र तत्पूर्वी शिवाजीच्या सुभेदारापाशी शिष्टाई करून जहाजे बऱ्या बोलाने सुटतात का तें बघावे. त्याच्या निदर्शनास आणून द्यावे की, शिवाजीशी आमचा जो तह आहे त्या तहान्वयें त्यांच्या हद्दींत आमची जहाजे आश्रयास जाऊं शकतात. पण सुभेदार जर तहाप्रमाणे वागण्यास तयार झाला नाही, तर शेवटचा उपाय म्हणून अरबांच्या नौका जाळून टाकाव्यात.

प्रस्तुत ठरावावर सर्व सभासदानी सह्या केल्या.*

१. झांगिझारा ही नदी म्हणजे संगमेश्वरची नदी, असे कै. डॉ. पांडुरंग सां. पिसुर्लेकर यांचे मत आहे.
* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 129

क्र. ६७ गोवा, दि. ११ जानेवारी १६७९

गोव्याचा व्हिसेरेइ शिवाजी महाराजाना लिहितो की, तुमच्या शत्रूना आम्ही जवळ करीत नाही. पण तुमचे अधिकारी आणि मंत्री आमचे जे शत्रू अरब त्यांच्याशी सहकार्य करतात. अरबांच्या चिथावणीने तुमच्या बंदराच्या आश्रयास गेलेल्या आमच्या व्यापारी नौका तुमच्या अधिकाऱ्यानी सोडल्या नाहीत. तरी आपण हा प्रश्न सामोपचाराने सोडवावा ही विनंती.

शिवाजी राजे यांस

ह्या राज्यामध्ये आणि आपणामध्ये जी मैत्री आणि तह नांदत आहे ...... बदल होण्याचा प्रसंग येऊं नये ......, आपले काही मंत्री आणि अधिकारी आपल्या बंदरात राहून ...... ह्या राज्याच्या शत्रूना मदत करीत असतात ...... ते आमच्याशी वेगळचा भाषेत व्यवहार करतात. मी आमच्या किल्ल्यांच्या कॅप्टनना ताकीद दिली आहे की, आपल्या शत्रूंशी त्यानी सहकार्य करायचे नाही. मी आपणास कळवूं इच्छितो की, माझ्या आज्ञेचे पालन सदर्हू कॅप्टननी आतांपर्यंत केले आहे. परंतु आपल्या अधिकाऱ्यानी वेंगुर्ला बंदरांत शिरलेल्या आमच्या प्रजाजनांच्या काही व्यापारी नौका अटकेंत ठेवल्या आहेत. त्यांत काही स्त्रीयाहि होत्या. त्यानी आमच्या आरमार प्रमुखाची त्या स्त्रियांची मुक्तता करण्याची विनंती धुडकावून लावली. त्यांनी सांगितले की, नौका व त्यांच्यावरील माणसें यांच्या अटकेचे प्रकरण आपणाकडे प्रविष्ट करण्यात आले आहे. मला जेव्हा हे कळले तेव्हां आमच्या अटक करण्यात आलेल्या नौका, माल व स्त्रिया यांना मुक्त करण्यास आपले मंत्री आणि अधिकारी याना भाग पाडावे. म्हणून दर्यासारंग जोसेफ द मेलु द काश्त्रू याना युद्ध नौका घेऊन x x x x बंदरांत जाण्याचा हुकूम केला. आपण सुज्ञ असल्याने मला आशा आहे की, आमच्यामध्यें आणि आपणामध्यें जी शांतता आणि तह नांदत आहे त्याचा भंग आपण होऊं देणार नाही. मीहि त्या तहाचे आणि शांततेचे कसोशीने पालन करीन.

आपल्या दैवी अनुग्रहाने ईश्वर आपणावर प्रकाश पाडो.*

गोवा, दि. ११ जानेवारी १६७९
आंतोनियु पाइश द सांद

* Livro de Reis Vizinhos No. 3, fl 24.

क्र. ६८ गोवा, दि. २६ जानेवारी १६७९

पोर्तुगीजांच्या काही नौका अरबांच्या भयाने शिवाजी महाराजांच्या एका बंदराच्या आश्रयास जाऊन राहिल्या होत्या. अरब युद्धनौकानी त्यांचा रस्ता अडविला होता. त्याना महाराजांचे अधिकारी निघून जा म्हणून सांगत नव्हते. हा प्रश्न गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळासमोर आला असतां त्याने दृष्टिकोण व्यक्त केला की, हा प्रश्न जर सामोपचाराने सुटला नाही, तर अरबांशी आरमारी युद्ध करून व्यापारी नौकांची मुक्तता करावी.

दि. १६ जानेवारी १६७९ या दिवशी गोव्याच्या किल्ल्यांतील शाही सभागृहात राज्य सल्लागार मंडळाची सभा आंतोनियु पाइश द सांद यानी बोलविली. ते म्हणाले की, आमच्या उत्तरेकडील आरमाराचे दर्यासारंग जोसेफ द मेलु द काश्त्रु यानी झांगिझारा नदीतून एक पत्र पाठविले आहे. ते म्हणतात की, अरब युद्धनौका अजून झांगिझारा नदीत ठाण मांडून आहेत. शिवाजीचा सुभेदार त्याना निघून जाण्यास सांगत नाही. त्याचे हे वर्तन पक्षपाती आहे यात शंका नाही. तरी अरबांचे आरमार जाळून टाकण्यासाठी काही मचवे, माणसे आणि दारूगोळा पाठवावा.

मान्यवर गव्हर्नर आणि कॅप्टन जनरल यानी प्रस्तुत पत्राच्या आशयावर सभासदांचा दृष्टिकोण मागितला असता ते म्हणाले की, आमच्या उत्तरेकडील आरमाराच्या दर्यासारंगानी हा प्रश्न प्रथम सामोपचाराने सुटतो का बघावे. मान्यवर गव्हर्नर व कॅप्टन जनरल यानी त्याना उत्तर धाडावे की, त्यांनी शिवाजीच्या सुभेदारास अरबांच्या नौका बाहेर घालवून देण्याबाबत निरोप धाडावा. एक तर अरब हे आमचे शत्रु आहेत आणि दुसरी गोष्ट म्हणजे शिवाजीचा आणि आमचा तह आहे. या तहान्वये शिवाजीस अरबाना पक्षपाती वागणूक देतां येत नाही आणि आमची जहाजे अडवून ठेवता येत नाही. जर सुभेदार अरबांच्या नौकाना निघून जा म्हणून सांगण्यास तयार झाला नाही, आणि काही तरी सबब सांगून आमची जहाजे अडवून ठेवूं लागला, तर मग अरबांच्या आरमारावर हल्ला करून ती जाळून टाकण्याचा प्रयत्न दर्यासारंगानी करावा. त्यासाठी त्याने मागितलेले मचवे, दारुगोळा आणि माणसे तिकडे पाठवून द्यावीत. मात्र ही उपाययोजना करीत असताना सुभेदारास कळवावे की, त्याची सर्व जबाबदारी त्याच्यावर राहील.

या ठरावावर सर्व सभासदानी सह्या केल्या.*

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 130.

क्र. ६९ गोवा, दि. ८ मार्च १६७९

कर्नाटक राज्याच्या काही बंदरांत शिवाजी महाराजांच्या तांदळानी भरलेल्या नौका पोर्तुगीज आणि कर्नाटकाचा राजा यांचे युद्ध जुंपल्यामुळे अडकून पडल्या होत्या. ह्या नौकाना वाट द्यावी म्हणून कोकणचे सुभेदार महादजी पंडीत यानी गोव्याच्या व्हिसेरेइला लिहिलें असतां तो प्रत्युत्तरी म्हणतो की, युद्धाचा निर्णय लागल्याखेरीज कर्नाटकाच्या राजाच्या बंदराची कोंडी उठविता येणार नाही.

कोकणचे सर सुभेदार महादजी पंडीत यांस

आपण लिहिता की, कर्नाटक राज्याच्या बंदरात शिवाजी राजे यांची तांदळानी भरलेली जी तारवे अडकून पडली आहेत, त्यांना त्या बंदरांतून बाहेर पडण्यास मी परवानगी द्यावी. या प्रकरणी शिवाजी राजे यांना सविस्तर लिहिले आहे. जोपर्यंत कर्नाटक राज्याशीं आमचे युद्ध चालू राहील, तोंपर्यंत त्या राज्याच्या बंदरांची कोंडी उठविली जाणार नाही व त्या बंदरांत अडकून पडलेल्या नौकाना तेथून बाहेर पडण्यास आमची परवानगी मिळणार नाही. कर्नाटक राज्याचा एक वकील तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी सांप्रत येथें आला आहे. तह पार पडला की कर्नाटकांत अडकून पडलेल्या नौकाना तेथून बाहेर पडण्यास मोकळीक मिळेल. त्यात पुन्हः शिवाजी राजे यांच्याशी या राज्याचे मैत्रीचे संबंध असल्याने त्यांच्या जहाजाना जाऊं देण्यास आम्ही सर्वतोपरी मदत करू.*

गोवा, २८ जानेवारी १६७९
आंतोनिक पाइश द सांद

क्र. ७० गोवा, दि. ८ मार्च १६७९

अरबांच्या नौका झांगिझारा नदीत जाऊन राहिल्या होत्या. त्या जाळून टाकण्याचा बेत पोर्तुगीज अधिकारी करीत होते. पण अरबाना त्याचा सुगावा लागल्याने ते प्रतिकाराच्या तयारीने राहिले होते. हा प्रश्न गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळासमोर विचारार्थ आला असतां बहुतेक सल्लागारानी दृष्टिकोण व्यक्त केला की, अरबांना शिवाजीची सहानभूती आहे. अशा परिस्थितींत त्यांच्यावर हल्ला केला तर शिवाजी त्यांच्या मदतीस येईल व त्यामुळें शिवाजीशी आपणाला युद्ध करावे लागेल. परंतू शिवाजीशीं युद्ध करण्याची आपली परिस्थिती नाही. म्हणून अरब नौकांची कोंडी चालू ठेवावी.

* Livro dos Reis Vizinhos, No. 3, fls 24 Verso.

दि. ८ मार्च १६७९ या दिवशी गव्हर्नर आणि कॅप्टन जनरल आंतोनियु पाइश द सांद यांनी राज्य सल्लागार मंडळाची सभा गोव्याच्या किल्ल्यांतील शाही सभागृहात बोलाविली. त्यानी सभागृहाला विदित केले कीं, झांगिझारा नदीतून दर्यासारंग जोसेफ द मेलु द काश्त्रु यांची तीन पत्रे आली. ती अनुक्रमे १६ फेब्रुवारी, २३ फेब्रुवारी आणि २ मार्चची आहेत. ही पत्रे महसूल खात्याचे इन्स्पेक्टर जनरल मानुएल मेंदिश येंरिकिज यांनी झांगिझारा नदींतून आणली. त्याना एका खास कामगिरीवर तिकडे पाठविण्यांत आलें होते. आपणाला माहीत आहेच की, अरबांची पांच जहाजें झांगिझारा नदीच्या आश्रयास जाऊन राहिली आहेत. तीं जहाजें जाळून टाकण्याबाबत काय उपाय योजना करतां येईल तत्संबंधीचा खल करण्यासाठी मानुएल मेंदिश येंरिकिज याना दर्यासारंग जोसेफ द मेलु द काश्त्रु यांच्याकडे पाठविण्यात आले होते. दर्यासारंगानी पहिल्या पत्रात म्हटले आहे कीं, पांच जहाजांपैकी तीन जहाजे जाळणे शक्य आहे. दुसऱ्या पत्रांत ते म्हणतात कीं, जहाजे जाळून टाकण्याच्या मार्गात अडचणी आहेत. त्याचे कारण हे की, आम्ही आपणावर हल्ला करणार असल्याचा सुगावा त्यांना लागल्याने ते नदींत दूरवर जाऊन राहिले आहेत. त्या ठिकाणी जाऊन त्यांच्यावर हल्ला करणे हे धोक्याचे काम आहे. दुसरी अडचण अशी कीं, अरबानी त्या ठिकाणी नदीच्या दोन्ही काठांवर खंदक खणून बचावाची तयारी केली आहे. त्यांनी तेथे तोफा मांडल्या आहेत. अरबांचे मनुष्यबळ जरी अवघे चारशेंचे असले, तरी त्यांना आणखी चारशे मुसलमान येऊन मिळाले आहेत. तसेंच शिवाजीने त्या भागातील स्थानिक लोकाना आज्ञा दिली आहे की, अरबांवर जर कुणी हल्ला केला, तर तुम्ही त्यांच्या मदतीला गेले पाहिजे. ही बातमी त्या भागात संचार करणाऱ्या आमच्या गुप्त हेरानीहि पाठविली आहे. त्या भागांत टेहळणीवर गेलेल्या लश्करी अधिकाऱ्याना आढळून आले की, आमच्या युद्धनौका अरबांवर हल्ला करण्यासाठी जातील या भीतीने नदींत दोन गलबतें बुडवून रस्ता रोखून धरण्यात आला आहे. आमचे दर्यासारंग आपल्या पत्रात म्हणतात कीं, अशा परिस्थितीत अरबांवर हल्ला चढविण्याचे काम फार कठीण बनले आहे. त्यानी कुमकेची मागणी केली आहे. तरी या प्रश्नाबाबत काय उपाययोजना करावी ते मान्यवर सल्लागारानी सांगावे.

काही सल्लागारानी टीका केली की, दर्यासारंग जोसेफ मेलु द काश्त्रु यांनी अरबांच्या नौका जाळून टाकण्याची संधी गमावली. ते म्हणाले की, दर्यासारंगानी सुरुवातीलाच जर अरब नौकांवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला असता, तर त्यांची कामगिरी यशस्वी झाली असती.

बहुतेक सल्लागारांचे मत पडले की, दर्यासारंग जोसेफ मेलु द काश्त्रु यानी त्यांच्या शेवटच्या पत्रात लिहिल्या प्रमाणे अरबांच्या नौका जाळून टाकण्याचे त्यांचें

काम कठीण होऊन बसले आहे. अरबाना मुसलमानाची कुमक आली आहे आणि त्यानी खंदक खणून व तोफा मांडून प्रतिकाराची जय्यत तयारी केली आहे हे तर झालेंच; शिवाय सर्वांत चिंतेची गोष्ट म्हणजे त्याना शिवाजीचेहि संरक्षण मिळाले आहे. शिवाजीचा हा पवित्रा डावलून अरबांवर हल्ला करणे म्हणजे शिवाजीशीं युद्ध सुरूं करणे हें आहे. कारण, आम्ही जर अरबांवर हल्ला केला, तर तो त्यांच्या मदतीला आल्यावाचून राहणार नाही. आणि तसे घडलें तर शिवाजींशी आम्हाला युद्ध करावे लागेल. हे नवीन युद्ध शिवाजीशी सुरूं करण्याची आज तरी आमची परिस्थिती नाही. अशा स्थितीत एकच उपाय आहे आणि तो म्हणजे अरबांची आपण जी कोंडी केली आहे ती चालू ठेवून त्याना झांगिझारा नदीतून मस्कतला जाऊं न देणें.

प्रस्तुत ठराव संमत होऊन त्यावर सगळचानी सह्या केल्या.*

क्र. ७१ **गोवा, दि. १५ एप्रिल १६७९**

गोव्याचा व्हिसेरेइ डिचोलीच्या हवालदारास लिहितो की, त्यांच्या एका नोकराकडून पोर्तुगीज हद्दींत ज्या पागोडा जप्त करण्यात आल्या, त्या केवळ त्यांच्याशी असलेल्या दोस्तीवरून त्याना परत करण्यांत येत आहेत. बहुदा हा नोकर चोरी करून फरारी झालेला असावा.

डिचोलीचे हवालदार यांस,

आमच्या प्रदेशापैकी वसई येथील एका व्यापाऱ्याला डिचोलीचे हवालदार जें देणे लागतात त्या संबंधी त्यानी लिहिलेले पत्र पावले. तत्पूर्वी त्यांच्या एका नोकराकडून धावजीच्या वाडयांत ज्या पागोडा जप्त करण्यांत आल्या, की ज्या गेल्या असें हवालदार समजत होते, त्यां संबंधीचेहि त्यांचे पत्र मिळाले. हवालदाराच्या सूचनेवरून प्रस्तुत पागोडा जप्त करण्यात आल्याचे मला कळलें, तेव्हां त्या त्याना परत करण्याची मी आज्ञा केली. कारण हवालदाराचे आणि आमचे संबंध मैत्रीचे असल्याने कायद्याने बंदी असतानाहि मला त्या त्याना परत कराव्या लागल्या. वास्तविक तिकडची नाणी इकडे आणण्यास बंदी असतांना ती पकडली गेलीं तर जप्त केली जातात. दुसऱ्या प्रश्नाविषयी मी हवालदारांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, त्या बाबतीत शिवाजी राजे यानी मला लिहिलें पाहिजे. कारण ह्या गोष्टी वरच्या पातळीवरून व्हाव्यात असें माझें मत आहे. त्यामुळें या राज्याच्या गव्हर्नरांचा आब टिकून राहातो.†

गोवा, दि. १५ एप्रिल १६७९
आंतोनियु पाइश द सांद

* Assentos do Conselho do Estado vol. IV, Documento No. 131.
† Reis Vizinhos No. 3, fls 31.

क्र. ७२ **रासई, दि. ५ मे १६७९**

शिवाजी महाराजांचा बाळळी येथील हवालदार महाराजांच्या आज्ञेवरून साळ नदीच्या मुखावर (ही नदी शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्यामधील सीमा होती) एक किल्ला बांधीत होता. हा किल्ला बांधून झाला, तर शिवाजी महाराजांपासून गोव्याच्या दक्षिण हद्दीला धोका पोहोचेल, या भीतीने तो पाडून टाकण्याची ताकीद रासईचा पोर्तुगीज ठाणेदार गोव्याच्या गव्हर्नरच्या आदेशावरून बाळळीच्या हवालदारास प्रस्तुत पत्राचे द्वारा करतो.

गोव्याचे गव्हर्नर व कॅप्टन जनरल यानी रासईच्या कॅप्टनला जे पत्र बाळळीच्या हवालदारास लिहावयास सांगितले त्याचा मसुदा

मला बातमी कळली आहे की साळ नदीच्या मुखावर पूर्वी जेथें एक दुकान होते, त्या जागेवर आपल्या आज्ञेवरून एक किल्ला बांधण्यात येत आहे. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, आपले हें कृत्य शिवाजी राजे व हें राज्य यांच्या मधील तहाला बाध आणणारे आहे. असा प्रकार आमच्या हद्दी पलीकडचा प्रदेश आदिलशहाच्या राज्यांत मोडत होता, तेव्हां कधींच घडला नव्हता. एकादी पक्की इमारत देखील साळ नदीच्या मुखावर त्यावेळी उभारण्यात आली नव्हती. मला या राज्याच्या गव्हर्नरकडून आदेश आला आहे की, हा जो किल्ला बांधावयास घेतला आहे, त्याचे काम त्वरीत बंद करण्याची ताकीद तुम्हाला करावी. तरी तुम्ही हें ताकीदपत्र मिळतांच बांधकाम त्वरीत थांबवावे व जें काम झाले आहे ते पाडून टाकावे. तुम्ही जर बांधकाम चालूच ठेवले, तर तुम्ही तहाचा भंग करता आहात असा त्याचा अर्थ होईल. तुम्ही सुज्ञ आहांत. मला आशा आहे की, तुम्ही विचारपूर्वक वागाल आणि पुढील हानी टाळाल. आपल्या अधिकाराच्या कक्षेत जी बंदरे येतात तेथे आमच्या राज्याच्या प्रजाजनाना अपमानास्पद वागणूक मिळते अशा तक्रारी आमच्या कानावर आल्या आहेत. पत्रोत्तराची अपेक्षा करीत आहे.*

रासई, ५ मे १६७९
फ्रान्सिश्कु सिमॉइश लैंताव

* Reis Vizinhos No. 3. pp 32.

क्र. ७३ दि. १५ मे १६७९

गोव्याच्या दक्षिण हद्दीवर साळ नदीच्या मुखावर शिवाजी महाराज एक किल्ला बांधीत होते. हा किल्ला बांधून झाला तर आपल्या प्रदेशाला धोका पोहोचेल अशी भीती पोर्तुगीजांना वाटत होती. हा प्रश्न गोव्याच्या गव्हर्नरने राज्य सल्लागार मंडळाच्या सभेसमोर विचारार्थ मांडला असतां सर्व सदस्यानी एकमताने सांगितले की, शिवाजी महाराजानी जर किल्ल्याचे काम थांबविले नाही तर बलप्रयोग करून ते काम पाडून टाकावे.

दि. १५ मे १६७९ या दिवशी गव्हर्नर आणि कॅप्टन जनरल आंतोनियु पाइश द सांद यानी राज्य सल्लागार मंडळाची सभा गोव्याच्या किल्ल्यातील शाही सभागृहात बोलविली. त्यानी सभागृहाला विदित केले की, रासईच्या ठाण्याचे कॅप्टन फ्रान्सिश्कु सिमांइश द लेइताव यांनी पत्र पाठवून बातमी दिली आहे की, असोळणे नदीच्या पैल तिरावर शिवाजी राजे यानी एक किल्ला बांधण्यास घेतला आहे. तो जर बांधून झाला, तर आमच्या राज्याच्या सुरक्षिततेला त्याच्यापासून धोका आहे. असा किल्ला बांधण्याचा विचार आदिलशहाने कधीं केला नव्हता. परंतु शिवाजी राजे यानी त्याचे राज्य घेतल्यावर हा प्रयत्न सांप्रत सुरूं केला आहे. रासईच्या कॅप्टनने प्रस्तुत बातमी मला कळवितांच मी त्याला उत्तर धाडले की, शिवाजी राजे यानी अशा किल्ल्याचे बांधकाम सुरू केल्याने त्यांचा आणि आमचा जो मैत्रीचा तह झाला आहे, त्याला बाध येत आहे. तरी किल्ल्याचे बांधकाम बंद ठेवावे म्हणून बाळ्ळीच्या हवालदारास पत्र घालावे. रासईच्या कॅप्टनना मी असेहि कळविले की, त्यांनी प्रत्यक्ष जाऊन किल्ल्याच्या बांधकामाची पहाणी करावी. माझ्या आज्ञेप्रमाणे कॅप्टन फान्सिश्कु सिमांइश द लेइताव हे मॅजिस्ट्रेट व त्याचा चिटणीस यांना बरोबर घेऊन किल्ल्याच्या ठिकाणी गेले. ती एक अंतर्गत भागांतील दूरची जागा असून त्याला बेतूल म्हणतात. तेथें एक छोटे दुकान असून त्याच्या जवळपास किल्ल्याचें बांधकाम चालू आहे. हे ठिकाण साळ नदीच्या मुखावर आहे. एका गोळीच्या अंतरावर ती जागा जरी असली तरी ओहोटीच्या वेळी तेथें चालून जाता येते. किल्ल्याचें बांधकाम बंद पाडण्याचा जर निर्णय घेण्यात आला, तर तिकडे साळ नदींतून होडचांतून अथवा छोटचा गलबतांतून माणसें पाठविता येतील. असोळणेहूनहि तिकडे चालून जाता येते. एक टेकडी चढली की तिथून किल्ल्याची जागा दृष्टोत्पत्तीस येते. माझ्या सूचनेप्रमाणे रासईच्या कॅप्टननी बाळ्ळीच्या हवालदारास पत्र पाठविले असता त्याने उत्तर धाडले की, किल्ला मी शिवाजे राजे यांच्या आज्ञेवरून बांधीत आहे. परंतु या किल्ल्याचा उपसर्ग तुम्हाला होणार नाही. दुसरी गोष्ट आमच्या राज्यांत आम्ही काहीहि

करण्यास मुखत्यार आहोत. त्याचा जाब विचारणारे तुम्ही कोण? रासईचे कॅप्टन म्हणतात की बाळ्ळीच्या हवालदाराचे उत्तर आल्यावर फोंडचाच्या सुभेदारास पत्र पाठवून किल्ल्याच्या बांधकामाकडे त्याचे लक्ष वेधिले आहे. परंतु त्याचे उत्तर अद्याप आलेले नाही. तथापी सुभेदाराचे उत्तर जरी अनुकूल आले नाही, तरी तुम्ही सैन्य घेऊन जा आणि किल्ल्याचे काम बंद पाडा. परंतु असें करताना सरकारच्या संगनमताने ते केले असल्याचा सुगावा शिवाजीच्या लोकाना लागूं देऊं नका, असे मी रासईच्या कॅप्टनना कळविले आहे. हा किल्ला त्या भागात बांधणें हे आमच्या राज्याच्या सुरक्षिततेला विशेषतः साष्टी प्रांताच्या सुरक्षिततेला धोकादायक आहे. हा किल्ला जर बांधून झाला तर, साळ नदींतून आमच्या जहाजाना आजच्या प्रमाणे मुक्तपणे संचार करता येणार नाही. केवळ प्रस्तुत किल्ल्याचाच प्रश्न नाही, तर साळ नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर शिवाजीने आणखी कांही बांधकाम सुरूं केले, तर तेहि आपण पाडून टाकले पाहिजे. आपणाला माहीत आहेच की आदिलशहाच्या राज्यांत जेव्हां तो प्रदेश मोडत होता, तेव्हां देखील आम्ही त्याला साळ नदीच्या किनाऱ्यावर तटबंदी करू दिली नव्हती. तरी मान्यवर सल्लागारांनी या ठरावावर आपला दृष्टिकोण व्यक्त करावा. सर्व सल्लागारांचे किल्ल्याचे बांधकाम पाडून टाकण्याबाबत एकमत झाले.*

क्र. ७४ गोवा, दि. २४ मे १६७९

शिवाजी महाराजांची एक नौका पोर्तुगीजानी त्यांच्या हद्दींतील नदींतून वाहतूक करताना पकडली होती. तिने सरकारी कर भरला नव्हता व [illegible] येथे तीं नोंदली गेली नव्हती म्हणून पकडली गेली, असे गोव्याचा गव्हर्नर फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ ह्यांस लिहितो.

फोंडचाचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांस

आपले पत्र मिळाले. आपली ख्याली खुशाली कळून फार आनंद झाला. पत्रात आपण शिवाजी राजे व आमचे राज्य यांच्यामधील मैत्री उत्तरोत्तर वृद्धिंगत होवो अशी इच्छा व्यक्त केली आहे. परंतु इच्छा असून भागत नाही, कृती पाहिजे. शिवाजी राजे यांच्या अधिकाऱ्यांकडून आम्ही कृतीची अपेक्षा करतो.

आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, जी नौका पकडली गेली आहे तिने रासई येथें नोंद केली नव्हती व सरकारी कर भरला नव्हता. ही पद्धत फार जुनी असून ती आमच्या राज्याच्या प्रजाजनानाहि लागू आहे. जीं जहाजें अशी नोंद करीत नाहीत व कर भरत नाहीत त्याना नद्यांतून प्रवास करूं दिला जात

* Assentos do Conselho do Estad Vol IV, Documento No. 132.

ाही............................नद्यांमध्यें नौकांचा व रक्षकांचा पहारा ठेवलेला असतो. मात्र प्रस्तुत नियम वगळतां नद्यांतून व्यापार करण्यास बंदी नसते. मग हा व्यापार इकडचा असो वा तिकडचा असो.*

गोवा, २४ मे १६७९
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ७५ **गोवा, दि. ३ जून १६७९**

शिवाजी महाराजांच्या अधिकाऱ्यांच्या कारवायामुळे शिवाजी महाराजांची प्रजा व पोर्तुगीज अमलाखालची प्रजा यांच्यामधील मैत्री वृद्धिंगत होत नाही, असें गोव्याचा गव्हर्नर फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ याना लिहिलेल्या पत्रात म्हणतो.

फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांस

कृष्णाजी पंडीत यांच्या विद्यमाने पाठविलेले आपले पत्र पावले. आपण म्हणतां की शिवाजी राजे यांचे प्रजाजन व आमच्या राज्याचे प्रजाजन यांच्यामध्ये मैत्री वृद्धिगत व्हावी म्हणून आपण प्रयत्न करीत आहोत. त्यांच्या पत्राच्या संदर्भात मला त्याना जाणीव करून द्यायची आहे की, शिवाजी राजे यांच्या काही सुभेदारांकडून शिवाजी राजे व आमचें राज्य यांच्यामधील तह व मैत्रीचे संबंध यांचा भंग होण्यासारखी कृत्यें घडत आहेत. ह्या प्रकाराना कुणाकडून उत्तेजन मिळते ते फोंड्याच्या सुभेदारांनी मला सांगावे.†

गोवा, दि. ३ जून [illegible]

क्र. ७६ **गोवा, दि. २९ ऑगष्ट १६७९**

पोर्तुगीज अमलाखालच्या लोकाना शिवाजी महाराजांच्या राज्याच्या हद्दींत वाईट वागणूक मिळते, म्हणून त्याना तिकडे जाण्यास बंदी केली आहे, असें गोव्याचा गव्हर्नर डिचोलीचे सुभेदार मोरो दादाजी याना लिहिलेल्या पत्रात म्हणतो.

डिचोलीचे सुभेदार मोरो दादाजी यांस

आमच्या राज्याचे प्रजाजन व शिवाजी राजे यांचे प्रजाजन यांच्यामध्यें जो स्नेहभाव आणि शांतता वसत आहे, त्याला बाध न येऊं देण्याची दक्षता मी नेहमीच

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 31 ve 32.
† Reis Vizinhos No. 2, fls 33.

घेत आलो आहे. परंतु डिचोलीच्या सुभेदाराकडून प्रस्तुत स्नेहसंबंधांचे [illegible] शांततेचे पालन होत आहे, असें मला वाटत नाही. न झाल्यास त्यांच्या [illegible] आमच्या राज्याच्या प्रजाजनाना वाईट वागणूक मिळती ना ! या राज्याचे प्रजाजन पूर्वी नदीपलीकडे निर्धास्तपणे जात येत असत. ही पद्धत पूर्वापारपासून चालत आली आहे. परंतु डिचोलीच्या सुभेदाराच्या चिथावणीने या राज्यांत चोऱ्या माऱ्या होऊं लागल्या व आमच्या प्रजाजनांवर हल्ले होऊं लागले. म्हणून मी आमच्या प्रजाजनाना नदी ओलांडून पलीकडे जाण्यास बंदी केली.

मी डिचोलीच्या सुभेदारास बजावूं इच्छितो की, आमच्या प्रजाजनांची जी नुकसानी तिकडच्या लोकांकडून होत आहे व अशा रीतीने उभय राज्यांतील शांततेचा आणि मैत्रीचा जो भंग होत आहे, त्याची जबावदारी त्यांच्यावर आहे. त्यानी ह्या घटनांचा जाब मला दिला पाहिजे.*

गोवा, २९ ऑगष्ट १६७९
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ७७ **दि. १६ सप्टेंबर १६७९**

खांदेरी उंदेरी बेटांची तटबंदी करण्यासाठी शिवाजी महाराजांनी वरच्या चौलला तीन हजार सैन्य धाडले होते. या बेटांची तटबंदी झाली तर, पोर्तुगीजांच्या ताब्यांतील प्रदेशाला धोका पोहोचेल, म्हणून लढाऊ गलबते पाठवावी, असा ठराव गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळाने केला.

दि. १६ सप्टेंबर १६७९ या दिवशी गोव्याच्या किल्ल्यांतील शाही सभागृहांत गव्हर्नर आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल आंतोनियु पाइश द सांद यानी राज्य सल्लागार मंडळाची सभा बोलविली. त्यानी सभागृहाला विदित केले कीं, शिवाजी राजे यांचें दोन हजार सैन्य वरच्या चौलला आले असून खांदेरी उंदेरी बेटांच्या तटबंदीसाठी त्यांचा उपयोग केला जाणार आहे, असे आमचे चौलचे कॅप्टन फ्रान्सिश्कु द साल्दान्य यानी पत्रद्वारे कळविले आहे. आपणाला कदाचित माहीत असेलच कीं, खांदेरी उंदेरी बेटे ही आमच्या चौलच्या ठाण्याच्या अगदीं समोर आहेत. शिवाजी राजे त्या बेटांच्या तटबंदीसाठी तीन हजार सैन्य आणणार असल्याची बातमी आहे. प्रस्तुत बेटांची तटबंदी झाली, तर ती आपणाला मारक ठरेल म्हणून सिद्दीने त्या बांधकामाला विरोध करण्यासाठी दहा लढाऊ गलबतें माणसांसह तिकडे पाठविण्याचा बेत केला आहे. तरी या बाबतीत काय उपाययोजना करावी ते मान्यवर सल्लागारानी सांगावे.

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 35 verso.

ाही··········ानी दृष्टिकोण व्यक्त केला की, खांदेरी उंदेरी बेटांची तटबंदी होऊ देणे असतो. मधा ठाण्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अिष्ट नाही. ही तटबंदी झाली तर मग हा व्यच्या नौकायनालाहि त्याचा उपद्रव पोहोचेल. तरी मुंबई व वसई या दरम्या-
ाच्या किनाऱ्यावर गस्त घालण्याची कामगिरी ज्या दोन गलबतांवर आणि फ्रिगेटवर सोपविण्यांत आली आहे, त्याना खांदेरी उंदेरीला जाण्याचा हुकूम धाडण्यात यावा.

सल्लागार मंडळाचा उपरिनिर्दिष्ट दृष्टिकोण मान्यवर गव्हर्नराना मान्य झाला व तत्संबंधीची कारवाई त्वरीत केली जाईल असें आश्वासन त्यानी सभागृहास दिले.

प्रस्तुत ठरावावर सल्लागार मंडळाच्या सर्व सदस्यानी सह्या केल्या.*

क्र. ७८ गोवा, दि. ३ नवंबर, १६७९

शिवाजी राजे यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचा आपण कसोशीने प्रयत्न करीत आहोत. परंतु त्यांचे अधिकारी या सलोख्या आड येतात, अशी तक्रार गोव्याचा गव्हर्नर कुडाळचे सुभेदार गणेश पंडीत याना लिहिलेल्या पत्रात करतो.

कुडाळचे सुभेदार गणेश पंडीत यांस,

मी या राज्याची सूत्रे हाती घेतली, तेव्हापासून शिवाजी राजे यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. हे संबंध बिघडू शकतील अशा गोष्टी शिवाजी राजे यांच्या अधिकाऱ्यांच्या हातून घडत असतात. पण मी संयम करतो.

आमच्या समुद्रकिनाऱ्यावर संचार करणाऱ्या नौका ह्या आमच्याच आहेत. त्या कुणाच्या वाटेला जात नाहीत की, माझी अथवा आमच्या ठाण्यांच्या अधिकाऱ्यांची दस्तके बाळगणाऱ्या आमच्या मित्रांच्या नौकांवर हल्ले करीत नाहीत. शिवाजी राजे यांच्या वतीने दस्तक मागितले असता मी कधीच नकार दिलेला नाही, की उभय राज्यामध्यें जी मैत्री आणि सलोखा नांदत आहे त्याला बाध येईल असें कोणतेहि वाईट कृत्य मी माझ्या हातून होऊं दिलेले नाही. माझा हा नेम मी यापुढेहि चालू ठेवीन. मी सुभेदारास आश्वासन देतो की, त्यांचे एकादे काम जर माझ्या हातून व्हायचे असेल तर तें मी आनंदाने करीन.†

गोवा, दि. ३ नवंबर १६७९
आंतोनियु पाइश द सांद

* Assentos do Consetho do Estado Vol. IV, Documento No. 133.
† Livro dos Rais Vizinhos No. 3, fls 36, fls 37.

क्र. ७९ गोवा, दि. २८ फेब्रुवारी १६८१

शिवाजी महाराजांचे अधिकारी त्यांचें नाव सांगून कर्नाटकांतून गल तानी माल आणून तो अरबाना विकतात व अरब तो मस्कतला नेतात, ही गोष्ट शिवाजी राजे व पोर्तुगीज यांच्यामधील मैत्रीला बाध आणणारी आहे, अशी तक्रार गोव्याचा गव्हर्नर वेंगुर्ल्याच्या हवालदारास लिहिलेल्या पत्रांत करतो.

वेंगुर्ल्यांचे हवालदार यांस

हवालदार तानाजी राम यांच्या विनंतीवरून गोव्यात प्रवेश केलेल्या नौकांची मुक्तता करीत आहे. कारण, शिवाजी राजे व त्यांते प्रजाजन यांच्याशी आमचे जे मैत्रीचे संबंध आहेत ते टिकावेत ही माझी इच्छा आहे. पण मी हवालदाराना इशारा देतो की, शिवाजी राजे यांच्या नावाखाली या राज्याचे शत्रु जे अरब त्याना मदत करणे बरोबर नव्हे. तुमची जहाजे त्यांच्यासाठी जीवनोपयोगी वस्तु दक्षिणेकडून आणतात व ते त्या वस्तू आपल्या जहाजांत भरून मस्कतला नेतात. या पुढे जीं व्यापारी जहाजे आमच्या दक्षिण आरमाराच्या संरक्षणाखाली प्रवास करतील त्याना वाटेंत कुठेहि न थांबता गोव्याला जावे लागेल. कारण, आमच्या नौकांखेरीज इतर नौकाना आमच्या युद्धनौकांचे वैयक्तिक संरक्षण यापुढे मिळणार नाही. मला आपल्या निदर्शनास आणायचे आहे की, वेंगुर्ला बंदरातून मीठ आणि इतर जीवनोपयोगी वस्तु भरलेल्या होड्या शापोरा नदींतून तुमच्या बंदरांत पाठविल्या जातात. मला हें पसंत नाही. कारण शापोरा नदींतून जीवनोपयोगी वस्तूंची वाहतुक करण्यास बंदी करण्यात आली आहे. हा बंदी हुकूम आमच्या प्रजाजनाना देखील लागू आहे. तरी हवालदारानी यापुढे शापोरा नदींतून होड्या पाठविण्याचे टाळावे. परवां लाकूड घेऊन जाणारी जी होडी पकडण्यात आली, ती मी सोडून देण्याचा हुकूम केला. यापुढें पकडलेल्या होड्या सोडल्या जाणार नाहीत.*

गोवा, २८ फेब्रुवारी १६८०
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ८० गोवा, दि. १० मार्च १६८०

तुमच्या नौका या बंदरांत पकडून आणण्यात आलेल्या नव्हत्या. त्या विगर परवाना इकडे आलेल्या होत्या. त्या सोडून देण्यांत येत आहेत. यापुढे पोर्तुगीज दस्तके बाळगणाऱ्या नौका दक्षिणेकडून माल आणून ज्या इकडे किफायत दराने विकतात, त्याना यापुढे इकडच्या नद्यांत प्रवेश मिळणार नाही, असा इशारा गोव्याचा गव्हर्नर डिचोलीच्या सुभेदारास लिहिलेल्या पत्रांत देतो.

* Livro dos Reis Vizinhos No. 3 fls 41 e verso.

ाही········ ोचे सुभेदार मोरो दादाजी यांस

असतो. ले पत्र मिळतांच नाचण्यानी भरलेला एक मचवा आणि दोन होडचा कोणताही मग हा र न घेतां सोडून देण्याचा हुकूम केला. प्रस्तुत नौका बिगर परवानगीने या बंदरांत शिरल्या होत्या. आर्दणाला कुणी तरी चुकीची माहिती पुरविली, की त्याना या बंदरांत बळजबरीने आणण्यात आले. मी सुभेदारास इशारा देतो की, आमची दस्तकें बाळगणाऱ्या ज्या नौका दक्षिणेकडून माल घेऊन येवून इकडे किफायत दराने विकतात, तो प्रकार आम्हाला पसंत नाही. त्यानी यापुढें आमच्या नद्यांत शिरूं नये.*

गोवा, १० मार्च १६८०
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ८१ **गोवा, दि. ८ मे १६८०**

शिवाजी राजे यांच्या निधनानंतर सरहद्दीवर युद्धबंदीचा हुकूम जारी केला आहे. आम्ही गत गोष्टी विसरून जाऊन नवीन परिस्थितीशी जुळते घेण्यास तयार आहोत. असे गोव्याचा गव्हर्नर, कोकणचे सर-सुभेदार रायाजी पंडीत याना लिहिलेल्या पत्रात म्हणतो.

संभाजी राजे यांचे कोंकणचे सरसुभेदार रायाजी पंडीत यांस

आपलें पत्र मिळाले व आपली ख्याली खुशाली कळून आनंद झाला. संभाजी राजे यानी कोंकणचे सरसुभेदार म्हणून आपली निवड केल्याचे कळून समाधान वाटले

शिवाजी राजे यांच्या निधनाची बातमी कळताच मी आमच्या साष्टी प्रांताच्या कॅप्टन जनरलला युद्ध बंद करण्याची आज्ञा दिली होती. फोंडयाच्या हद्दीवरहि ही व्यवस्था चालू आहे. मी युद्धबंदीचा निर्णय एक तर्फी घेतला त्याचे कारण हे की, जो नवीन राजा सिंहासनावर येईल त्याला आमच्याशी युद्ध चालू ठेवावे की बंद करावे तत्संबंधीचा निर्णय घेणे सुलभ व्हावे यासाठी. मी आपणाला वचन देतो की, मी भूतकालीन गोष्टी विसरून जाऊन नवीन परिस्थितीशी जुळते घेण्याचा प्रयत्न करीन. मात्र तिकडच्या बाजूच्या सुभेदारांकडून आणि अधिकाऱ्यांकडून प्रजाजनांना जो उपद्रव होतो व अरेरावी होते ती मी सहन करणार नाही. ज्या अर्थी आपण लिहितां की, संभाजी राजे ············ एक कायम स्वरुपाचा

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 42.

तह पार पडावा म्हणून पत्र देऊन एक वकील ·········· त्याची मी वाट पाहत आहे. त्याचे आगमन झाले की, माझा हेतु आपणास पुरता आकलन होईल *

गोवा, ८ मे १६८०
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ८२ **गोवा, दि. ३१ ऑगस्ट १६८०**

गोव्यातील एक चोरटा व्यापारी सोन्या चांदीची नाणी डिचोलीच्या हद्दीत नेत असताना पकडला गेला होता. त्याचे काय करायचे म्हणून डिचोलीच्या सुभेदाराने गोव्याच्या व्हिसेरेइला पत्रव्दारे विचारले असतां, तो पत्रोत्तरी लिहितो की प्रस्तुत चोरट्या व्यापाऱ्यास कडक शिक्षा करावी.

डिचोलीचे सुभेदार यांस

चालू माहीच्या दि. २५चे आपले पत्र पावले. त्यांत आपण लिहितां की इकडचा एक व्यापारी सेवालाल माडिक (?) हा सोने आणि चांदी घेऊन आपल्या हद्दीत शिरत असतां पकडला गेला. आपण म्हणतां की सदर्हू व्यापाऱ्यापाशी सोन्याचे व चांदीचे पार्दाव व इतर नाणी होती. असा ऐवज एका देशाच्या हद्दीतून दुसऱ्या देशांत नेणे हा गुन्हा आहे. त्याबद्दल शिक्षा तर होतेच, पण ऐवजहि जप्त होतो. आपण गुन्हेगाराला कायद्याप्रमाणे कडक शिक्षा करावी. मी आपणास आश्वासन देतो की, त्यामुळें आमच्यामधील मैत्रीस बाध येणार नाही.†

गोवा, ३१ ऑगस्ट १६८०
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ८३ **दि. १५ नवंबर १६८०**

गोव्याच्या गव्हर्नरने गोव्याच्या आजूबाजूच्या प्रदेशांतील राजकीय घडामोडींचा एक आढावा पोर्तुगालच्या सागरोत्तर सल्लागार मंडळाला सादर केला होता. त्यांत तो म्हणतो की शिवाजी हा एक निष्णात लष्करी डावपेची असून तो बचावाचे आणि चढाईचे युद्ध तितक्याच कुशलतेने खेळतो. त्याने शिवाजी महाराजांची तुलना ॲटिलांशी केली आहे.

* Livro dos Reis Vizinhos No. 3. fls 42 e verso
† Livro dos Reis Vizinhos, No. 3, fls 19.

ाही……ुर्नर आणि कॅप्टन जनरल आंतोनियु पाइश द सांद यांनी शिवाजी राजे व असतो. ागल यांच्या मधील युद्धाचा एक अहवाल पोर्तुगालच्या सागरोत्तर सल्लागार मग हा मंडळाला पाठविला होता. त्याचा आशय पुढीलप्रमाणे आहे :

शिवाजी राजे यांनी गोव्यापासून दमण पर्यंतच्या आमच्या सरहद्दीला लागून असलेला प्रदेश घेतला असून सांप्रत ते मोगलांकडील युद्धांत गुंतले आहेत. हे युद्ध गोवा शहरापासून चार पांच दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर चालू आहे. **हा हिंदुस्थानचा नवीन 'अॅटिला' इतका हुषार आणि निष्णात लष्करी डावपेची आहे की, तो बचावाचे आणि चढाईचे युद्धहि तितक्याच कुशलतेने खेळतो.** तो मोगल प्रदेशांत घोडदळ पाठवून प्रदेश जाळून बेचिराख करीत आहे. नवंबर महिन्यात त्याने मुंबईच्या किनाऱ्यावरील काही छोट्या बेटांची तटबंदी करण्याचे काम सुरूं केले. ही बेटे आमच्या चौलच्या ठाण्यापासून अवघ्या दोन कोसांवर आहेत. शिवाजीचा हा शेजार आम्हाला कोणत्याहि दृष्टीने चांगला नाही. परंतु गव्हर्नर आणि कॅप्टन जनरल आंतोनियु पाइश द सांद यानी शिवाजीच्या तटबंदीला कोणत्याहि रीतीने विरोध केला नाही. इतकेंच नव्हे, तर इंग्रजानी शिवाजीला विरोध करण्यासाठी खांदेरी उंदेरी बेटांनजीक आरमाराची जमवा जमव केली, तेव्हां गव्हर्नर आंतोनियु पाइश द सांद यानी आमच्या उत्तरेकडील ठाण्याचे सेनापती ज्युआवद मेलु द सांपायु याना हुकुम धाडला की, तुम्ही या युद्धांत तटस्थपणाने वागा. तुम्ही इंग्रजाना सांगा की, शिवाजीचा आणि आमचा तह असल्याने आम्हाला युद्धांत पडता येत नाही. त्याना तुम्ही खाद्यवस्तू अथवा दारुगोळा यांचीहि मदत करतां कामा नये. **त्याचे कारण हे की, इंग्रजानी जर खांदेरी उंदेरी बेटे घेतली तर त्यांचा शेजार आम्हाला शिवाजीच्या शेजाराहून अधिक तापदायक होणार आहे.** आणि जर तिकडे (गोव्यांत) ही मुत्सद्दिगिरी चालवूं शकणारा एकादा निष्णात मार्गदर्शक असता तर तो इंग्रजांच्या हातून मुंबई घालवून देऊन शिवाजीची दोस्ती करूं शकला असता.

युद्ध सबंद नवंबर महिनापर्यंत चालले. शिवाजीचें सैन्य खांदेरी उंदेरी बेटावर चिकाटीने राहिले. इंग्रजानी या सैन्याला हुसकून लावण्याकरिता पुष्कळ नौका आणल्या. उभय पक्षांची बरीच प्राणहानी चकमकी उडून झाली.

शिवाजी आणि मोगल यांच्यामधील युद्धात आमचे धोरण असे आहे की, शिवाजी किंवा मोगल या दोघांपैकी कुणाचाच जय अथवा पराभव होऊं नये. कारण एकाचा जय होऊन दुसऱ्याचा पराभव झाला तर ते आम्हाला फायदेशीर नाही. म्हणून या दोघां ऐवजी आम्हाला आदिलशहा बरा वाटतो. परंतु त्याचा पाठपुरावा आम्ही करूं शकत नाही. त्याचे कारण हे की, एक तर

बादशहा लहान आहे आणि फितुराना शिवाजीच्या सोन्याचे आकर्षण अ. १६८१
त्यांत पुनः मोगलांना आम्हाला मान द्यावा लागतो. म्हणून आदिलशहाचा पक्ष उचलून धरण्याच्या कामी आम्हाला काहीच करता येत नाही. दुसरी गोष्ट ह्या सर्व घटनामुळे शिवाजीची आणि आमचीहि मैत्री होऊं शकत नाही. त्यांत आणखी अडचण ही की, अरबांशी त्याच्या ज्या वाटाघाटी चालू आहेत, आणि त्यांच्याशी त्याचे जे जे करार मदार आहेत त्यांचाहि अडसर या कामी येत आहे.†
(Arquivo Historico Ultramanino–Documertos avulsos da India.)

क्र. ८४ **गोवा, दि. ९ डिसेंबर १६८०**

संभाजी महाराजानी रामजी ठाकूर या नावाचा एक गृहस्थ आपला वकील म्हणून गोव्याला पाठविला होता. पुढें हा मनुष्य दगलबाज असल्याचे सिद्ध झाले. गोव्याचा गव्हर्नर डिचोलीचे सुभेदार मोरो दादाजी याना लिहिलेल्या पत्रात प्रस्तुत गोष्टीचा उल्लेख करतो. तो म्हणतो की, रामजी ठाकूर दगलबाज असल्याचा इशारा संभाजी राजे यानी आपणास दिला नाही.

डिचोलीचे सुभेदार मोरो दादाजी यांस

देसायांसंबंधी आपण जी बातमी दिली आहे ती मला नवीन आहे ते संभाजी राजे यांचे प्रजाजन असतां व त्यांच्या राज्यांत राहात असतां ते अशा अनुचित गोष्टी करण्यास कसे धजतात, आणि मग आमच्या राज्यांत कसे येतात………
……(फाटले आहे)……………………………………………
रामजी ठाकूर याच्या विषयी आपण तक्रार केली आहे. खरें तर ही तक्रार सर्वप्रथम मीच करायला हवी होती. संभाजी राजे यानी एका दगलबाज मनुष्यास वकील म्हणून अधिकारपत्रें देऊन माझ्याकडे पाठविले व मी त्याच्यावर विसंबून राज्याच्या गुप्त गोष्टी त्याला विदित केल्या. संभाजी राजे यानी तहाच्या वाटाघाटीबाबत सुरुवातीला घाई केली व नंतर आपल्या वकिलावर आपला विश्वास नाही, तरी त्याच्याशीं गुप्त गोष्टींचें खलबत करूं नये, असा इशारा मला त्यानी अद्याप दिलेला नाही. आणि तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी नवीन वकील अद्याप आवश्यक ते अधिकार देऊन इकडे पाठविला नाही. युद्धमान परिस्थितीची झळ गरीब नागरिकाना अधिक पोहोचत असल्याने त्यांच्याविषयी मला अनुकंपा वाटते व म्हणून संभाजी राजे यांच्या अधिकाऱ्यांच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करून मी तहाचे व शांततेचे पालन करतो. सुभेदारास मी इशारा देतो की, तुमच्या हद्दींतील

† Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 133.

ाही……… तायानी अथवा अन्य माणसानी आमच्या हद्दींत येऊन वास्तव्य केलेलें मला खपणार नाही. तसेच नदीच्या कांठावरहि कुणी राहूं नये असें मला वाटते. कारण मला सुगावा लागण्यापूर्वीच हे लोक चोऱ्या माऱ्या करून पसार होतात. शांततेची व तहाची मला चाड आहे. पण दुसऱ्या बाजूलाहि हे धोरण अवलंबिले जाणे आवश्यक आहे. म्हणून मला आवडणारी एकादी गोष्ट जर तुमच्या कडून घडली तर मी तुम्हाला स्वेच्छेने मदत करीन.*

असतो.
मग ह

गोवा, ९ डिसेंबर १६८०
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ८५ **गोवा, दि. ४ जानेवारी १६८१**

गोव्यातील काही जवाहिऱ्याना डिचोलीच्या सुभेदाराने अटक केली होती. त्याबद्दल गोव्याच्या गव्हर्नरने डिचोलीच्या सुभेदारास पाठविलेला हा निषेधाचा खलिता आहे. त्यांत तो म्हणतो की, जडजवाहिऱ्याचा व्यापार उभय राज्यामध्ये आदिलशाहीत चालू होता व शिवाजी राजे यानीहि तो बंद केला नव्हता. यावरून संभाजी राजे याना शांतता नको युद्ध हवे असा अर्थ करायचा का? असा सवाल तो पत्रात करतो.

डिचोलीचे सुभेदार मोरो दादाजी यांस

मला बातमी कळली आहे की हिरेमाणकांचा व्यापार करणाऱ्या ह्या राज्यांतील व्यापाऱ्याना आपण अटक केली आहे. हा व्यापार आदिलशाहीत चालू होता व शिवाजी राजे यानीहि तो बंद केला नव्हता. आतां उभय राज्यांमध्यें तह नांदत असल्याने आपण आमच्या व्यापाऱ्याना अटक करण्याचा हुकूम कसा केला त्याचे मला नवल वाटते. आपल्या ह्या कृत्याने उभय राज्यांमधील व्यापार बंद पडेल असे आपणास नाही का वाटत? यावरून संभाजी राजे याना शांतता नको, तर युद्ध हवे असे आम्ही समजायचे का? आपण सुज्ञ आहांत, तरी आपल्या निर्णयाचा फेर विचार करावा व उभय पक्षांची नुकसानी टाळावी. आपल्या हातून हे जें कृत्य घडले आहे, तसें कृत्य यापूर्वी कधींच घडलेले नाही. मी आपणाला इशारा देतो की, ह्या घटनेकडे मी मुळींच दुर्लक्ष करणार नाही. मी आपणाकडे या पत्राचे उत्तर त्वरीत आणण्यासाठी राज्याचा दुभाषी पाठवित आहे.†

गोवा, ४ जानेवारी १६८१
आंतोनियु पाइश द सांद

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 49 e verso.
† Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 49 e verso.

क्र. ८६ **गोवा, दि ३० जानेवारी १६८१**

संभाजी राजे यांचे अधिकारी त्यांच्यामधील आणि आमच्यामधील शांतता व सलोखा बिघडवित आहेत. त्यामुळे मिळमिळित तहापेक्षां ढळढळीत युद्ध बरे असे आपणास वाटूं लागले आहे, अशी तक्रार गोव्याचा गव्हर्नर कोकणच्या सुभेदारास पाठविलेल्या पत्रात करतो.

कोकणचे सुभेदार ……… राम यांस

आपले चालू महिन्याच्या दि. १९ चे पत्र मिळाले व आपली ख्याली खुशाली कळली. संभाजी राजे व आमचे राज्य यांच्यामध्ये शांतता व सलोखा नांदावा अशी इच्छा आपण पत्रांत व्यक्त केली आहे. परंतू आपणास माहीत आहेच की, संभाजी राजे यांच्या अधिकाऱ्यांच्या अरेरावीमुळे प्रस्तुत शांतता आणि सलोखा टिकणे कठीण झाले आहे. मला त्यांची वागणूक असह्य झाली असून युद्ध सुरू करावे की काय याचा मी विचार करीत आहे. कारण मिळमिळीत तहापेक्षा ढळढळीत युद्ध उत्तम असें मला वाटूं लागले आहे.

आपण ज्या नौकेसंबंधी मला लिहिले आहे तिच्या संबंधी मला कोणतीच माहिती नाही ……… सेनापतीनेहि………………………………*

गोवा, ३० जानेवारी १६८१
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ८७ **गोवा, दि. १ मार्च १६८१**

डिचोलीच्या हवालदाराने डिचोली आणि गोवा यांच्यामधील व्यापार बंद केल्याबद्दल गोव्याचा गव्हर्नर आश्चर्य व्यक्त करतो.

डिचोलीचे हवालदार यांस

हवालदार संभाजी अनंत यांचे पत्र पावले. त्यानी डिचोलीच्या हद्दीतील व्यापार कां बंद केला ते मला कळू शकले नाही. त्यांचे हे कृत्य विस्मयजनक आहे यांत शंका नाही. ह्या गोष्टी अद्याप संभाजी राजे यांच्या कानावर गेल्या नसाव्यात! †

गोवा, दि. १ मार्च १६८१
आंतोनियु पाइश द सांद

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 49 verso.
† Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 51.

क्र. ८८ **इ. स. १६८१ (?)**

गोव्याचा गव्हर्नर फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ याना लिहिलेल्या पत्रात डिचोलीच्या सुभेदाराच्या अनागोंदी कारभाराचा उल्लेख करतो व धर्माजी नागनाथ यानी गोव्याच्या बाबतीत उदार दृष्टिकोण ठेवल्याबद्दल समाधान व्यक्त करतो. तो म्हणतो की, नकली मैत्रीपेक्षां युद्ध बरें असे आपले मत आहे.

फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांस

चालू माहीचे म्हणजे दि. २ मार्चचे आपले पत्र मिळाले. आपली ख्यालीखुशाली कळल्याने व आमच्यामधील शांततेचे व तहाचे पालन करण्याची आपली इच्छा असल्याचे पाहून आनंद झाला.

डिचोलीच्या सुभेदाराने चोऱ्यामाऱ्या व दमदाटीची कृत्यें याना प्रोत्साहन दिल्याने सर्वत्र अंदाधुंदी माजली आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून डिचोलीकडील सर्व व्यापार बंद करण्याचा निर्णय मला घ्यावा लागला. याची झळ गरीब लोकांना पोहोचणार आहे हें पाहून मला दुःख होते. परंतु त्याला इलाज नाही. मात्र त्याच बरोबर मी फोंडाच्या हद्दींतील लोकाना या शहरीं येऊन रोजगार आणि व्यापार उदीम करतां येणे सोपे जावे म्हणून आमच्या सांथियागू व सां लौरेंसु ह्या खिंडी खुल्या केल्या आहेत. प्रस्तुत खिंडी खुल्या केल्याने आमच्याकडील लोकानाहि कामाधामाच्या निमित्ताने फोंडाच्या हद्दींत जातां येईल. आमच्या साष्टीच्या कॅप्टन जनरललाहि मी हुकूम केला आहे की, तिकडील दोन्ही बाजूचे संबंध जर चांगले असतील तर दोन्हीकडील लोकाना इकडे तिकडे येण्याजाण्यास परवानगी द्यावी. आपण सुज्ञ आहांत म्हणून दमदाटी व अरेरावी करीत नाही. त्यामुळें उभय बाजूंचा व्यापार वाढून सामान्य जनता सुखी होईल.

आम्ही आमच्या शेजाऱ्याकडील मैत्रीचे आणि शांततेचे पालन नेहमीच करीत आलों आहोत. ही स्थिती चालू रहावी अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. मात्र नकली मैत्री पेक्षां युद्ध बरे या मताचा मी आहे. आपली जर इच्छा असेल तर ·········पाठविण्यास ··················*

आंतोनियु पाइश द सांद

क्र. ८९ **गोवा, दि. ६ मे १६८१**

गोव्याच्या गव्हर्नरने डिचोलीच्या सुभेदारास लिहिलेल्या प्रस्तुत पत्रांत संभाजी महाराज कोंकणच्या दौऱ्यावर असल्याचा उल्लेख आहे. उभय राज्यांमधील व्यापारावर त्याने भर दिला आहे.

* Livro dos Reis Vizinhos No. 3, fls 51.

डिचोलीचे सुभेदार मोरो दादाजी यांस

संभाजी राजे यांचें या भागात आगमन झाल्याची बातमी देऊन लिहिलेले आपले पत्र मिळाले. संभाजी राजे हे कोंकणच्या दौऱ्यावर आल्याचे पाहून त्यांच्या प्रजेला फार आनंद झाला असेल. ते त्यांच्या अडीअडचणी आणि तक्रारी ऐकून घेतील व त्याना न्याय देतील यांत शंका नाही.·········आपल्या सोयींकडे मी दुर्लक्ष करणार नाही. चोरीमारी होण्याची जर भीती नसेल, तर उभय राज्यांमधील व्यापाराची देवाणघेवाण होण्यास कोणतीच अडचण नाही. त्यामुळें दोन्ही राज्यांतील प्रजेचा फायदा होईल व सुख समृद्धी वृद्धिंगत होईल. पुनः शांतता नांदण्यासहि मदत होईल. या बाबतीत तुमच्याकडून ज्या सूचना येतील, त्यांचा मी विचार करीन. तसेंच संभाजी राजे यांच्या मंत्र्यांशीहि सहकार्य करण्यास मला आनंद वाटेल.*

गोवा, दि. ६ मे १६८१
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ९० **गोवा, दि. ८ मे १६८१**

संभाजी महाराज कोंकणच्या दौऱ्यावर असतां फोंड्याला भेट देणार होते. परंतु त्यांचे आगमन झाले, तर तांदळाची टंचाई भासेल म्हणून फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ यानी गोव्याच्या गव्हर्नर-कडे तांदळाची मागणी केली होती. त्याना पाठविलेल्या प्रत्युत्तरांत गव्हर्नर म्हणतो की, जो काय शिलकी तांदुळ असेल तो पाठविण्याची व्यवस्था करतो.

फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांस

आमचा दुभाषी गैरहजर असल्याकारणे आपल्या पत्रांचे उत्तर लगेच करतां आले नाही. 'सां इश्तेव्हाव' व कुंभारजुवे येथील कुणब्यांना तुमच्या हद्दींतील त्यांची शेते मी पेरण्यासाठी पाठविले आहे. आपणास माहीत असेलच की हीं शेते तें त्यांच्या वाडवडिलांपासून पेरीत आले आहेत. नदींत मेणाने भरलेला जो मचवा पकडण्यात आला होता तो सोडून देण्याची मी आज्ञा केली आहे. ज्याने हा मचवा पकडला त्या कॅप्टनला कैद करण्यात येत असून त्याच्याकडून नौका काढून घेतली जात आहे.

संभाजी राजे या भागांत आले असल्याचे कळून आनंद झाला. त्यांची प्रजा त्याना डोळे भरून पाहील व ते तिच्या अडीअडचणी आणि तक्रारी दूर करतील. गोव्यांत

* Reis Vizinhos No. 3, fls 53.

जर गहू आणि चणे पिकले असते तर केवढी भाग्याची गोष्ट होती ! दुर्दैवाची गोष्ट ही की ह्या वस्तु आम्हाला बाहेरून आणवाव्या लागतात. आम्ही खंबायतहून जें धान्य आयात केले तें आम्हालाच पुरत नाही. तेव्हां तुम्हाला आम्ही धान्य कसें पाठवणार ! तरीहि तुम्ही ज्या अर्थी लिहितां की संभाजी राजे यांचे तुमच्याकडे आगमन झाले तर तांदळाचा तुटवडा भासेल, तरी थोडा तांदुळ पाठवावा. त्या अर्थी तुमच्या मागणीची कदर करून जो काय शिलकी तांदुळ असेल तो पाठविण्याची व्यवस्था करीत आहे.*

गोवा, दि. ८ मे १६८१
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ९१ गोवा, दि. २२ मे १६८१

संभाजी महाराजांचा नवीन वकील गोव्यास जाणार होता. त्याच्या बाबत डिचोलीच्या हवालदारास लिहिलेल्या पत्रात गोव्याचा गव्हर्नर म्हणतो की, त्याने अधिकृत वकील म्हणून संभाजी महाराजांकडून अधिकारपत्रे आणल्या खेरीज आपण त्याच्याशी राजनैतिक बोलणी करणार नाही.

डिचोलीचे हवालदार संभाजी अनंत यांस

मी गोव्याबाहेर असल्या कारणे संभाजी राजे यांच्या वकिलाच्या आगमनासंबंधी हवालदारांचे जें पत्र आले त्याचें उत्तर मी पाठवूं शकलो नाही. मला आपणाकडून माहिती हवी आहे की, संभाजी राजे यांचे आपणाला जें पत्र आलें आहे, त्यांत आपल्या पत्रांत ज्या वकिलाचा उल्लेख आहे तो वकील आपला इकडचा अधिकृत वकील आहे असें त्यानी लिहिलें आहे का. तसा उल्लेख जर नसेल तर प्रस्तुत वकिलाशी मला राजनैतिक बोलणी करतां येणार नाहीत. दुसरी गोष्ट त्याने संभाजी राजे यांच्याकडून अधिकारपत्रे आणली पाहिजेत. नाही तर रामजी नाईक ठाकूर यांच्या बाबतींत जें घडलें, ते ह्या नवीन वकिलाच्या बाबतीतहि घडायचे. ह्या सर्व गोष्टींच्या खुलाशाचे तपशीलवार पत्र मला आलें पाहिजे, तरच नवीन वकिलाला इकडे येण्याबाबत मी माझें आज्ञापत्र धाडीन.†

गोवा, दि. २२ मे १६८१
आंतोनियु पाइश द सांद

* Livro do Reis Vizinhos No. 3, fls 53.
† Reis Vizinhos No. 3, fl 54.

क्र. ९२ गोवा, दि. ६ जून १६८१

गोव्याचा गव्हर्नर संभाजी महाराजांच्या पत्राचे उत्तर त्याना फोंड्याच्या सुभेदारामार्फत पाठवितो. कारण, त्यांत डिचोलीच्या सुभेदाराविरुद्ध तक्रार असल्याने संभाजी महाराजांचे हाती ते सुरक्षितपणे पडावे अशी त्याची इच्छा असते.

फोंड्याचे सुभेदार धर्माजी नागनाथ यांस

चालू जून महिन्याच्या पहिल्या तारखेस संभाजी राजे यांचे एक पत्र मिळाले. ज्या इसमाने प्रस्तुत पत्र आणले त्यांच्याविषयीं मला संशय आल्याने मी त्याच्याकडे पत्राचे उत्तर न देता त्याला तसाच पाठवून दिला. नंतर मी विचार केला की, सदहू पत्राचे उत्तर तुमच्या मार्फत पाठवावे. पत्र आपणामार्फत पाठविण्याचे मी ठरविले, त्याचे कारण हें की, डिचोलीच्या सुभेदाराच्या हातून जीं अतिरेकी कृत्यें घडत आहेत त्यांचा उल्लेख त्यांत असल्याने तें सुरक्षितपणे संभाजी राजे यांच्या हाती पडणे अगत्याचें होते. दुसरें पत्र अण्णाजी पंडीत यांचे आहे. हीं पत्रे आमचे दुभाषी घेऊन जात आहेत. त्यांच्यांशी आपणाला निःशंकपणे बोलतां येईल.*

गोवा, दि. ६ जून १६८१
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ९३ गोवा, दि. १७ जून १६८१ (?)

गोव्यांतील एका व्यापाऱ्याचा लांकडानी भरलेला मचवा अंकोला येथें पकडून ठेवण्यात आला होता. तो सोडून देण्यात यावा व लांकडाचे इतर मचवेहि अविरोध सोडले जावेत म्हणून गोव्याच्या गव्हर्नरचे अंकोल्याच्या सुभेदारास पत्र.

अंकोल्याचे सुभेदार यांस

या शहरांतील एका मुशीच्या बांधकामासाठी सागवानी लाकूड हवे होते म्हणून माझ्या स्वामीच्या महसूल खात्याने काही वैश्य व्यापाऱ्याना लांकडाच्या आयातीचे परवाने दिले होते. त्यांच्यापैकी शिवा राम नाईक ह्या व्यापाऱ्याने माझ्याकडे येऊन तक्रार नोंदविली की, त्यांचा एक लाकडाने भरलेला मचवा आपल्या अधिकार कक्षेंतील प्रदेशांत पकडला गेला आहे. संभाजी राजे आणि हे राज्य यांच्यामध्ये मैत्रीचे आणि स्नेहाचे संबंध असतां व त्या संबंधाची वृद्धी व्हावी म्हणून आम्ही झटत असता आपल्या हद्दींत आमच्या नागरिकांची कळ काढली

* Reis Vizinhos No. 3. fl 55.

जावी ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट आहे. तरी माझी आपणाकडे मागणी आहे की, लांकडे भरलेला जो मचवा आपल्या हद्दींत पकडण्यांत आला आहे तो सोडून देण्याची तजवीज करावी व लांकडे भरलेले जे आणखी मचवे तिकडून इकडे येणार आहेत त्याना इकडे अविरोध येऊ द्यावे. मी आपणाला वचन देतो की, आमच्या हद्दींत आपल्या लोकांचा उपमर्द होणार नाही.*

गोवा, दि. १७ जून . . . .

क्र. ९४ गोवा, दि. ५ जुलै १६८१

संभाजी महाराजांची एक नौका पोर्तुगीजानी पकडली व त्यांच्या राज्यांत जाणारे रस्ते गोव्याच्या गव्हर्नरने बंद केले, म्हणून कुडाळचे हवालदार गणोराम यानी गव्हर्नरकडे तक्रार केली होती. गव्हर्नर पत्रोतरी म्हणतो की, संभाजी राजे यांचे अधिकारी दोन्ही राज्यांमधील मैत्रीच्या व सलोख्याच्या संबंधात व्यत्यय आणीत आहेत.

कुडाळचे हवालदार गणोराम यांस

आपले मागच्या महिन्याच्या दि. २४ चे पत्र पावले. आमच्या उत्तरेकडील प्रदेशाच्या समुद्र किनाऱ्यावर आपली एक नौका आमच्या आरमाराने पकडली असे आपण लिहितां. परंतु ह्या घटनेची अद्याप मला माहिती मिळालेली नाही. आमच्या महसूल खात्याचा प्रमुख अधिकारी सांप्रत आमच्या उत्तरेकडील प्रदेशांत दौऱ्यावर गेला आहे. त्याच्याकडून मला आपल्या नौकेच्या अटकेसंबंधीची माहिती मिळेल व तो नौकेसंबंधीचा काय तो न्यायनिवाडा करील. आपण आणखी तक्रार केली आहे की, मी तुमच्या प्रदेशांत जाणारे रस्ते बंद केले आहेत. आपणाला ह्या बाबतींत चुकीची माहिती मिळाली आहे. मी फक्त डिचोलीच्या बाजूच्या वाटा बंद केल्या आहेत. त्याचीं कारणे वेगळी आहेत. खरें तर मी या संबंधी अधिक कडक उपाययोजना करायला हवी होती. आणि मला भीति वाटते की, संभाजी राजे यांचे अधिकारी मला ती जालिम उपाययोजना करण्यास भाग पाडल्यावांचून राहाणार नाहीत. त्याना आमच्या दोन्ही राज्यांमध्यें तह आणि शांतता नांदलेली नको आहे. त्यांचा भंग व्हावा म्हणूनच ते ह्या कारवाया करीत आहेत.

मला बातमी कळली आहे की आमचा एक प्रजाजन नेमा पारेख याचा मुलगा एका होडीने गोव्याहून दीवला जात असतां वेंगुर्ल्याच्या हद्दींत मरण पावला. आपल्या अधिकाराच्या कक्षेत हा प्रकार घडला असल्याने ज्या नौकेंतून सदरहू

* Reis Vizinhos No. 3, fl's 52.

मनुष्य प्रवास करीत होता ती पकडण्यात आलेली नौका सोडून देण्याची व्यवस्था आपण करावी. आपण जर सदहू नौका सोडून दिली नाही, तर मी समजेन की, संभाजी राजे व आमचे राज्य यांच्यामध्ये नांदत आलेली शांतता आणि तह यांचे आपणास पालन करायचे नाही. आणि मग मी तुमच्या होडचा पकडण्याचा हुकूम जशास तसे या नीतीनुसार करीन. आपण सुज्ञ आहांत. तरी·· प्रजाजनांच्या हितासाठी ही गोष्ट कराल अशी आशा आहे.........*

गोवा, दि. ५ जुलै १६८१
आंतोनियु पाइश द सांद

क्र. ९५ गोवा, दि. २९ नवंबर १६८१

पोर्तुगीजांच्या अमलाखालच्या वसई येथील प्रदेशांत येसाजी राजे पटेकर यानी पोर्तुगीजांविरुद्ध बंड पुकारले होते. त्या बंडाचा बिमोड करण्यासाठी पोर्तुगीजानी काय उपाययोजना केली ते प्रस्तुत कागदावरून कळून येते.

शनिवार दि. २९ नवंबर १६८१ या दिवशी पणजी येथील किल्ल्यांतील शाही सभागृहात राज्य सल्लागार मंडळाची सभा व्हिसेरेइ फ्रान्सिश्कु द ताव्होरा यानी बोलाविली. त्यानी सभागृहाला वृत्तांत सादर केला की, वसई येथील कॅप्टन दों व्हाश्कु लुईज कौतिन्यु व तेथील लश्कराचे कॅप्टनमोर मानुएल द सौझ मिनेझिश यांच्या पत्रावरून कळून येते की, वसईच्या अखत्यारीतील दोन परगण्यात येसाजी राजे पटेकर याने बंड पुकारले असून लुटालूट, जाळपोळ आणि मानवी हत्या केली आहे. प्रस्तुत येसाजी राजे पटेकर हा आमचा मांडलिक असून त्याला तीनशे प्यादे आणि पंचवीस स्वार बाळगण्याचा अधिकार आहे. व्हिसेरेइ पुढे म्हणाले की, वसई येथील दोन फ्रिगेटस् दीवला निघायची होती परंतु ती पाठविण्यात आलेली नाहीत. या फ्रिगेटसशिवाय उत्तरेकडील आरमारांतील आणखी तीन नौका लश्करी उपाययोजना म्हणून वसई येथें आणण्यांत आल्या आहेत. नंतर व्हिसेरेइ यानी राज्य सचिवास वसईहून आलेली पत्रें सभागृहास वाचून दाखविण्याचा हुकूम केला. ती वाचून झाल्यावर त्यानी सांगितले की, वसई येथे ठेवून घेण्यात आलेली दोन फ्रिगेटस् दीवला पाठवून देण्याचा व गोव्याहून साठ सैनिकांची एक तुकडी वसईला पाठविण्याचा निर्णय मी घेतला आहे. तसेच येसाजी राजे पटेकर याच्या बंडखोरीला आणि अराजकाला आळा बसावा म्हणून त्या प्रदेशातील नद्यांतून गस्त घालण्यासाठी लढाऊ गलबते पाठविण्याचा हुकूम वसईच्या कॅप्टनला पाठविण्यात येत आहे.

* Livro dos Reis Vizinhos, No. 3, fls 52.

व्हिसेरेइ फ्रान्सिश्कु द ताव्होरा यांचा ठराव मतास टाकला असतां तो एकमताने मंजुर झाला.*

क्र. ९६ गोवा, दि. १६ फेब्रुवारी १६८२

पोर्तुगीज अधिकारी आपल्या राजाचा थकलेला चौथचा कर देत नाहीत म्हणून चौथियाच्या राजाच्या सैन्याने पोर्तुगीजांच्या दमण-मधील प्रदेशांत शिरून नासधूस केली होती. त्याबद्दल चौथियाच्या राजाने पोर्तुगीजांची क्षमा मागितली असतां गोव्याच्या राज्य सल्ला-गार मंडळाने ती मंजुर केली व थकलेल्या चौथमधून नुकसानीची रक्कम वजा करावी असा निर्णय घेतला.

दि. १६ फेब्रुवारी १६८२ या दिवशी गोव्याच्या किल्ल्यांतील शाही सभागृहांत राज्य सल्लागार मंडळाची बैठक व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल फ्रान्सिश्कु द ताव्होरा यानी बोलाविली. त्यानी सभागृहाला सांगितले की, चौथियाच्या राजाने आपणास एक पत्र लिहून क्षमा मागितली आहे. हें पत्र दि. २८ डिसेंबर १६८१ या दिवशी लिहिले गेले व ते इकडे काल आले. नंतर व्हिसेरेइ यानी प्रस्तुत पत्र सभागृहाला वाचून दाखविण्याची आज्ञा राज्य सचिवास केली. त्या पत्राचा आशय असा : ' माझ्या सैन्याने तुमच्या दमणच्या कक्षेंतील खेडचांत शिरून जी नुकसानी केली, त्याबद्दल मी दिलगीर आहे. माझें सैन्य तुमच्या खेडचांत शिरले त्याचें कारण हे की, गेल्या काही वर्षांची चौथची जी बाकी तुमच्याकडे थकली आहे, ती तुम्ही देण्याची टाळाटाळ चालविलेली पाहून माझें सैन्य बिथरले आहे. माझ्या सैन्याला मुशाहिरा घालण्यास माझ्यापाशी पैसा नाही. तरीहि माझ्या सैन्याकडून तुमच्या प्रदेशाची जी हानी झाली त्याबद्दल मला वाईट वाटते व त्याबद्दल मी तुमची क्षमा मागतो. '

व्हिसेरेइ म्हणाले की, चौथियाच्या राजाने आपली क्षमा मागितली आहे. तो आणि त्याचे वाडवडील हे आपले दोस्त आहेत, हे आपणास माहीत आहेच. ही मैत्री अतूट रहावी अशी चौथियाच्या राजाची इच्छा आहे. म्हणून त्याच्या सैन्या-कडून आपली जी हानी झाली ती चौथच्या बाकींतून भरून देण्याची तयारी त्याने दर्शविली आहे.

चौथियाच्या राजाचे पत्र राज्य सचिवाने सभागृहास वाचून दाखविल्यावर आणि व्हिसेरेइ यानी चौथियाच्या राजाचा दृष्टिकोण सभागृहास समजावून सांगितल्यावर सभागृहाने एक मताने ठरविले की, चौथियाच्या राजाने ज्या अर्थी त्याच्या

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 142

सैन्याकडून आपल्या राज्याची जी नुकसानी झाली त्याबद्दल क्षमा मागितली आहे, त्याअर्थी त्याला आपण क्षमा करावी. तसेंच ही हानी किती झाली त्याचा अदमास घ्यावा व त्याची जी चौथची बाकी आपणाकडे थकली आहे, त्यांतून नुकसानीची रक्कम वजा करून उरलेली रक्कम त्याला परत करावी. मात्र सर्व बाकी चुकती करूं नये. कारण त्याचा जो मुलूख शिवाजीने घेतला आहे त्याचा चौथ त्याला देण्यापूर्वी त्याच्यावर त्याचा हक्क आहे की काय त्याचा निर्णय लागला पाहिजे.

प्रस्तुत दृष्टिकोण व्हिसेरेइ याना मान्य झाल्यावर ठराव संमत झाला. त्यावर सर्व सल्लागारांच्या सह्या आहेत.*

क्र. ९७ गोवा, दि. १९ मार्च १६८२

येसाजी राजे पटेकर ह्याने पोर्तुगीजांविरुद्ध बंड केले होते. गोव्याच्या राज्यसल्लागार मंडळापुढे हा प्रश्न चर्चेस निघाला असतां वेगवेगळ्या सभासदांनी वेगवेगळी मते व्यक्त केली. अखेर व्हिसेरेइने निर्णय दिला की येसाजी राजे पटेकर याची खेडीं सरकार जमा करावी, त्या खेड्यांत एक लश्करी ठाणे स्थापन करावे व मगच त्याच्या बंडाच्या कारणाची चौकशी करावी.

दि. १५ मार्च १६८२ वार गुरुवार या दिवशी गोव्याच्या किल्ल्यांतील शाही सभागृहांत राज्यसल्लागार मंडळाची सभा भरली. व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल फ्रान्सिश्कु द ताव्होरा यानी सभागृहाला विदित केले की, आमच्या उत्तरेकडील प्रदेशांतील किल्ल्यांचे कॅप्टन जनरल दों रुद्रिगु द कोस्त यानी पत्र पाठविले आहे की, बंडखोर येसाजी राजे पटेकर याने आपल्या कांही छोटचा तोफा आणि दारु-गोळा मागे टाकून जंगलात पळ काढला आहे. आपणास माहीत आहेच की, बंडखोर येसाजी राजे पटेकर हा आमच्या उत्तरेकडील प्रदेशांतील काही खेडचांचा धनी असून आमचे मांडलिकत्व त्याने पत्करले आहे. काही दिवसामागे त्याने आमच्या विरुद्ध बंड पुकारून आमच्या काही खेडचांची लुटालुट केल्याने त्याचे पारिपत्य करण्याची आज्ञा मी आमच्या उत्तरेकडील प्रदेशांतील किल्ल्यांचे सेनापती दों रुद्रिगु द कोस्त याना केली होती. माझ्या आज्ञेप्रमाणे दों रुद्रिगु द कोश्त हे सैन्य घेऊन येसाजी राजे पटेकर याच्या पाठलागास गेले असता त्याने आमच्या सैन्याशी लढाई करण्याचे टाळून पळ काढला. येसाजी राजे पटेकर हा आमचा मांडलिक, त्याने आमच्या स्वामीच्या सत्तेविरुद्ध बंड केले. हा गुन्हा गंभीर स्वरू-पाचा आहे. तरी त्याच्या विरुद्ध काय इलाज करायचा ते मान्यवर सल्लागारानी

* Assentos do Conselho do Estado, Vol. IV, Documento No. 145.

सांगावे. माझा दृष्टिकोण असा आहे की, त्याच्या अमलाखाली जे परगणे आहेत ते आपण काढून घ्यावेत.

व्हिसेरेइ फ्रान्सिश्कु द ताव्होरा यांच्या ठरावावर दृष्टिकोण व्यक्त करताना सल्लागार दों मानुएल लोबु द सिकैरा म्हणाले की, बंडखोर येसाजी राजे पटेकर यांचे वडील आणि आजोबा हे आमचे एकनिष्ठ मांडलिक होते. असें असतां येसाजी राजे पटेकर हा आमच्या स्वामीच्या सत्तेविरुद्ध बंड पुकारतो, त्या मागें काही कारणे आहेत की काय त्याची चौकशी करण्यापूर्वी त्याचा मुलुख सरकारजमा करणे न्याय्य ठरणार नाही.

सल्लागार दों मिगेल द आल्मैदा, क्रिस्तोव्हांव द सौझ कौतिन्यू व आंतोनियु कोर्तेरेआल द सांपायु हे तिघे सल्लागार म्हणाले की, येसाजी राजे पटेकर याचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने त्याच्या अमलाखाली जी वीस गावे आहेत ती काढून घेऊन महसूल खात्याकडे घ्यावी व त्यांच्या उत्पन्नांतून एक लश्करी ठाणे त्या खेड्यांच्या रक्षणासाठी उभारावे.

महसूल खात्याचे इन्स्पेक्टर जनरल मानुएल फुर्तादु द मेंदोंसा यानी वरील तिघांच्या दृष्टिकोणास दुजोरा देऊन सांगितले की, खेडीं काढून घेतल्यावर येसाजी राजे याच्या गुन्ह्याची चौकशी करावी. त्याचा गुन्हा जर शाबीद झाला तर खेडी त्याला परत करूं नयेत.

इंक्विझिशनचे प्रतिनिधी डॉक्टर फ्रान्सिश्कु देलगादू हे म्हणाले की, येसाजी राजे पटेकर यांचा गुन्हा काय आहे त्याची चौकशी केल्या शिवाय त्याला शासन करूं नये. मात्र चौकशीच्या काळात त्याची गावे महसूल खात्याकडे घ्यावीत. जर तो दोषी ठरला तर त्याची खेडी आणि इतर मालमत्ता काढून घ्यावी.

आर्च बिशप प्रिमाज दों मानुएल द सौज द मिनेझिश यानी दृष्टिकोण व्यक्त केला की, येसाजी राजे पटेकर याचा गुन्हा काय त्याची प्रथम चौकशी करावी व मगच त्याला शासन करावे. त्या दरम्यान त्याची गावे काढून घेऊन ती महसूल खात्याकडे द्यावी व त्यांच्या उत्पन्नातून एक ठाणे त्या भागात स्थापन करावे.

सल्लागार मंडळाच्या सर्व सभासदांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर व्हिसेरेइ फ्रान्सिश्कु द ताव्होरा यानी निर्णय दिला की, बंडखोर येसाजी राजे पटेकर याची खेडी काढून घेऊन ती महसूल खात्याकडे देण्यात यावीत व त्यांच्या उत्पन्नातून एक लश्करी ठाणे येसाजी राजे यांच्या मुलुखात स्थापन करावे आणि मग त्याच्या बंडामागील कारणांची चौकशी करावी.

व्हिसेरेइ फ्रान्सिश्कु द ताव्होरा यांचा निर्णय संमत होऊन प्रस्तुत ठरावावर सर्व सभासदांनी सह्या केल्या.*

* Assentos do Conselho do Estado. Vol. IV, Documento No. 147.

क्र. ९८ गोवा, दि. २७ एप्रिल १६८२

संभाजी महाराज आंजेदिव बेटाची तटबंदी करणार होते. दांड्याच्या सिद्दीचाहि या बेटावर डोळा होता. कारण, या बेटातून त्याला संभाजी महाराजांच्या प्रदेशावर हल्ला करणे सोपे जाणार होते. संभाजी महाराजांनी आंजेदिव बेटाची तटबंदी केली, तर खांदेरी उंदेरी बेटाप्रमाणे या बेटातूनहि आपल्या नौकायनास मराठ्यांच्या आरमाराचा उपद्रव होतील या भयाने गोव्याच्या व्हिसेरेने हे बेट ताब्यांत घेण्याचा प्रस्ताव राज्य सल्लागार मंडळासमोर मांडला.

सोमवार दि. २७ एप्रिल १६८२ या दिवशी पणजी येथील किल्ल्यांतील शाही सभागृहात राज्यसल्लागार मंडळाची बैठक भरली. व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल फ्रान्सिश्कु द ताव्होरा यानी सभागृहास वृत्तांत सादर केला की, संभाजी राजे हे आंजेदिव बेटाची तटबंदी करीत असल्याची गुप्त बातमी आपणास कळली आहे. ते म्हणाले की, आंजेदिव बेट हे ह्या शहरापासून अवघे बारा कोसांवर आहे. आपणाला कदाचित माहीत असेलच की, संभाजी राजे यानी सिद्दी दांड्याशी युद्ध करण्यासाठी आमचे जे शत्रु अरब यांच्याशी मैत्री केली आहे. ते त्याना आंजेदिव बेटाची तटबंदी करण्याचे कामी मदत करण्यास तयार आहेत. मात्र त्या मदतीचे बदली ते संभाजी राजे यांच्याकडे त्यांच्या राज्यांत वखारी उघडण्याची परवानगी मागत आहेत. आपणाला माहीत आहेच की, या शहराला धान्याचा आणि इतर जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा कर्नाटकांतून होत असून आमची जहाजे ह्या वस्तू तिकडून आणतात. ह्या जहाजांच्या वाटेवरच आंजेदिव बेट आहे. अशा परिस्थितीत संभाजी राजे यानी त्या बेटाची जर तटबंदी केली, आणि अरबानी तेथे आपली वखार उघडली तर त्यांच्याकडून आमच्या जहाजाना उपद्रव पोहोचल्यावांचून राहाणार नाही. प्रस्तुत बेटासंबंधीची वस्तुस्थिती अशी आहे की, आमच्या नावाड्यानी हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध लावला तेव्हां तें पोर्तुगीजानी व्यापिलें होते. पुढें त्यांच्या हातांत मोठ्या महत्वाची ठाणी आल्यावर त्यानी तें सोडून दिले. आतां जर संभाजी राजे यानी प्रस्तुत बेटाची तटबंदी केली, तर आमच्या उत्तरेकडील आरमाराला व चौलच्या ठाण्याला खांदेरी उंदेरी बेटांतील संभाजी राजे यांच्या तटबंदीचा जसा उपद्रव पोहोचतो तसा आमच्या दक्षिणेकडील आरमाराला या बेटावरील तटबंदीकडून पोहोचेल. आमच्या उत्तरेकडील आरमारांतील जहाजे जेव्हां अन्नधान्य किंवा अन्य वस्तु घेऊन येतात, तेव्हां खांदेरी उंदेरी बेटांतील नौका या जहाजांवर हल्ले चढवून त्यांची लुटालूट करतात. तशी अवस्था आमच्या दक्षिणेतील आरमारांतील जहाजांची होऊं नये म्हणून संभाजी राजे यानी आंजेदिव बेटाची तटबंदी करण्या-

पूर्वीच ते आपण व्यापिलेले बरे असे मला वाटते. आम्ही जर हें बेट व्यापिले नाही तर सिद्दी दांडा ते व्यापण्याचा प्रयत्न केल्यावांचून राहाणार नाही. कारण, हे बेट जर त्याच्या ताब्यात आले तर तेथून त्याला संभाजी राजे यांच्या प्रदेशांवर हल्ले करणे सोपे जाईल. तुम्हाला माहीत असेलच कीं सिद्दी हा संभाजी राजे यांचा शत्रू असून त्या दोघांचे सांप्रत युद्ध चालू आहे.

व्हिसेरेइ यांचा दृष्टिकोण ऐकूण घेतल्यावर सल्लागारानी मत व्यक्त केले की, संभाजी राजे यानी आंजेदिव बेट व्यापण्यापूर्वी अथवा आमच्या शेजाऱ्यापैकी आणखी कोणी ते व्यापण्यापूर्वी पावसाळा सुरूं होण्या अगोदर आपण तें व्यापावे व लगेच तेथें एक लश्करी ठाणे बसवावे. कारण पावसाळा सुरूं झाल्यावर तेथे लश्करी ठाणे बसविण्यासाठी सामान नेण्याचे काम कठीण होईल. एकदां तेथे लश्करी ठाणे बसविण्यात आले की, संभाजी राजे अथवा सिद्दी दांडा तें बेट व्यापण्याचा उद्देश सोडून देईल. ठाणे बसविल्यावर या शहरांतून तिकडे एक किल्ला बांधण्यासाठीं सामान आणि सहा तोफा न्याव्यात. नंतर या बेटाच्या खाडीत संचार करण्यासाठी लढाऊ मचवे ठेवावेत. हे काम तांतडीने झाले पाहिजे, कारण एकदां पावसाळा सुरूं झाला की, त्यात व्यत्यय येईल व दुसरा मोठा धोका हा की, एकाद्या परकी देशाने ते व्यापिले की, आमच्या नौकायनाला त्या देशापासून अडथळा पोहोचेल.

व्हिसेरेइ यानी मान्यवर सल्लागारांचे मत मान्य करून त्याना आश्वासन दिले की, आंजेदिव बेटावर किल्ला बांधण्याचे काम त्वरीत हाती घेतले जाईल.*

क्र. ९९ — गोवा, दि. २८ जून १६८२

संभाजी महाराजांच्या युद्धनौकानी पोर्तुगीजांच्या एका प्रजाजनाचे मालाने भरलेले व्यापारी गलबत पकडले होते. तें आणि त्याच्यापूर्वी पकडलेलीं जहाजेहि सोडून देण्याचा हुकूम काढावा म्हणून गोव्याच्या व्हिसेरेइचें संभाजी महाराजाना पत्र.

संभाजी राजे यांस

आपल्या सुभेदारानी आणि अधिकाऱ्यानी या राज्याच्या प्रजाजनांच्या कांही होडया उत्तरेकडील समुद्रांत पकडल्याची तक्रार मी आपल्या कानावर यापूर्वी घातलीच आहे. आतां आणखी एका प्रसंगाबाबत लिहित आहे. गेल्या फेब्रुवारी महिन्यात कापड, नारळ,···· हस्तीदंती वगैरे मालाने भरलेले एक तारुं या बंदराहून खंबायत बंदराकडे निघालें असता आपल्या आरमारांतील पांच युद्धनौकानी ते········पकडले व कांसा (?) बंदरांत नेले. ज्यानी हें तारू पकडले त्यांचा असा दावा आहे की त्याच्यावरील माल होनावर बंदरांत भरण्यात आला व तें खंबायतच्या व्यापाऱ्यांचे आहे. परंतु हा आरोप खोटा आहे. वस्तुस्थिती ही आहे की, प्रस्तुत तारू हे रणछोडदास नागजी याच्या मालकीचे असून तो आमच्या राज्याचा प्रजाजन आहे. मी आपल्या निदर्शनास आणूं इच्छितो की, सदर्हू तारू आपल्या आरमाराने पकडून उभय राज्यांमधील तहाच्या कलमांचा व शांततेचा भंग केला आहे. तरी आपण प्रस्तुत जहाज त्याच्यावरील सर्व मालासह रणछोड नागजी याच्या प्रतिनिधीच्या ताब्यांत देण्याचा हुकूम काढावा. त्याचप्रमाणे आपल्या आरमाराने आमची जीं गलबते आणि होडया पकडल्या आहेत त्यांचीहि मुक्तता आपण करावी व उभय राज्यांमधील शांततेचे व तहाचे पालन करावे. आपले वकील येसाजी गंभीर यांच्याकडे मी या प्रकरणी अधिकृत तक्रार नोंदविलीच आहे.

आपल्या दैवी अनुग्रहाने ईश्वर आपले रक्षण करो.*

गोवा, दि. २८ जून १६८२
फान्सिश्कु द ताव्होरा

क्र. १०० — इ. स. १६८२ (?)

पोर्तुगीजांचे शत्रु जे अरब त्याना संभाजी महाराजानी आश्रय दिल्या-बद्दल गोव्याच्या व्हिसेरेइने संभाजी महाराजाना पाठविलेले एक निषेधाचे पत्र

संभाजी राजे यांस

मागे आपणाकडून जीं दोन पत्रे आलीं त्यांची उत्तरे मी केलेली आहेत. आतां ज्या पत्राचे उत्तर मी करीत आहे तें पत्र मला आपले वकील येसाजी गंभीरराव यानी दिले. मी येसाजी गंभीरराव यांच्याकडे तक्रार नोंदविली होती की, आमचे शत्रू अरब यांच्याशी आपले मैत्रीचे संबंध आहेत. आपण त्याना आपल्या सेवेंत घेतले आहे व त्याना आपल्या राज्यांत वखारी उघडण्यासहि परवानगी दिली आहे. इतकेंच नव्हे तर या शहरांतील व्यापाऱ्यांचे जे हिरे त्यांनी लुबाडून घेतले ते आपण त्यांच्याशी राहूं दिले आहेत. परंतु आपल्या पत्रांत आपण म्हणतां की, मला अरबांसंबंधी जी माहिती मिळाली आहे ती निराधार आहे. आपले म्हणणे आहे की, अरब फक्त आपल्या बंदरातून घोडयांचा व्यापार करतात

* Assentos do Conselho do Estado. Vol. IV, Documento No. 148.

* Livro dos Reis Vizinhos No. 4, fls 17.

...............परंतु माझ्या गुप्त हेरांकडून मला जो तपशील............. आपण लिहीतां की..............इच्छा..............पोर्तुगीज लोक भावनाना............ .... *

क्र. १०१ **दि. ५ अक्टोबर १६८३**

औरंगजेब बादशहाच्या एका पुत्रास संभाजीने आश्रय दिल्यावरून औरंगजेब बादशहाचे आणि संभाजीचे युद्ध पेटले आहे. त्याची झळ आमच्या हिंदुस्थानच्या प्रदेशाला पोहोचण्याचा धोका असल्याने तिकडे सैन्य पाठविणे अगत्याचे आहे, असा ठराव गोव्याच्या एका माजी गव्हर्नराने पोर्तुगालच्या सागरोत्तर सल्लागार मंडळासमोर मंडळाचा एक सदस्य या नात्याने मांडला असता, मंडळाने तो मंजुर केला.

पोर्तुगाल देशाच्या सागरोत्तर सल्लागार मंडळाची जी सभा दि. ५ अक्टोबर १६८३ या दिवशी लिस्बन शहरी भरली तींत पुढील ठरावाचे वाचन झाले : '.............सागरोत्तर सल्लागार मंडळाचे एक सदस्य आंतोनियू पाइश द सांद यानी पोर्तुगालच्या महाराजाना विनंती केली की, त्यानी मार्च महिन्याच्या पहिल्या मोसमांत हिंदुस्थानला तांतडीने कुमक पाठवावी. ही मदत हिंदुस्थानचे व्हिसेरेइ यानी मागितली म्हणून पाठवायची नसून ती पाठविण्याची गंभीर कारणे हिंदुस्थानात घडली आहेत हे आपणाला तिकडून आलेल्या बातम्यांवरून कळून येतें. पहिली गोष्ट म्हणजे मोगल बादशहा व संभाजी यांच्यामध्यें बादशहाच्या पुत्रावरून युद्ध सुरूं झाले आहे. बादशहाचा जो पुत्र संभाजीच्या आश्रयास जाऊन राहिला आहे, त्याला आपल्या हवाली करण्याची मागणी बादशहाने संभाजीकडे केली होती. ही मागणी संभाजीने मान्य न केल्याने बादशहाने त्याच्या राज्यावर स्वारी केली. बादशहाचे सैन्य संभाजीच्या प्रदेशांत दमण मधून घुसले व त्याच्या आरमाराने वसई नदींतून जाऊन भिवंडी हे ठाणे घेतले. हें ठाणे वसई पासून अवघे दोन कोसांवर आहे. तेथें मोगल सैन्य दीर्घकालीन युद्धाची तयारी करीत असून संभाजीने तर बादशहाच्या पुत्रास त्याच्या हवाली केले नाही, तर त्याचा गोव्यापर्यंतचा संबंद कोकणचा प्रदेश घेण्याचा मोगल सैन्याचा बेत आहे. मोगल सैन्याच्या हालचालीची झळ आमच्या हिंदुस्थानातील प्रदेशाला पोहोचणे स्वाभाविक आहे.

मोगल बादशहा हा आशिया खंडातील अत्यंत बलाढ्य असा सम्राट असून तो आमच्या प्रदेशाला येऊन भिडला आहे. त्याला एक आरमार बांधायचे आहे व इंग्रज आणि डच त्याला युद्ध नौका बांधून देण्याचे कामी मदत करण्यास तयार आहेत.

मोगल बादशहापासून आमच्या प्रदेशाला धोका निर्माण झाला आहे हें तर खरेंच; परंतू मोगल बादशहाच्या सैन्याला संभाजीच्या प्रदेशावर स्वारी करण्यासाठी आमच्या प्रदेशांतून वाट मिळाल्याने त्याचा आमच्यावर रोष झाला आहे. त्यामुळें तो आमच्यावर हल्ला करण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितींत व्हिसेरेइची अवस्था बिकट होणे स्वाभाविक आहे. त्यांच्यापाशीं सैन्य नाही. माणसें नाहीत आणि अन्य साधनेहि नाहीत.

आंतोनियु पाइश द सांद यांचे भाषण ऐकल्यावर सागरोत्तर सल्लागार मंडळाचे एकमत झाले की, हिंदुस्थानला मदत पाठविणे अगत्याचे आहे.*

* Livro dos Reis Vizinhos, No. 4 fls 17

क्र. १०२ **गोवा, दि. २४ नवंबर १६८३**

संभाजी महाराजांचे सैन्य पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेल्या, गोवा, चौल, दमण आणि वसई ह्या चार प्रदेशांत मोठ्या संख्येने घुसले होते. ह्या सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी लश्कराची आणि पैशाची मदत हवी होती. त्याचा विचार करण्यासाठी गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळाची जी बैठक भरली, तींत प्रजेचे प्रतिनिधी म्हणून बारा सदस्य निवडण्यात आले.

बुधवार दि. २४ नवंबर १६८३ या दिवशी दुपारी गोवा शहराच्या किल्ल्यांतील शाही सभागृहांत व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल फ्रान्सिश्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी गोवा शहरांतील खानदानी वर्ग, भिक्षुक वर्ग आणि रयत ह्या तीन वर्गांच्या प्रतिनिधींची सभा बोलविली. संभाजी राजे यानी गोवा, चौल, दमण आणि वसई, वगैरे पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशांत सर्व बाजूनी सैन्य घुसविले असल्याने, या युद्धाच्या खर्चासाठी तीन लक्ष अश्रफींचा निधी कसा गोळा करतां येईल त्याचा विचार विनिमय करण्यासाठी व्हिसेरेइ यानी प्रस्तुत सभा बोलविली होती. या प्रसंगी व्हिसेरेइ फ्रान्सिश्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी राज्य सचिव लुईज गोंसाल्विज द कोता याना आज्ञा केली की, ज्या कारणासाठी प्रस्तुतची सभा पाचारण करण्यात आली आहे, तें कारण सभेला समजावून सांगावे. त्या आदेशानुसार राज्य सचिवानी सभेला निवेदन सादर केलें. ते म्हणाले की, संभाजीने या राज्याच्या सर्व प्रदेशांत मोठे पायदळ, घोडदळ आणि तोफखाना यांच्यासह सैन्य घुसविले आहे. या आक्रमणाला गोवा, चोलचा किल्ला,[1] वसई,

* Arquivo Historico Ultamarino, Documentos Avulsos da India; Assentos do Conselho do Estado Vol. IV : foot note. pg 417-418.

दमण, वगैरे आमचा प्रदेश बळी पडला आहे. चौलचा वेढा तर शत्रूने आवळत आणला आहे. गोव्यामध्यें शत्रू सैन्य, साष्टी, बार्देश, या शहरा लगतचा टापू आणि सेंट स्टिफन बेटांत घुसले आहे. त्याने सगळीकडे लुटालूट आणि जाळपोळ सुरू केली असून धर्ममंदिरे देखील त्यातून सुटलेली नाहीत. शत्रू सैन्याला आमच्याकडून परिणामकारक प्रतिकार होत नाही. त्याचे कारण हे की, हा सर्व प्रदेश उघडा आहे. आणि ज्या खिंडी रोखून धरण्यासारख्या होत्या तिकडे आपण सैन्य पाठवू शकलो नाही. त्याचे कारण हे की, आमच्यापाशी सैन्य अगदींच तटपुंजे असून पोर्तुगालहून मागविलेली सैन्याची कुमक अद्याप आलेली नाही. तरीहि शत्रूला खानदानी वर्ग, भिक्षुक वर्ग आणि रयत आपल्या मगदुराप्रमाणे प्रतिकार करीत आहे. परंतु युद्धासाठी केवळ माणसे असून भागत नाही, मनुष्य बळाप्रमाणेच पैशाचीहि आवश्यकता असते. दुर्दैवाची गोष्ट ही की, सांप्रत आमच्यापाशी पैसा नाही. तेव्हां युद्धासाठी जर पैसा गोळा करायचा असेल, तर सगळ्यानी स्वखुषीने आपापल्या ऐपती नुसार युद्धनिधीला पैसा दिला पाहिजे. आपण सर्व आपल्या राजाचे इमानी प्रजाजन असल्याने हा युद्धनिधी गोळा करण्याचे कामी कुचराई करणार नाही, याची आम्हाला खात्री आहे. आपणाला माझी सूचना आहे की, आपणा तिघां वर्गातून प्रत्येकी चार असे बारा प्रतिनिधी आपण या कामासाठी निवडावेत व त्यानी मग बैठक भरवून निधी गोळा करण्याच्या मार्गांचा विचारविनिमय करावा.

राज्य सचिव लुईज गोंसाल्विज द कोता यांचे भाषण श्रवण केल्यावर त्यांच्या शेवटच्या सूचनेनुसार तिन्ही वर्गांनी प्रत्येकी चार असे बारा प्रतिनिधी निवडिले.*

क्र. १०३ — गोवा, दि. २६ नवंबर १६८३

संभाजी महाराज व पोर्तुगीज यांचे युद्ध चालू होते. पोर्तुगीजांपाशी सैन्य कमी होते. अशा परिस्थितींत दरवर्षी पोर्तुगालला पाठवायचे गलबत पाठवायचे की नाही, तत्संबंधीचा ठराव गोव्याच्या व्हिसेरेइने राज्य सल्लागार मंडळासमोर मांडला असतां, सल्लागार मंडळाचे म्हणणे पडले की, गलबत मोठे न पाठवितां लहान पाठवावे. कारण मोठे गलबत पाठवायचे झाल्यास त्याच्यावर बरेच लढाऊ सैनिक गलबताच्या रक्षणार्थ जाणार होते. सल्लागार म्हणाले की त्या सैनिकांचा उपयोग शत्रूशी लढण्यासाठी करता येईल.

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 156.

१. संभाजी महाराजानी चौलच्या किल्ल्यावर दि. २२ जुलै १६८३ यादिवशी हल्ला केला.

शुक्रवार दि. २६ नवंबर १६८३ या दिवशी व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल फ्रान्सिश्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी राज्य सल्लागार मंडळाची सभा जेजूस संघाच्या पाद्रयांच्या निवासस्थानी पाचारण केली. त्यानी सभागृहाला निवेदन केले की, सालाबादप्रमाणे यंदाहि मायदेशाला पाठविण्याची नौका मी तयार केली असून त्यासाठी 'सांतियागु' या गलबताची निवड झाली आहे. आपणाला माहीत आहेच की सांप्रत आपण संभाजी राजे यांच्याशी युद्धांत गुंतलो आहोत. त्यांचे सैन्य गोवा बेटाच्या हद्दीवर या शहरांत प्रवेश करण्यासाठी टपून बसले आहे. गोवा बेटा खेरीज साष्टी आणि बार्देश हचा दोन्ही प्रांतांच्या सीमेवर शत्रू सैन्याने धामधूम मांडिली आहे. संभाजी राजे यानी सेंट स्टिफन बेट घेतले असून तिथला किल्लाहि त्याना कबज झाला आहे. या राज्यांत सांप्रत पोर्तुगीज सैन्य फार थोडे असून मायदेशाहून सैन्याची कुमक अद्याप यायची आहे. आपणापाशीं जे देशी सैन्य आहे त्याचें नैतिक धैर्य कच्चे आहे. त्याचा प्रत्यय आपणाला या पूर्वी आलेला आहे. त्यांत पुनः जें गलबत आतां मायदेशी रवाना होणार आहे, त्याच्यावरहि कांही लढाऊ सैनिक जाणार आहेत. त्यांचा उपयोग आपणाला आमच्या कांही महत्वाच्या ठाण्याच्या रक्षणासाठी झाला असता. अशा परिस्थितींत प्रस्तुत गलबत मायदेशी पाठवायचे की नाही तत्संबंधीचे मत मान्यवर सल्लागारानी प्रकट करावे.

व्हिसेरेइ यांचा प्रस्ताव सल्लागारानी ऐकून घेतल्यावर एकमताने निर्णय दिला की, मायदेशी पाठविण्यासाठी जे मोठे गलबत नियुक्त केले आहे ते न पाठविता त्याच्या ऐवजी एक लहान नौका पाठवावी. गलबताचा व त्या वरील सैन्याचा उपयोग शत्रूच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी व महत्वाच्या रक्षणासाठी करता येईल. सल्लागारानी व्हिसेरेइ याना विनंती केली की, त्यानी मायदेशाहून तांतडीने कुमक मागवून घ्यावी. ते म्हणाले की, युद्धजन्य परिस्थितीमुळें खंबायतहून कापड आलेले नाही व बालाघाटाहून जीवनोपयोगी वस्तूहि आलेल्या नाहीत. अशा स्थितीत मायदेशी जाणाऱ्या नौकेला टपालाशिवाय इतर काही सामान न्यायचे नाही.

सल्लागारांचे मत व्हिसेरेइ यानी ग्राह्य मानले व त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आश्वासन सल्लागाराना दिले.*

* Assentos do Coscelho de Estado, Vol. IV, Documento No. 156.

क्र. १०४ **गोवा, दि. २६ नवंबर १६८३**

संभाजी महाराजानी पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेल्या चौलच्या ठाण्यास वेढा घातला होता. त्याचबरोबर त्यांचे सैन्य गोव्याच्या राजधानी समोर येऊन ठेपले होते. अशा परिस्थितींत चौलला कुमक पाठवायची की नाहीं, त्या संबंधी गोव्याच्या व्हिसेरेइने गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळाचा सल्ला मागितला असता त्याने सल्ला दिला की, गोव्याचे रक्षण महत्त्वाचे असल्याने चौलकडे एक फ्रिगेट दारूगोळा देऊन तेवढे पाठवावे.

शुक्रवार दि. २६ नवंबर १६८३ या दिवशी व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल फ्रान्सिश्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी राज्य सल्लागार मंडळाची बैठक जेजूस संघाच्या पाद्रयांच्या निवासस्थानी बोलविली. त्यांनी बैठकीला विदीत केलें की, चौलच्या किल्ल्यास संभाजीचा वेढा पडला असल्याने या किल्ल्यास कुमक पाठविण्यासाठी सेनापती दों रुद्रिगू द कोश्त यांच्या नेतृत्वाखाली काहीं फ्रिगेटस् आणि गलबतांचे आरमार तयार करण्याचा हुकूम मी दिला आहे. या आरमाराबरोबर खंबायतला पाठविण्याच्या नौकाहि जाव्यात असें मला वाटते. परंतु अडचण ही की, संभाजी राजे हृचानी मोठे घोडदळ, पायदळ आणि हत्ती घेऊन आमचा सेंट स्टिफन बेटावरील किल्ला व्यापिला आहे. ते आतां आमच्या राज्याचें शिर जें गोवा शहर ते घेण्यासाठी अगदी नजीक येऊन ठेपले आहेत. आपणाला माहीत आहेच की, या शहरीं पोर्तुगीज सैन्याची कमतरता आहे. मायदेशाहून कुमक आलेली नाही. आणि जे देशी लोकांचे सैन्य आपणापाशी आहे त्याचे नैतिक धैर्य कच्चें असल्याने त्याच्यावर विसंबून राहाणे धोक्याचे आहे. अशा परिस्थितीत चौलच्या किल्ल्यास कुमक पाठवायची कीं काय ते आपण ठरवावे. कारण या आरमाराबरोबर इकडे बरेंच सैन्य जाणार आहे.

सल्लागारानी व्हिसेरेइ यांच्या निवेदनाचा विचार करून दृष्टिकोण व्यक्त केला की, गोवा शहराला शत्रूच्या स्वारीचा धोका असतां इकडचे पोर्तुगीज सैन्य आणि आरमार उत्तरेकडे पाठविणे शहाणपणाचे ठरणार नाही. त्याचप्रमाणे जनरल दों रुद्रिगु द कोश्त यांच्यासारख्या अनुभवी सेनापतीलाहि तिकडे धाडणे बरोबर नाही. आपण प्रथम राज्याचें शिर जें गोवा शहर, त्याच्या लगतचा प्रदेश व साष्टी आणि बार्देश प्रांतांच्या रक्षणाची व्यवस्था अगोदर केली पाहिजे. ही व्यवस्था न करतां जर इकडचे सैन्य आणि युद्धनौका दुसरीकडे हलविल्या, तर शत्रूचें चांगलेंच फावेल. दुसरी गोष्ट अशी की, खंबायतहून कापड आणण्यासाठी तिकडे नौका पाठवायच्या झाल्यास त्या या अगोदर पाठवायला हव्या होत्या. आतां त्या पाठवून तिकडून कापड आणून ते मायदेशास पाठवायचे कधी? त्यांत अडचण

ही की, शत्रूचे आरमार समुद्रांतून येऊन आमच्या प्रदेशात सैन्य उतरविणार असल्याची बातमी असतां या स्वारीला तोंड देण्यासाठी युद्धनौकांची आपणाला जरुरी नाही का? तेव्हां ही सर्व परिस्थिती लक्षांत घेऊन चौलला एक फ्रिगेट दारूगोळा व शस्त्रास्त्रें देऊन पाठविण्यात यावे. आणि या फ्रिगेटवर जनरल दों रुद्रिगु द कोश्त याना पाठवूं नये. कारण या शहराच्या रक्षणासाठीं व मान्यवर व्हिसेरेइ याना मदत करण्यासाठी त्यांची येथे नितांत आवश्यकता आहे.*

क्र. १०५ **गोवा, दि. २६ नवंबर १६८३**

संभाजी महाराजांशी लढण्यासाठी पोर्तुगीजांपाशी पुरेसें सैन्य नव्हते. त्यानी ह्या कामी कैद्यांचा उपयोग करण्याचा निर्णय कसा घेतला तें प्रस्तुत कागदावरून दिसून येते.

शुक्रवार दि. २६ नवंबर १६८३ या दिवशी व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल फ्रान्सिश्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी राज्य सल्लागार मंडळाची बैठक जेसुइट संघाच्या पाद्रयांच्या निवासात बोलविली. ते म्हणाले की, आमचा शत्रु संभाजी राजे यांचे सैन्य आमचे राज्य घेण्यासाठी सर्व बाजूनी चढाई करीत आहे. आमच्यापाशी या सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी सैन्य नाही. ही परिस्थिती लक्षांत घेऊन आमच्या बंदीखान्यांतील काळचा तशा गोऱ्या युद्धकैद्यांनी मला विनंती पत्र पाठविले आहे की, आमची जर सुटका करण्यात आली, तर आम्ही आमच्या स्वामीच्या राज्याच्या रक्षणार्थ शत्रूशी मुकाबला करण्यास तयार आहोत. आणि इतकें सांगून मान्यवर व्हिसेरेइ यानी राज्य सचिवास युद्ध कैद्यांचे अर्ज सभागृहास वाचून दाखविण्याचा हुकूम केला. अर्जाचे वाचन झाल्यावर सल्लागारांनी दृष्टिकोण व्यक्त केला की, युद्धकैदी जर लढाईवर जाण्यास तयार असतील तर त्याना सशर्त मुक्त करण्यास हरकत नाही. मात्र त्यांची मुक्तता करण्यापूर्वी त्यांच्याकडून कैफियती लिहून घ्याव्यात की, त्यांच्या हातून गुन्हे घडले असल्याने त्याना कारावासाची शिक्षा झाली आहे. अशा परिस्थितीत युद्ध समाप्त झाल्यावर त्यानी सरहद्दीवरून परत येऊन आपली कारावासाची उरलेली शिक्षा भोगली पाहिजे. अर्थात त्यांच्या शिक्षेंत सूट दिली पाहिजे हे ओघाने आलेच.

प्रस्तुत ठराव संमत झाल्यावर त्याच्यावर सर्व सल्लागारानी सह्या केल्या.†

---

* Assentos do Conselho do Estado, Vol. IV, Documento No. 157.

† Assentos do Conselho do Estado, Vol. IV, Documento No. 158.

क्र. १०६ गोवा, दि. ९ डिसेंबर १६८३

संभाजी महाराज व पोर्तुगीज यांच्यामध्ये युद्ध चालू होते. परंतु युद्धाचा खर्च कसा रेटावा हा पोर्तुगीजांसमोर प्रश्न होता. त्यानी कर लादून तीन लक्ष अश्रफी गोळा करण्याची जी युक्ति लढवली, तिची माहिती प्रस्तुत कागदात आहे.

डिसेंबर महिन्याच्या नवव्या दिवशी गोवा शहराच्या किल्ल्यांतील शाही सभागृहात, खानदानी वर्ग, पुरोहितवर्ग आणि रयत यांच्या बारा प्रतिनिधींची बैठक पाचारण करण्यात आली होती. या प्रतिनिधींत गोवा शहर, त्याच्या लगतचा टापू आणि बार्देश व साष्टी या प्रांताच्या प्रतिनिधीचा अंतर्भाव होत होता. व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल फ्रान्सिश्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी युद्धनिधीसाठी तीन लक्ष अश्रफी कशा जमा करता येतील तत्संबंधीचा विचार-विनिमय करण्यासाठी जी पहिली सभा बोलाविली होती. तदनुषंगाने प्रस्तुतच्या बैठकीचे कामकाज व्हायचे होते. व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर यांच्या आदेशानुसार राज्य सचिव लुईज गोंसाल्विज कोता यांनी बैठकीला निवेदन केले की, संभाजीने या राज्याशीं जे युद्ध सुरू केले आहे त्या युद्धांत अमाप पैसा खर्च झाला आहे. राज्याचा खजिना पार रिता पडला आहे. युद्धापायी खर्च तर होत आहेच; पण पैसा कसा उभारायचा हा राज्य सरकारासमोर मोठा प्रश्न उभा राहिला आहे. त्याचा खल करण्यासाठी आजची बैठक बोलावण्यात आली आहे. तरी येथें जमलेल्या तिन्ही वर्गांच्या प्रतिनिधींनी तीन लक्ष अश्रफी कशा गोळा करतां येतील ते सांगावे. युद्ध किती दिवस चालू राहील ते सांगता येत नाही. कदाचित तह झाला, तर तें लवकरहि संपुष्टात येईल, न झाल्यास दीर्घ काळ लांबेल. परंतु आजची मुख्य अडचण ही आहे की, राज्यापाशी पैसा नाही, माणसे नाहीत. या गोष्टी असल्याशिवाय युद्ध चालविणे अवघड आहे. युद्धांत लढणाऱ्या सैनिकांचा मुशाहिरा घातला पाहिजे व त्याना दारूगोळा पुरविला पाहिजे. परंतु पैशाशिवाय दारूगोळा कसा विकत घ्यायचा? इकडे सैन्याची फार कमतरता आहे. सैन्य पोर्तुगालहून मागविलें आहे. पण तें जर आलें नाही, तर बाहेरून भाडोत्री सैन्य पैदा करावें लागेल.

राज्य सचिवांच्या भाषणानंतर तिन्ही वर्गांच्या बारा सदस्यांतून चार लोक निवडून एक समिती युद्धनिधी कसा गोळा करतां येईल त्याचा विचार विनिमय करण्यासाठी निवडावी असें ठरले. त्या प्रमाणे हे चार सदस्य निवडण्यात आले व त्यांनी युद्धनिधी गोळा करण्याचा मार्ग सूचविला तो असा : एक रात[१] तंबाखूवर मूळ किमती खेरीज एण अश्रफी जादा वसूल करावी. तसेच एक रात कापडावर दोन अश्रफी कर लावावा. शहरांतील एतद्देशीय लोकांकडून साठ हजार अश्रफी वसूल

करावयात. ह्या लोकांनी युद्ध कर भरला पाहिजे, त्याचे कारण हें की, हे लोक युद्धावर पाठविण्यास निरुपयोगी आहेत. शिवाय जे लोक कर भरतात त्यानी त्यांच्या कराच्या शेंकडा दहा टक्के जादा कर भरावा. त्याचप्रमाणे ठराविक कर बांधून दिलेल्या ज्या जमिनी लोकांकडे आहेत त्यांच्यावरही शेंकडा दहा टक्के जादा कर लादावा, अशीहि सूचना करण्यात आली. ह्या जमिनी गोवा शहर, त्याचा लगतचा मुलुख आणि साष्टी व बार्देश या दोन्ही प्रांतांत होत्या.

युद्धनिधी गोळा करण्याचे उपरिनिर्दिष्ट उपाय तूर्तास एक वर्षासाठी असावेत व युद्ध चालू राहिलें तर त्याप्रमाणें ते आणखी एक किंवा दोन वर्षांपर्यंत वाढवावेत असे ठरले.

प्रस्तुत ठरावावर सगळयांनी सह्या केल्या.*

क्र. १०७ दि. १३ डिसेंबर १६८३

संभाजी महाराजांशी सुरू झालेल्या युद्धांत पोर्तुगीज मेटाकुटीस आले होते. त्यानी युद्ध खर्च भागविण्यासाठी जो युद्धनिधी उभारला त्याची माहिती प्रस्तुत कागदात आहे.

आमचा शत्रू शेजारचे शंभु राजे यानी या राज्यावर सर्व बाजूनी मोठ्या सैन्या-निशी हल्ला केला. त्याच्या सैन्यात हत्ती, घोडदळ आणि पायदळ यांचा अंतर्भाव झाला आहे. संभाजी राजे यांचे सैन्य गोव्याप्रमाणेच वसई, दमण आणि चौलवरहि चालून गेले. गोव्यावर हल्ला करणारे शत्रू सैन्य सेंट स्टिफन बेटांत शिरले व बार्देश आणि साष्टी प्रांतातहि त्याने आक्रमणे केली. हा सर्व प्रदेश उघडा असल्याने शत्रूला कोणताच अडथळा झाला नाही. शत्रूने आमच्या प्रदेशांत जाळपोळ करून भयंकर हानी केली. आम्हाला मायदेशाहून कुमक यायची होती पण ती आली नाही. आमचे मूठभर पोर्तुगीज सैनिक भिक्षु, एतद्देशीय लोक आणि इतर धर्मीय यांच्या सहाय्याने खिंडींचे आणि किल्ल्यांचे रक्षण करीत आहेत. आमचा खजिना या युद्धापायी रिकामा पडला आहे. त्यामुळें दैनंदिन खर्च भाग-विणे अवघड होऊन बसले आहे. अशा परिस्थितींत या संकटाचा विचार करण्या-साठी मला या शहराच्या किल्ल्यांतील शाही सभागृहांत खानदानी वर्ग, धर्माधि-कारी आणि भिक्षू व रयत यांची सभा बोलविणे भाग पडले. मी सभेला विदित केले की, युद्धजन्य परिस्थितीमुळें खर्च भागविणे अशक्य झाले आहे. तरी स्वखुशीने एक युद्धनिधी आपण उभारला पाहिजे. हा निधी तीन लक्ष अश्रफीचा

१ रत्तल

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento Nó. 159.

असावा असें मला वाटते. तरी तो कसा उभा करतां येईल त्याचा आपण विचार करावा.

सभेला तिन्ही वर्गांचे पुष्कळ लोक उपस्थित होते. त्या सगळचांना बोलण्याची संधी दिली तर गोंधळ माजेल म्हणून त्यांच्यामधून प्रत्येकी चार प्रतीनिधी मिळून बारा प्रतिनिधी निवडण्यात आले त्यानी निधी गोळा करण्याचे उपाय सूचवायचे होते. प्रस्तुत निधी एका वर्षात जमा होणे शक्य नसल्यास आणखी एक किंवा दोन वर्षें घ्यायची असें सूचविण्यात आले. सर्व प्रतिनिधीनी उपर्युक्त ठरावावर सह्या केल्या. निधी गोळा करण्याचा जो एक मार्ग सुचविण्यात आला तो असा की, प्रत्येक एक रत्तल तंबाखूमागें मूळ किमतीशिवाय आणखी एक अश्रफीचा कर जादा आकारायचा. त्याशिवाय याच एक रत्तल तंबाखूवर महसूल खात्याची म्हणून आणखी एक अश्रफी मिळून दोन अश्रफी ग्राहकाकडून वसूल करायच्या. लोक प्रतिनिधीना कर वसूल करण्याचा उपाय मान्य झाल्यावर तो अमलांत आणण्याचा हुकूम जारी करण्यात आला.

(प्रस्तुत कागद पोर्तुगाल येथील आज्युदा शहरांतील सार्वजनिक ग्रंथालयांत आहे)*

क्र. १०८ **दि. १२ जानेवारी १६८४**

संभाजी महाराजानी पोर्तुगीजांच्या नाड्या आवळल्या होत्या. गोव्याची राजधानी पडण्याच्या बेतांत होती. परिस्थिती आणीबाणीची होती. म्हणून पोर्तुगीजानी राजधानी मुरगाव बंदरात हलविण्याचा बेत केला. तिकडून त्याना पळून जाणे सोपे जाणार होते. पोर्तुगालच्या राजाची राजधानी हलविण्यास अनुमती होती.

दि. १२ जानेवारी १६८४ या दिवशी गोवा बेटांतील सांतियागु किल्ल्यांत व्हिसेरेइ व कॅप्टन जनरल सिंज्योर फ्रान्सिश्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी राज्य सल्लागार मंडळाचे सभासद, न्यायालयाचे सभासद, गोवा शहराच्या नगरपालिकेचे सभासद, धर्मपीठाचे प्रमुख आणि इतर प्रमुख धर्माधिकारी यांची एक सभा पाचारण केली. सभेचे कामकाज सुरू झाल्यावर व्हिसेरेइ यानी राज्य सचिव लुईज गोंसाल्विज द कोता याना पोर्तुगालचे महाराज यानी दि. ७ मार्च १६८२ यादिवशी त्या वेळचे व्हिसेरेइ लुईज द मेंदोंसा द फुर्तादि याना लिहिलेले पत्र सभेसमोर वाचण्याची आज्ञा केली. प्रस्तुत पत्रांत महाराजानी म्हटले होतें की, गव्हर्नर आंतोनियु द मेलु द काश्तु व मानुएल कोर्त रेयाल या दोघांनी हिंदुस्थानची राजधानी अन्यत्र हलविण्याची परवानगी मागितली होती व ती हलविण्याची

*Apendice : Assentos do Conselho do Estado, Vol. IV, No. 43.

कारणेहि दिली होती. महाराजानी व्हिसेरेइ लुईज द मेंदोंसा द फुर्तादि याना कळविले होतें की, राजधानी बदलावयाची असल्यास ती सरकारी अधिकारी, खानदानी वर्ग, पुरोहित वर्ग आणि रयत यांच्या अनुमतीने बदलावी.

राज्य सचिव लुईज गोंसाल्विज द कोता यानी प्रस्तुत पत्राचे वाचन केल्यावर व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर यांनी सभा बोलविण्याचा उद्देश सांगितला. ते म्हणाले संभाजी राजे यानी आमच्याशीं जे युद्ध चालविले आहे त्यामुळें आमची परिस्थिती फार कठीण झाली आहे. शत्रू सैन्याने आम्हाला सर्व बाजूनीं जेरीस आणण्याचे धोरण अवलंबिले आहे. शत्रूचा आपण परिणामकारकपणे प्रतिकार करूं शकत नाही, कारण आपणापाशी माणसांची कमतरता आहे. म्हणून मला असे वाटते की, राजधानी मुरगावच्या किल्ल्यांत हलविण्यात यावी. तरी सभेने या ठरावावर आपला दृष्टिकोण व्यक्त करावा.

रेव्हेरेंड आर्चबिशप प्रिमाज हे आजारी असल्याने सभेस उपस्थित राहूं शकले नाहीत. परंतू त्यानी व्हिसेरेइ याना पत्र पाठवून त्यांचा ठराव आपणास मान्य असल्याचे कळविले. त्यांच्याप्रमाणे धर्मसभेच्या इतर अधिकाऱ्यानीहि राजधानी मुरगावच्या किल्ल्यात हलविण्यास लेखी अनुमती दिली. आर्च बिशप आणि धर्मसभेचे अधिकारी यानी राजधानी मुरगावला हलविण्यास अनुमती दिल्याचे पाहून सभेला हजर असलेल्या इतर लोकानीहि व्हिसेरेइच्या ठरावाला विरोध केला नाही. त्यामुळे प्रस्तुत ठराव एकमताने मंजूर झाला*

क्र. १०९ **दि. २५ फेब्रुवारी १६८४**

एका पोर्तुगीज मिशनऱ्याचे संभाजी महाराजाच्या ताब्यांतील डिचोली येथे वास्तव्य होते. हें शहर मोगलानी घेतल्यावर तो मिशनरी वेंगुर्ल्यास पळून गेला. परंतु तेथेंहि राहाणे त्याला कसें अशक्य झाले त्याची माहिती प्रस्तुत कागदातून मिळते.

दि. २५ फेब्रुवारी १६८४ या दिवशी व्हिसेरेइ आणि कॅप्टन जनरल सिन्योर फ्रान्सिश्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी राज्य सल्लागार मंडळाचे सभासद, धर्मसभेचे अधिकारी व इतर लोक यांची पानेली येथील आपल्या निवासस्थानी सभा बोलविली. त्यानी सभेला निवेदन केले की, जेरापोलिसचे बिशप दों कुस्तोदियु द पिन्यू हे संभाजी राजे यांच्या राज्यांत डिचोली येथें होते. परंतु मोगल बादशहाने संभाजीच्या राज्यांत सैन्य धाडून सर्वत्र लुटालूट, जाळपोळ आणि कत्तल सुरूं केल्याने बिशप दों कुस्तोदियू द पिन्यू याना डिचोली येथें वास्तव्य करणे अशक्य झाल्याने त्यानी वेंगुर्ला येथे स्थलांतर केले. आपणास माहीत आहेंच की, मुसलमानी

* Assentos do Conselho do Estado Vol IV; documento no. 160.

धर्माचे अनुयायी हे आमच्या कॅथलिक पंथाचे शत्रू आहेत. डिचोली मोगलांच्या हातीं पडल्याने बिशप दों कुस्तोदियु द पिन्यू याना त्या ठिकाणी आपले मिशन चालू ठेवणे अवघड झाले व त्यामुळें त्याना वेंगुर्ल्याचा आश्रय घ्यावा लागला. परंतु वेंगुर्ल्याचे डच हे पाखंडी असल्याने दों कुस्तोदियु याना तिकडे वास्तव्य करणे योग्य वाटत नाही. त्यानी आपल्या राज्यांत येऊन वास्तव्य करण्याची इच्छा दर्शवून पत्र पाठविले आहे. तरी प्रस्तुत ठरावावर आपण विचार करावा.

व्हिसेरेइ यांच्या भाषणानंतर त्यानी राज्यसचिव लुईज गोंसाल्विज द कोता याना बिशप दों कुस्तोदियु द पिन्यू यांचे पत्र सभे समोर वाचून दाखविण्यास सांगितले. प्रस्तुत पत्राचे वाचन झाल्यावर सभेस जमलेल्या लोकानी बिशप कुस्तोदियू द पिन्यू याना गोव्यास येऊन राहाण्यास आपली हरकत नसल्याचे एकमताने सांगितले.*

क्र. ११० **दि. १३ मार्च १६८४**

संभाजी महाराजांशी सुरू असलेल्या युद्धापायीं पोर्तुगीज डबघाईस आले होते. त्यानी युद्धनिधी गोळा करून युद्धाचा खर्च भागविला होता. पण तोहि निधी संपल्यावर धर्ममंदिरांतील बहुमोल चांदीच्या वस्तू गोळा करून त्या तारण म्हणून ठेवून पैसा उभा करण्याचा प्रसंग त्यांच्यावर कसा आला, त्याचे वर्णन प्रस्तुत कागदात आहे.

दि. १३ मार्च १६८४ या दिवशी गोव्याच्या आर्चबिशपच्या पानेली येथील बागेंत धर्माधिकारी आणि भिक्षुक यांची एक सभा व्हिसेरेई आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल सिंज्योर फ्रान्सिस्कु द ताव्होरा कौंट द आल्व्होर यानी पाचारण केली. त्यानी सभेला निवेदन केले की, आमचे शेजारी संभाजी राजे यानी आमच्याशीं युद्ध केल्याचे आपणाला माहीत आहेच. त्यांचे प्रचंड घोडदळ आणि पायदळ आमच्या राज्यांत सर्व बाजूने घुसले होते. या सैन्याने जी लुटालूट आणि जाळपोळ केली, त्याचें वर्णन करणे कठीण आहे. या सैन्याला आम्ही परिणामकारक असा प्रतिकार करूं शकलो नाही, त्याचे कारण हे की, हा सर्व प्रदेश सपाटीचा आणि उघडा असल्याने आक्रमक सैन्याला रोखून धरणे ही मोठी अवघड गोष्ट होती. हें युद्ध चालू असतां राज्याचा खजिना पार रिकामा झाला. त्यांतच आमचा व्यापार बंद पडल्याने बाहेरून पैसा यायचा थांबला. अशा परिस्थितीत आम्हाला धर्ममंदिरांकडे कर्जाऊ रक्कमा मागणे भाग पडले. दुर्दैवाची गोष्ट ही की, साष्टी येथील धर्ममंदिरें शत्रूच्या हल्ल्यांची लक्ष्ये बनल्याने त्यांची लुटालूट झाली. तरीहि या धर्ममंदिरांनी पन्नास हजार अश्रफी युद्ध मदत म्हणून दिल्या. परंतु धर्ममंदिरांकडून मिळालेल्या कर्जाऊ रकमा आणि मदत निधी कमी पडल्याने आम्हाला

* Assentos do Conselho do Estado Vol. IV, Documento No. 161.

खानदानी वर्ग, पुरोहित वर्ग, आणि रयत यांच्याकडून युद्धनिधी गोळा करावा लागला. नंतर गोवा शहरांतील व्यापारी लोकांकडून साठ हजार अश्रफी युद्धनिधी म्हणून गोळा करण्यात आला. सरकारी नोकरांकडून अठ्ठेचाळीस हजार अश्रफी वसूल करण्यात आल्या. परंतु हा सर्व पैसा खर्च झाल्याने आणखी पैसा गोळा करणे आवश्यक झाले आहे. त्याचे कारण हे की, संभाजी राजे यानी राजपुत्र सुल्तान अकबर याच्या मध्यस्थीने युद्ध विरामाची मागणी करून जरी सैन्य मागे घेतले असले, तरी परिस्थिती सुधारतांच ते आमच्याशी पुनः युद्ध सुरू करणार नाहीत असें सांगतां येत नाही. त्याना युद्धविरामाची मागणी करावी लागली, त्याचे कारण हे की मोगल बादशहाच्या मोठ्या सन्याने त्यांच्या राज्यावर स्वारी केली हे होय. तहाची बोलणी फोंडे येथे झालीं. आमच्या वतीने मानुएल साराइव्ह द आल्बुकेर्क यानी बोलण्यांत भाग घेतला. त्यानी मागणी केली की संभाजी राजे यानी साष्टी आणि बार्देश या आमच्या दोन्ही प्रांतातून सैन्य मागे घ्यावे. मोगल सैन्याने संभाजी राजे यांच्या कोकणातील प्रदेशांत शिरून भयंकर स्वरुपाची लुटालूट आणि जाळपोळ केली. मोगलांच्या दडपणामुळें संभाजी राजे तहास तयार झाले; परंतु त्यांच्या सैन्याने आमचे जे युद्ध कैदी धरून नेले त्यांची मुक्तता अद्याप केलेली नाही. तसेंच खोल येथें ते जो किल्ला बांधित आहेत तो पाडून टाकण्याची विनंती त्याना केली होती तीहि त्यानी अमलात आणलेली नाही. त्यावरून असा संशय येतो की, मोगल सैन्य कोकणातून घाटावर परत जाण्याची ते वाट पाहात असावेत. ते सैन्य परत गेलें की, त्याना पुनः आक्रमण करण्यास मार्ग मोकळा राहील. म्हणून आपण तयारीने राहिलें पाहिजे. मी आपणाला विदित केलेंच आहे की सरकारी खजिना सांप्रत रिकामा आहे. अशा परिस्थितींत धर्ममंदिरांनी त्यांच्यापाशी ज्या चांदीच्या वस्तु असतील त्या त्यानी उपयुक्त तेवढ्या ठेवून इतर सरकारला द्याव्यात. म्हणजे त्या गहाण टाकून सरकारला एक लक्ष अश्रफी उभ्या करतां येतील. ह्या वस्तु सरकारी खजिन्यात पैसा आला की सोडवून घेतां येतील. तरी ह्या प्रस्तावाचा विचार आपण करावा.

व्हिसेरेइ यानी उपरिनिर्दिष्ट प्रस्ताव सभेसमोर विचाराधीन ठेवल्यावर प्रत्येकाने त्यावर आपापला दृष्टिकोण व्यक्त केला. पण ज्या अर्थी परिस्थिती अत्यंत आणीबाणीची होती आणि पैसा उभारल्याशिवाय राज्याचा आणि धर्माधिकारी वर्गाचा तरणोपाय नाही हे सगळ्याना पटले, त्या अर्थी पैसा सरकारला दिला पाहिजे यावर सगळ्यांचे एकमत झाले. परंतु धर्ममंदिरांच्या मालकीच्या वस्तु गहाण टाकून एक लक्ष रुपयांची रक्कम उभारण्याच्या मार्गात एक तांत्रिक अडचण होती. त्या साठी कॅथलिक धर्मपंथाचा प्रमुख जो पोप त्याची संमती हवी होती. परंतु त्यावर एक तोडगा काढता येत होता. परिस्थिती आणीबाणीची होती, कॅथलिक

पंथाचे व ख्रिश्चन धर्माचे अस्तित्व धोक्यात होते. ती परिस्थिती ध्यानांत घेऊन गोव्याच्या बिशपला निर्णय घेण्याचा अधिकार होता.

तो तोडगा निघाल्यावर गोवा, बार्देश आणि साष्टी येथील धर्मंदिरांच्या अधिकाऱ्याना सूचना देण्यात आली की आपापल्या धर्ममंदिरांतील आणि संघांतील चांदीच्या वस्तुंच्या याद्या त्यानी तयार कराव्यात. त्या सर्व वस्तू गोळा झाल्या आणि त्यांचे वजन केले कीं त्यांवर किती पैसा मिळूं शकेल त्याचा अदमास करणे सोपे जाणार होते.

नंतर व्हिसेरेइ यानी पुनः एकदां जाहीर केले कीं, सरकारी खजिन्यांत पैसा जमा झाला की, गहाण ठेवलेल्या चांदीच्या वस्तू सोडवून घेऊन त्या ज्याच्या त्याला परत करण्यात येतील. प्रस्तुत ठरावावर सगळ्यांनी सह्या केल्या.*

क्र. १११ गोवा, दि. २४ जानेवारी १६८८

संभाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्यामधील युद्ध चालूच होते. गोव्याच्या गव्हर्नरने पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या प्रस्तुत पत्रात मागणी केली आहे की, संभाजीच्या राज्यांत अशांतता माजविण्याचे कामी असंतुष्ट देसायांचा उपयोग करण्याचे ठरविले आहे, तरी अनुमती द्यावी.

गव्हर्नर दों रुद्रिगु द कोश्त याने संभाजी महाराजांच्या गोव्याकडील स्वारी बाबत पोर्तुगालच्या राजास पाठविलेले पत्र.

महाराज,

संभाजीशी आमचे जे युद्ध सुरू झाले ते अद्याप चालूच आहे. हें युद्ध कौंट द आल्व्होर यांच्या कारकीर्दीत सुरू झाले होते. आम्हाला या भागांतील देसायांची संभाजीच्या राज्यांत अशांतता माजविण्याचे कामी मदत होत आहे. या लोकांचा आम्हाला जोंपर्यंत उपयोग होत राहील तोपर्यंत त्याना दिलेल्या अटी चालू राहतील. महाराजाना जर माझी ही उपाययोजना पसंत नसेल तर मला वेगळी आज्ञा करावी ही प्रार्थना.

माझ्या बलाढ्य स्वामीस ईश्वर उदंड आयुष्य देऊन सुखांत ठेवो.†

गोवा २४ जानेवारी १६८८

(प्रस्तुत कागद लिस्बन येथील राष्ट्रीय ग्रंथालयात असून त्याचा क्र. ८५३८ व प्र. ५ आहे)

* Assentos do Conselho do Estado, Vol. IV; documento No. 162
† Apendice : Assentos do Conselho do Estado, Vol. IV, No. 45.

क्र. ११२ दि. २१ जानेवारी १६८९

गोव्याहून पोर्तुगालला पाठविण्यात आलेल्या प्रस्तुत वार्तापत्रांत दख्खन मधील राजकीय घडामोडींचा वृत्तांत दिला आहे. पोर्तुगीजांच्या तुरुंगात असलेल्या पटेकर राजाने मोगल बादशहाच्या गोव्यांतील वकिलाच्या चिथावणीने पळून जाण्याचा कसा प्रयत्न केला व तो कसा ठार झाला, तें या वार्तापत्रावरून कळते.

हिंदुस्थानातून आलेल्या बातम्या,

मोगल बादशहाने, आदिलशहा व गोवळकोंडयाचा सुल्तान या दोघाना कैद करून त्यांची राज्ये खालसा केली आहेत. या प्रसंगी त्याला दोन्ही राज्यांकडून अमाप धनसंपत्तीचा लाभ झाला. त्याने म्हैसूरच्या व मदुरेच्या राजाचाहि बराच मुलुख घेतला आहे. म्हैसूरच्या आंधळ्या राजास देवाने चांगले शासन केले. गतवर्षी त्याने आपल्या राज्यांतून तेथे कार्य करीत असलेल्या आमच्या पाद्रयाना हाकलून लावले होते. आमचे पाद्री आतां तिकडे परत जातील अशी आशा आहे.

संभाजीच्या दुष्ट शेजारापासून आम्ही आतां मुक्त झालों आहोंत. कारण मोगल बादशहाने त्याचा कोकणांतील सर्व मुलुख आणि प्रख्यात फोंडा शहर घेतले आहे. फोंडा शहर हे गोवा शहरापासून जवळ आहे. आणखी काही वर्षे युद्ध असेंच चालू राहिले तर संभाजीचा नाश झाल्यावांचून राहाणार नाही.

गोव्यांत सांप्रत महर्गतेचा कहर झाला आहे. सर्व खाद्योपयोगी वस्तू दुर्मीळ झाल्या आहेत. आमचा नवीन शेजारी मोगल बादशहा आम्हाला या वस्तु पुरवितो का तें पाहिले पाहिजे. आतां मार्ग मोकळे झाले असून कर्नाटकांतून तांदूळ व इतर भागांतून औषधे येण्याची आशा आहे.

परवां दि १९ जानेवारीस उत्तरेकडील आरमाराचे इकडे आगमन झाले. या आरमाराने बातमी आणली की, आमच्या दोन फ्रिगेटसची अरबांच्या अकरा फ्रिगेटसशीं गांठ पडली. प्रस्तुत अरब आरमाराची आमच्या दक्षिण आरमाराने कर्नाटकाच्या किनाऱ्यावरून हकालपट्टी केली होती. अरबांना कर्नाटकांतून अन्नधान्य आणणे अशक्य झाल्याने ते अन्नधान्याच्या शोधार्थ सुरत भागांत गेले होते. तेथेहि आमच्या युद्धनौकानी त्याना गांठले. असे सांगतात की, अरबांच्या व आमच्या युद्धनौकांची जी लढाई झाली तीत अरबांच्या काही युद्ध नौकांची नुकसानी झाली व काहींनी किनाऱ्याचा आश्रय घेतला. आमच्या बाजूने कॅप्टन कारिदाद व काही नौसैनिक ठार झाले.

पटेचा राजा या शहरांतील दारुगोळ्याच्या गृहांत स्थानबद्ध होता. त्याने दारुगोळ्याच्या गृहात आग लावून देऊन समुद्रांतून पळून जाण्याचें कारस्थान रचले. त्याचा सुगावा सिंज्यारे गव्हर्नर याना लागल्याने त्यांनी पटेच्या राजास

पकडण्यासाठी माणसें पाठविली. या प्रसंगी जी चकमक उडाली तींत आमच्या कडचे पांच ठार आणि नऊ जखमी झाले. पटेचा राजा व त्याची पंचवीस माणसें या चकमकींत ठार झाली.

मोगल बादशहाचा वकील सांप्रत या शहरी आहे. फोंड्याला माणसें आणि नौका आमच्या नद्यांतून पाठविण्याची परवानगी तो मागत आहे. हा वकील अत्यंत धोकेबाज आहे. असें सांगतात की पटेच्या राजाशी त्याने संधान जुळविले होते. तो स्वतःहि दगलबाज असल्याची बातमी आहे. त्यावरून या माणसापासून गोव्यास केवढा धोका आहे ते स्पष्ट होते..................*

क्र. ११३ **गोवा, दि. २५ १६९०**

गोव्याच्या व्हिसेरेइने रामचंद्रपंत आमात्य याना लिहिलेल्या प्रस्तुत पत्रांत मैत्रीची अपेक्षा केली आहे. तो म्हणतो की, पोर्तुगीज आपल्या मित्राना कधीच अंतर देत नाहीत.

रामचंद्र पंडीत यांस

